



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार ३० आक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# वसा पशु सेवा केंद्रास प्रविण पोटे यांची भेट

## -दोन लाखांची आर्थिक मदत देऊन प्राणीसेवेसाठी पुढाकार

**अमरावती :** श्री गोरक्षण पशुवैद्यकीय रुग्णालय आणि वसा प्राणी वाचवा पशु सेवा केंद्राला माजी पालकमंत्री प्रविण पोटे पाटील यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी केंद्रातील निवारस व उपचार घेत असलेल्या प्राण्यांची पाहणी करत कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या कार्याची माहिती घेतली.





प्रविण पोटे पाटील यांनी केंद्रात उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सुविधा, उपचार साधने आणि देखभालीच्या उपक्रमांचा आढावा घेत संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. प्राणीसेवेतील या संस्थेच्या सामाजिक बांधिलकीचा गौरव करत त्यांनी पाच क्विंटल तांदूळ आणि दोन लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.

'वसा पशु सेवा संस्था खऱ्या अर्थाने प्राणिमात्रांची सेवा करत आहे. समाजासाठी प्रेरणादायी असे हे कार्य आहे,' असे गौरवोद्गार प्रविण पोटे पाटील यांनी यावेळी काढले. तसेच, समाजातील नागरिकांनीही या संस्थेच्या सेवाभावी कार्यात आपला हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी श्रेयश पोटे पाटील, श्रुतीताई पोटे पाटील, चेतन पवार, प्रकाश पुंड, बबन लायदे, जगदीश कांबे, अभिजित वानखडे, मनीष चौबे, अंकित कावळे आदी मान्यवर उपस्थित होते. वसा पशु सेवा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रविण पोटे पाटील यांच्या मदतीबद्दल आणि भेटीबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

# शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसाठी काँग्रेसची अमरावतीत पूर्वतयारी बैठक

## -प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष एम एम शेख यांनी घेतला आढावा

**अमरावती :** निवडणूक आयोगाकडून शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची तयारी सुरू झाली असून, एक नोव्हेंबर पासून नव्याने मतदार नोंदणीची प्रक्रिया हाती घेण्यात येणार आहे. याकरिता सर्वच राजकीय पक्ष सक्रिय झाले असून, काँग्रेस पक्षाने देखील या निवडणुकीत कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर उमेदवारांच्या चाचणीसह मतदार नोंदणीसाठी आज, गुरुवारी काँग्रेस भवन येथे अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटी (ग्रामीण) तर्फे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वतयारी बैठक पार पडली.

या बैठकीस म. म. शेख, वरिष्ठ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तसेच वसंतराव पुरके, खासदार बळवंतराव वानखेडे, यशोमती ठाकूर, माजी आमदार विरेंद्र जगताप, व जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, सुनील देशमुख, बबलु शेखावत, मिलिंद चिमोटे, विलास इंगोले, अशोक अमानकर, प्रफुल मानकर यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी हरिभाऊ मोहोड, सुधाकरराव भारसाकळे, दयारामजी काळे, प्रकाशराव काळबांडे, बाळासाहेब हिंगणीकर, मुकद्दर खा पठाण, व्यासपीठावर उपस्थित होते.

बैठकीत शिक्षक मतदारसंघातील काँग्रेस पक्षाची संघटनात्मक रचना, कार्यकर्त्यांची जबाबदारी, मतदार नोंदणी मोहिमेची आखणी आणि आगामी निवडणुकीसाठी ठोस रणनीती या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीला प्रदीप देशमुख (सेवादल) प्रमोदराव दाळू, भैय्यासाहेब मेटकर, जयश्रीताई वानखडे, सतीशराव हाडोळे, श्रीकांत झोडपे, सेतु देशमुख, अजीज खान, राजाभाऊ टवलारकर, विनोद पवार, नामदेवराव तनपुरे, विनोद भालेराव, राजेशभाऊ काळे, नंदू यादव, वीरेंद्रसिंह जाधव, अमित गावंडे, अरविंद लंगोटे, समाधान दहातोंडे, रमेश सावळे, आतिश शिरभाते, किशोर देशमुख किशोर कीटुकले, प्रदीप देशमुख, अरविंद पखान, निखिलराव कोकाटे, वैभव वानखडे, साहेबराव भदे, ईश्वर बुंदिले, दीपक सवई, महेंद्रसिंग गेलवार, श्याम बेलसरे, राजेश शेमलकर, भूषण कोकाटे पंकज विघळे, कलीम भाई, सलामउद्दीन शेख, अमोल देशमुख, नितेश वानखडे, सागर देशमुख, गजानन देशमुख, निशु जाधव, समीर पाटील, हिरालाल काशीकर व जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिक्षक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाजार समिती समोर शेतकऱ्यांच्या वाहनांच्या लागल्या रांगा

**अमरावती :** हवामान खात्याच्या अंदाजानुसार पश्चिम बंगालच्या उपसागरातून चक्रीवादळ सक्रिय असून विदर्भात पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे अमरावती कृषी उत्पन्न बाजार समिती आज बुधवार २९ ऑक्टोबर रोजी बंद ठेवण्याचा निर्णय संचालक मंडळांनी घेतला होता. मात्र या निर्णयाचा फटका पहाटेपासून शेतकऱ्यांना बसू लागला. सकाळी सहा वाजेपासून बाजार समितीच्या प्रवेशद्वारासमोर शेतमाल घेऊन आलेल्या ट्रॅक्टर, पिकअप, ट्रक यांच्या लांबच लांब रांगा लागल्या. शेतकऱ्यांनी खरेदी नका करू पण आमचा माल शेडमध्ये ठेवून घ्या अशी मागणी प्रशासनाकडे केली परंतु बाजार समिती बंद असल्याने त्यांना अवघड परिस्थितीचा सामना करावा लागला. यांची संख्या वाढत गेल्याने बाजार समिती परिसरात वाहतुकीचा खोळंबा झाला. रस्त्यावर वाहने अडकून राहिल्याने काही काळ वाहतूक पूर्णतः ठप्प झाली होती. जिल्ह्याच्या विविध भागातून सोयाबीन ,तूर व इतर शेतमाल घेऊन शेतकरी दाखल झाले होते. त्यामुळे परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सकाळी १० वाजता गाडगे नगर पोलीस बाजार समितीत दाखल होऊन वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. पावसाच्या अंदाजामुळे बाजार समिती बंद ठेवण्याचा निर्णय योग्य असला तरी शेतकऱ्यांना वेळेत माहिती न मिळाल्याने त्यांना मोठा गैरसोयीचा सामना करावा लागला.








# आक्सीजन पार्कच्या परीसरात कचऱ्याचे ढिगारे

## - मुळ उद्देशाला मनपा द्वारे हळताळ -किशोर बोरकर

**अमरावती -** वनविभाग अमरावतीच्या मालकीच्या जमिनीवर चपराशीपुरा,जुना बायपास रोडवर २२००० चौ.फुट.जमीनीवर तात्कालीन पालकमंत्री डॉ सुनिल देशमुख यांच्या प्रयत्नामुळे आक्सीजन पार्क निर्मिती ९० लक्ष रुपये खर्च करून करण्यात आली आहे.शहरात वाढत्या प्रदूषणामुळे नागरीकांना आक्सीजन मिळवण्यासाठी आक्सीजन पार्कची निर्मिती करण्यात आली असून स्थानिक व जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिक सुध्दा मोठ्या प्रमाणात आक्सीजन पार्कचा लाभ घेतात.परंतु मनपाच्या खाजगी कंत्राटदारांकडून व शहरातील इतर भागातील केर कचरा हा आक्सीजन पार्कच्या समोरील मोकळ्या व आजुबाजूच्या परिसरात टाकण्यात येत आहे.यामुळे फार मोठा प्रमाणात या परीसरात प्रदुषण निर्माण होवून दुर्गंधी सुध्दा येत आहे.व यामुळे आक्सीजन पार्कमध्ये फिरायला येणाऱ्या नागरिकांना आक्सीजन कसे मिळेल असा सवाल मनपाच्या आयुक्तांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांनी निवेदनातुन केला आहे.





बदलत्या काळानुसार शहरीकरणामुळे प्रदुषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून स्थानिक नागरिकांचे आरोग्यासाठी आक्सीजन मिळणे आवश्यक असल्यामुळे अमरावती शहरातील चपराशीपुरा या भागात आक्सीजन पार्क उभारण्यात आले आहे.मात्र मनपाच्या दुर्लक्षित कारभारामुळे आक्सीजन पार्कचा मुळ उद्देशाला हळताळ फासला गेला आहे.असा आरोप किशोर बोरकर यांनी केला असून यापुर्वी मनपा आयुक्तांना एका बैठकीत याबाबत माहिती दिली होती,व मनपा आयुक्तांच्या आक्सीजन पार्कच्या भेटिनंतर काही दिवस केर कचरा टाकते थांबले होते,मात्र पुन्हा अलीकडे फार मोठ्या प्रमाणात केर कचरा टाकण्यात येत आहे, तीन दिवसांत या भागातील केचकचरा उचलण्यात यावा अन्यथा मनपा आयुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांनी मनपा आयुक्तांना निवेदनात दिला आहे.


# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दौरा



**अमरावती :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गुरु वार, दि. ३० ऑक्टोबर रोजी जिल्ह्याचा दौरा आहे.

दौयानुसार, गुरू वार, दि. ३० ऑक्टोबर रोजी दुपारी २.३० वाजता बेलोरा विमानतळ, अमरावती येथे आगमन होईल. त्यानंतर ते दुपारी ३ वाजता दिवंगत नेते रा. सू. (दादासाहेब) गवई स्मारकाच्या उद्घाटन सोहळ्याला उपस्थित राहतील. कार्यक्रमानंतर सायंकाळी ५.३० वाजता बेलोरा विमानतळ येथून विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा दौरा



**अमरावती:** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा गुरु वार, दि. ३० ऑक्टोबर रोजी जिल्ह्याचा दौरा आहे.

दौयानुसार, सकाळी ७.४५ वाजता बेलोरा विमानतळ, अमरावती येथे आगमन होईल. त्यानंतर ते यवतमाळकडे हेलिकाप्टरने प्रयाण करतील. यवतमाळ येथून निघून दुपारी २.२५ वाजता बेलोरा विमानतळ, अमरावती येथे हेलिकाप्टरने आगमन होईल. त्यानंतर दुपारी ३ वाजता दिवंगत नेते रा. सू. (दादासाहेब) गवई स्मारकाच्या उद्घाटन सोहळ्याला उपस्थित राहतील. कार्यक्रमानंतर सायंकाळी ४.४५ वाजता बेलोरा विमानतळ येथून विमानाने नांदेडकडे प्रयाण करतील.

# क्षत्रिय कलाल समाजातर्फे भगवान सहस्त्रबाहु जन्मोत्सव उत्साहात साजरा

**धारणी/प्रतिनिधीः-** धारणी येथील बालाजी मंगलम येथे क्षत्रिय कलाल समाजातर्फे भगवान सहस्त्रबाहु (सहस्त्रार्जुन) भगवानाचा जन्मोत्सव मोठ्या श्रद्धा, भक्तीभाव आणि उत्साहाच्या वातावरणात मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान सहस्त्रार्जुन यांच्या पूजन व आरतीने करण्यात आली. कार्यक्रमस्थळी समाजबंधूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाचा आनंद लुटला.

या प्रसंगी समाजातील हुशार व गुणवान विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. तसेच समाजहितासाठी दान देणाऱ्या प्रतिष्ठित नागरिकांचा शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या निमित्ताने समाजातील वरिष्ठ व युवक वर्गाने समाजाची एकता, संघटन आणि प्रगतीचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमात प्रमुख अतिथी रमेश मालवीय, अनिल मालवीय, सुनील चौथमल, मनोहरलाल चौकसे,नंदूकिशोर मालवीय, अजय मालवीय, हरेराम मालवीय, तिलकचंद मालवीय, राजकिशोर मालवीय ,श्रीराम मालवीय, रामदास जैस्वाल, कैलाश मालवीय, , जगदीश मालवीय, विशाल मालवीय आदी मान्यवर उपस्थित होते. या सामाजिक सोहळ्यात कलाल समाजातर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात समाजातील तरुणांसह ज्येष्ठ नागरिकांनीही उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमास धारणी शहरासह ग्रामीण भागातील मोठ्या संख्येने समाजबंधू व महिला उपस्थित होत्या. समाजाचे ज्येष्ठ सदस्य एसीपी अजयकुमार मालवीय यांनी या प्रसंगी बोलताना सांगितले की मेळघाट भागात कलाल समाजाने शिक्षण, व्यवसाय, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आता समाजाने एकत्र येऊन आपली शक्ती आणि एकता दाखविण्याची गरज आहे. मनोहलाल चौकसे यांनी सुद्धा समाजाचे शैक्षणीक जीवन उंचावे या विषयावर विचार व्यक्त केले. या भव्य आयोजनामुळे समाजात नवीन ऊर्जा, आत्मविश्वास, जागरूकता आणि एकतेचा संदेश प्रसारित झाला. समाजाच्या प्रगतीसाठी व तरुण पिढीला प्रेरणा देणारा हा कार्यक्रम सर्वांसाठी आदर्श ठरला. भगवान सहस्त्रबाहु भगवानाच्या जन्मोत्सवाने धारणी परिसरात सामाजिक ऐक्य, भक्तीभाव आणि सांस्कृतिक उत्साहाचे सुंदर दर्शन घडविले.



# युवकावर अज्ञात व्यक्तींनी केला हल्ला

## -मद्रासी बाबा नगर परिसरातील घटना

अमरावती/प्रतिनिधी-शहरातील मद्रासी बाबा नगर परिसरात एका युवकावर अज्ञात व्यक्तींनी हल्ला केल्याची घटना मंगळवारी (२८ ऑक्टोबर) रात्री घडली. या हल्ल्यात युवक गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने इर्विन रु ग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शहजाद मजीद खान (रा. मद्रासी बाबा नगर) हा मंगळवारी रात्री आपल्या घरासमोर बसला होता. दरम्यान, काही अज्ञात व्यक्तींनी अचानक त्याच्यावर हल्ला करून त्याच्या हात आणि पायावर गंभीर मारहाण केली. जखमी अवस्थेत नागरिकांच्या मदतीने शहजादला उपचारासाठी इर्विन रु ग्णालयात नेण्यात आले. रु ग्णालयात उपचारादरम्यान शहजादने पोलिसांना दिलेल्या निवेदनात सांगितले की, पत्नीशी वाद झाल्यानंतर सासरच्यांनीच त्याच्यावर हल्ला केल्याची शक्यता आहे. नागपुरी गेट पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# चायना मांजाने दोन लहान मुलांसह चौघे जखमी

## -विक्रीवर बंदी असूनही व्यवहार धडाक्यात

**अमरावती /प्रतिनिधी-** शहरात बंदी असतानाही चायना मांजाची विक्री जोरात सुरू असून, या प्राणघातक मांजामुळे पुन्हा चार जण जखमी झाले आहेत. त्यापैकी दोन लहान मुलेही आहेत. रविवारी (दि. २८ ऑक्टोबर) नागपुरी गेट, प्रैंजरपुरा आणि बडनेरा परिसरात या घटना घडल्या.

जखमींमध्ये विनोद प्रमोदराव पारीसे (३९, मसानगंज), शेख सादिक शेख वसीम (४२, बडनेरा), साहिल गणेश देवके (१२, गगनगाव) आणि शिव राहुल खोबरागडे (९, प्रैंजरपुरा) यांचा समावेश आहे. सर्वांना जिल्हा सामान्य रु ग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जिल्हा सामान्य रु ग्णालय आणि खासगी दवाखान्यांतून मिळालेल्या माहितीनुसार, दर दोन दिवसांनी दोन ते तीन जण चायना मांज्याने जखमी होउन येत आहेत. संक्रांतीचा सण अजून दूर असतानाही अशा घटना समोर येत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रविवारी वाऱ्यामुळे शहरात अनेक ठिकाणी पतंगबाजी सुरू होती. त्याचवेळी काही ठिकाणी आकाशातून आलेल्या चायना मांज्याने नागरिकांना जखमी केले. शेख सादिक कामावर जात असताना त्यांच्या हाताला खोल जखम झाली. विनोद पारीसे हे दुचाकीवरून जात असताना त्यांच्या गळ्यात मांजा अडकून दोन्ही हातांना गंभीर जखम झाली. ९ वर्षीय शिव खोबरागडे पतंग उडवत असताना त्याच्या हाताला मांजा लागून कापला गेला. १२ वर्षीय साहिल देवके याच्या डोळ्याखाली मांजा लागून चेहऱ्यावर खोल जखम झाली. राज्य सरकारने चायना मांजावर कडक बंदी घातली असतानाही, अमरावतीत खुलेआम त्याची विक्री होत आहे. बाजारपेठेत व पतंग दुकानांमध्ये हा मांजा सहज उपलब्ध असून, प्रशासनाचे नियंत्रण पूर्णपणे अपयशी ठरत आहे.

# शहरातील अवैध दारू विक्रीवर अंकुश ठेवण्यासाठी विशेष मोहिम

## -चार दिवसांत पोलिसांची मोठी कारवाई

### -२.६७ लाखांचा मुद्देमाल जप्त, १०७ आरोपी तुरुंगात

**अमरावती :** शहरातील अवैध दारू विक्रीवर अंकुश ठेवण्यासाठी अमरावती पोलिसांनी राबवलेल्या विशेष मोहिमेत मोठे यश मिळाले आहे. २५ ते २८ ऑक्टोबर दरम्यान अवघ्या चार दिवसांत १०५ प्रकरणांवर कारवाई करत १०७ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, २ लाख ६७ हजार १४५ रु पयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अवैध दारू विक्रीसह इतर गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या आदेशानुसार शहर पोलिसांनी ही संयुक्त मोहीम हाती घेतली होती. या कारवाईत गुन्हे शाखा तसेच सर्व पोलीस ठाण्यांनी समन्वयाने कार्य केले. शहरातील १० पोलीस ठाण्यांअंतर्गत ७३ प्रकरणे नोंदविण्यात आली असून, ७३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. यामधून १ लाख ४२ हजार ७४५ रु पयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. गुन्हे शाखेअंतर्गत ३२ प्रकरणांवर कारवाई करून ३४ आरोपींना अटक करण्यात आली. आरोपींकडून १ लाख २१ हजार ४०० रु पयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध दारू विक्रीसह सर्व प्रकारच्या बेकायदेशीर धंद्यांवर कठोर कारवाई सुरुच राहील, असा इशारा पोलीस आयुक्तालयाकडून देण्यात आला आहे. नागरिकांनी देखील अशा धंद्यांची माहिती त्वरित पोलिसांना देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ही संपूर्ण मोहीम पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, शाम घुगे, रमेश धुमाळ तसेच सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

## १० वरील उर्वरित

### कारची दुचाकीला जोरदार धडक;

तत्काळ उपचारासाठी खासगी रु ग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. सुमित नेभाणी हा गंभीर अवस्थेत उपचार घेत असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. घटनेनंतर गाडगेनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेउन पंचनामा केला. याबाबत नितीश धामेचा यांनी दिलेल्या तक्रारीवरू न पोलिसांनी संबंधित कारचालकाविरु द्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### हैदराबादहून पुन्हा नवनीत

निरीक्षक संदीप चव्हाण पथकासह राणा यांच्या कार्यालयात दाखल झाले. पत्रातील मजकूराचा तांत्रिक तपास, पोस्टल ट्रॅकिंग व हैदराबादमधील पत्त्याची पडताळणी सुरू आहे. नवनीत राणा यांना धमकीची ही पहिली वेळ नाही. यापूर्वीही नवनीत राणांना सोशल मीडियावरू न आणि फोनद्वारे धमक्या देण्यात आल्या होत्या. काही महिन्यांपूर्वी एका तरु णाने रीलच्या माध्यमातून शिवीगाळ आणि जीवघेणी धमकी दिली होती. त्या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी आरोपीला अटक केली होती. तसेच, पाकिस्तानमधील क्रमांकांवरूनही धमकीचे कॉल येत असल्याची तक्रार दाखल झाली होती.

**पत्रातील थरकाप उडवणारा मजकूर-**पत्रात स्पष्टपणे लिहिले आहे माझ्याकडे ५०० लोकांची टोळी आहे; मी तुला मारू इच्छितो. बदला घेतल्याशिवाय मला शांती मिळणार नाही. १० महिने झाले, पोलिस काही करू शकले नाहीत, दुबई पोलिसही नाही. या ओळींनी कार्यालयातील कर्मचायांसह पोलिसांच्याही भुवया उंचावल्या.

**सुरक्षा वाढवण्याचे निर्देश-**घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्तांनी नेत्यांच्या सुरक्षेबाबत पुनर्विचार सुरू केला आहे.

राजकीय व्यक्तींना मिळणाया अशा धमक्या केवळ वैयक्तिक नसून, लोकशाहीवरील थेट हल्ला असल्याचे वरिष्ठ सूत्रांचे मत आहे. दरम्यान, गुन्हे शाखा या प्रकरणातील मूळ धागेदोरे शोधण्यासाठी सायबर ट्रेसिंग आणि पोस्टल रूट मॅपिंगवर काम करत आहे.

# निवृत्तीवेतनधारकांनी ३० नोव्हेंबरपर्यंत हयातीचा दाखला सादर करणे बंधनकारक

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा कोषागार कार्यालयातून निवृत्तीवेतन घेत असलेल्या सर्व महाराष्ट्र राज्य शासकीय सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी १ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत आपला सन २०२५ चा हयातीचा दाखला सादर करावा, असे आवाहन वरीष्ठ कोषागार अधिकारी शिल्पा पवार यांनी केले आहे. जे निवृत्तीवेतनधारक या मुदतीत हयातीचा दाखला सादर करणार नाहीत, त्यांचे डिसेंबर २०२५ पासूनचे निवृत्तीवेतन स्थगित करण्यात येईल. निवृत्तीवेतनधारकांची अद्याक्षरनिहाय अद्ययावत यादी त्यांच्या संबंधित बँक शाखांकडे पाठवण्यात आली आहे. निवृत्तीवेतनधारकांना दाखला सादर करण्यासाठी दोन पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

स्थापना. १९६९
दि अकोला जनता कमर्शिअल को-ऑप. बँक लि., अकोला
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक (R.No.MSCS/CR/83/99 Dt.23.02.99)

केस क्रमांक: शाखा परतवाडा / सेक्युरिटायझेशन / SCC-105 / 2023-24 दिनांक - 29/10/2025

**स्थावर मालमत्ता निविदाद्वारे विक्रीची नोटीस**
**रुल 8(5) नुसार**

(दि सेक्युरीटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांनशियल असेटस् अॅन्ड इनफोर्समेन्ट ऑफ सेक्युरिटी इन्टरेस्ट अॅक्ट 2002 अॅन्ड दि सेक्युरिटी इन्टरेस्ट (इनफोर्समेन्ट) रुल्स 2002 अंतर्गत)

ज्या अर्थी, श्री. संजय नंदलाल केजडीवाल (अग्रवाल), प्रोप्रा. मे. श्री शक्ती ऑईल, दाल अॅन्ड बेसन इंडस्ट्रीज, परतवाडा ता. अचलपुर जि. अमरावती ह्यांनी दि अकोला जनता कम. को-ऑप. बँक लि., अकोला, शाखा- परतवाडा, कडुन सेक्युअर्ड कॅश क्रेडिट लिमीट कर्जा अंतर्गत रुपये 90,00,000/- ची कर्ज मर्यादा घेतलेली आहे आणि त्या कर्जाच्या परतफेडी करिता हमी म्हणून श्री. संजय नंदलाल केजडीवाल (अग्रवाल) यांनी खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता बँककडे गहाण दिलेली असून त्यांना बँकेने सदर कायद्याचे कलम 13(2) नुसार कर्ज मागणी नोटिस पाठवूनही थकित रकमेचा भरणा मुदतीच्या आत केला नाही. म्हणून बँके तर्फे अधिकृत अधिकाऱ्यांनी दिनांक 15/03/2024 रोजी खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

दि सेक्युरीटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांनशियल असेटस् अॅन्ड इन्फोर्समेन्ट ऑफ सेक्युरिटी इन्टरेस्ट अॅक्ट 2002 च्या कलम 13(4) आणि दि सेक्युरिटी इन्टरेस्ट (इनफोर्समेन्ट) रुल्स 2002 अंतर्गतच्या रुल 8 व 9 अन्वये बँके तर्फे मी खालील सही करणार बँकेचा अधिकृत अधिकारी खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता विक्री करण्याकरिता सिलबंद निविदा बँकेच्या विहीत नमुन्यामध्ये मागवित आहे.

सिलबंद निविदा दिनांक 01/12/2025 रोजी संध्याकाळी 05.00 वाजेपर्यंत दि अकोला जनता कमर्शिअल को-ऑप. बँक लि., अकोला, शाखा - परतवाडा ता. अचलपुर व जि. अमरावती येथे पोहोचल्या पाहिजेत अशा बेताने पाठविण्यात याव्या किंवा स्वतः आणून द्याव्यात या नंतर येणाऱ्या निविदेचा विचार करता येणार नाही.

| अ.क्र. | स्थावर मालमत्तेचे वर्णन |
| --- | --- |
| 1. | मालमत्ताधारक :- श्री. संजय नंदलाल केजडीवाल (अग्रवाल):- सदरहू स्थावर मालमत्ता, मौजे-खेलतपमाळी, नगर परिषद अचलपूर च्या हद्दीतील, आर. एस. डी., आणि ता. अचलपुर, आर. डी., आणि जि. अमरावती येथील फिल्ड सर्व्हे नं. 63/3, सदर भूखंडाला अपर जिल्हाधिकारी, अमरावती यांनी महसुल केस. नं. 59/NAP-34/2003-04 नुसार दि.04.10.2004 ला अकृषक लेआऊटमध्ये रुपांतरित केले असुन या लेआऊट मधील प्लॉट नं.09, असुन याचे क्षेत्रफळ 231 चौ. मि. (2485.56 चौ. फुट) असुन चतु:सिमा खालील प्रमाणे :- पुर्वेस:- प्लॉट नं. 08, पश्चिमेस:- प्लॉट नं. 10, उत्तरेस:- 9 मिटरचा लेआऊट रोड आणि, दक्षिणेस:- इतर शेतजमीन |

» निविदा पोहोचण्याची अंतिम तारीख व वेळ...» दिनांक 01/12/2025 संध्या. 05.00 वाजेपर्यंत
» निविदा उघडण्याची तारीख व वेळ..............» दिनांक 02/12/2025 रोजी दुपारी 1.30 वाजता
» निविदा उघडण्याचे ठिकाण ......................» दि अकोला जनता कम. को- ऑप. बँक लि., अकोला, शाखा- परतवाडा, ता. अचलपुर व जि. अमरावती
» रिझर्व प्राईज ....................» रु. 19,88,000/-

थकबाकीदाराकडुन येणे असलेल्या कर्ज रकमेच्या वसुली साठी विक्रीची निविदा काढण्यात येत आहे. ती मुळ रक्कम त्यावर दिनांक 30/09/2025 पर्यंत व्याज, पिनल व लिगल चार्ज एकुण रुपये 69,39,950/- इतकी असुन या पुढील व्याज, पिनल व लिगल चार्ज त्यामध्ये नंतर जोडण्यात येईल.

निविदा भरण्याच्या काही शर्ती व अटी खाली दिलेल्या असुन अन्य शर्ती व अटींचे वाचन निविदा उघडतांना करण्यात येईल. विकण्यात येणाऱ्या स्थावर मालमत्तेचे हक्का विषयी किंवा त्रयस्थ पक्षांनी सांगितलेल्या कोणत्याही अधिकारास व इतर बोझा बाबत किंवा विधी ग्राह्यते विषयी बँकेस कोणती ही माहिती नसुन त्या बाबत कोणतीही हमी देण्यात येत नसुन त्याबाबत बँक जबाबदार राहणार नाही.

**निविदेसाठी अटी व शर्ती**

1. निविदा भरण्या करिता विहित नमुन्यातील छापील अर्ज अधिकृत अधिकारी, दि अकोला जनता कम. को-ऑप. बँक लि., अकोला, शाखा - परतवाडा, ता. अचलपुर व जि. अमरावती येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहतील.
2. प्रत्येक निविदे सोबत अनामत रक्कम म्हणून रु. 10,000/- रकमेचा डिमान्ड ड्रॉफ्ट / पे ऑर्डर 'अधिकृत अधिकारी', दि अकोला जनता कम. को-ऑप. बँक लि., अकोला, शाखा- परतवाडा, या नावाने परतवाडा येथे पेयेबल असलेला जोडण्यात यावा.
3. सिलबंद निविदा दिनांक 02/12/2025 रोजी दुपारी 01.30 वाजता बँकेची शाखा- परतवाडा ता. अचलपुर जि. अमरावती, येथे उघडण्यात येतील.
4. निविदा मंजुर झाल्यास तावडतोब 25% रक्कम बँकेत भरावी लागेल व बाकी 75% रक्कम व विक्री प्रमाणपत्रा करीता लागणारी मुद्रांक शुल्काची रक्कम निविदा मंजुर झाल्यापासुन 15 दिवसाचे आत निविदा धारकास भरावी लागेल.
5. विक्री कायम केल्या नंतर व पुर्ण रकमेचा भरणा केल्या नंतर बँके तर्फे अधिकृत अधिकारी 'परिशिष्ट V' मध्ये दिलेल्या नमुन्यात सेल सर्टिफिकेट खरेदीदाराचे नावाने करुन देतील.
6. स्थावर मालमत्ता जशी आहे, जेथे आहे त्या स्थितीत विक्री करण्यात येईल.
7. काहीही कारण न देता निविदा रद्द करणेचा अधिकार मे. अधिकृत अधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.
8. या मालमत्तेवर बाकी असलेला ग्राम पंचायत टॅक्स, नगरपरिषद टॅक्स, नझुल टॅक्स व इतर कोणत्याही प्रकारचा सरकारी किंवा निम सरकारी टॅक्स, इलेक्ट्रीक बिल इत्यादि बाबत तसेच इतर काही बाबी असल्यास बँक जबाबदार राहणार नाही व या सर्व बाबी निविदाधारकास स्वखर्चाने क्लीअर कराव्या लागतील.
9. बँकेला आवश्यकता वाटल्यास, बँक सदर स्थावर मालमत्तेची विक्री करण्याच्या अनुषंगाने उपस्थित निविदाधारकांना बोली बोलण्याची मुभा देऊ शकते.
10. या स्थावर मालमत्तेच्या प्रत्यक्ष पाहणी करिता किंवा अधिक शर्ती व अटी करीता मे अधिकृत अधिकारी दि अकोला जनता कम. को-ऑप. बँक लि., अकोला, शाखा- परतवाडा, ता. अचलपुर व जि. अमरावती यांचेशी संपर्क करावा.

ठिकाण - परतवाडा
दिनांक :-29/10/2025

अधिकृत अधिकारी,
दि अकोला जनता कमर्शिअल को-ऑप. बँक लि., अकोला,
शाखा - परतवाडा

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, ३० ऑक्टोबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४


paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# गरीबांच्या ताटावर हल्ला : वाशिम तहसील पुरवठा विभागात भ्रष्टाचाराचा स्फोट !

## अधिकारी, एजंट आणि रेशन दुकानदारांचा संगनमताने 'धान्याचा काळाबाजार'

■ पप्पु घुगे ■

***वाशीम : वाशिम तहसील कार्यालयातील अन्न व नागरी पुरवठा विभागात मागील चार महिन्यांपासून भ्रष्टाचाराचे साम्राज्य फोफावले आहे. या विभागातील बेईमान अधिकाऱ्यांनी आणि एजंटांनी गरीबांच्या ताटातील घासावरच डल्ला घालण्याचा उद्योग सुरू केला आहे.***



मिळालेल्या माहितीनुसार, तालुका पुरवठा अधिकारी मनोज लटारे हे धान्य संकलनासाठी बाहेर असल्याने, त्यांच्या ठिकाणी इतर अधिकाऱ्याकडे अतिरिक्त प्रभार देण्यात आला आहे. आणि तेव्हापासूनच गैरव्यवहारांची मालिका सुरू झाल्याचा गंभीर आरोप पुढे येत आहे.

सामान्य नागरिकांना साध्या रेशन कार्डातील बदल किंवा नवीन कार्ड मिळवण्यासाठी अधिकाऱ्यांच्या चकरा माराव्या लागतात. पण काम फुकट होत नाही. रु. ५०० ते २००० पर्यंत 'सेवा शुल्क' या नावाखाली उघडपणे लाच मागितली जाते. काही ठिकाणी एजंटच थेट काम हातात घेतात, तर अधिकाऱ्यांच्या संगनमताने गरीब जनतेचा आर्थिक व मानसिक छळ सुरू आहे.

### अधिकारी निवृत्तीच्या उंबरठ्यावर, तरीही भ्रष्टाचाराचा पूर!

मिळालेल्या माहितीनुसार, पुरवठा विभागाचा अतिरिक्त प्रभार असलेले नायब तहसीलदार 'समाधाना' ने सेवानिवृत होण्याऐवजी जास्तीत जास्त माया कशी जमा होईल. या कडे लक्ष्य देण्याच्या नादात गरिबाच्या तोंडचा घास हिरावत आहेत. या कडे प्रशासन लक्ष्य देईल का?

या भ्रष्टाचाराविरोधात जर कुणी तक्रार केली, तर प्रशासन मात्र मौन धारण करतं. उलट भ्रष्ट अधिकाऱ्यांनाच अभय दिलं जातं, असा संताप नागरिकांमध्ये उसळला आहे.शासन योजनांचा लाभ देण्याऐवजी त्यावर डल्ला घालणारे अधिकारी आणि दलाल शासनाचा अपमान करत आहेत. अशी संतप्त प्रतिक्रिया जनतेकडून व्यक्त होत आहे.

शासनाने जीपीएस प्रणाली, ऑनलाइन तपासणी, आणि बोगस रेशन कार्ड रद्द करण्याची यंत्रणा सुरू केली असली, तरी प्रत्यक्षात भ्रष्टाचाराची पाळंमुळं कायम घट्ट रोवली गेली आहेत.

सार्वजनिक वितरण प्रणाली (इअए) ही योजना गरीबांसाठीचा जीवदान ठरावी, पण आता तीच लुटीचं साधन बनली आहे. या विभागात सुरू असलेल्या भ्रष्टाचारावर तात्काळ सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबन व गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.जर शासनाने वेळेत पावले उचलली नाहीत, तर जनता रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची शक्यता आहे.

# वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये सुवर्ण कामगिरी करणाऱ्या संगीता ढोले यांचा सत्कार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

केप टाउन (साऊथ आफ्रिका) येथे नुकत्याच पार पडलेल्या वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत वेटलिफ्टिंग क्रीडा प्रकारात एक सुवर्ण आणि एक ब्राँझ पदक मिळवून देशाचा झेंडा उंचावणाऱ्या वाशिम पोलीस दलाच्या संगीता ढोले यांचा वाशिम जिल्हा कराटे असोसिएशनतर्फे सत्कार करण्यात आला. हा गौरवशाली कार्यक्रम असोसिएशनच्या कार्यालयात पार पडला. या प्रसंगी जिल्हा कराटे असोसिएशनचे जिल्हा सचिव चंद्रसेन इंगोले यांच्या हस्ते संगीता ढोले यांना पुष्पगुच्छ, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका क्रीडा अधिकारी अक्षय टेंभुर्णीकर सर उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, 'संगीता ढोले यांनी केवळ वेटलिफ्टिंगमध्येच नव्हे तर संपूर्ण महिला पोलिस दलासाठी प्रेरणास्थान निर्माण केले आहे.



### जिल्हा कराटे असोसिएशनतर्फे सन्मान सोहळा – महिला शक्तीचा अभिमान!

ग्रामीण जिल्ह्यातील खेळाडूंनी जागतिक स्तरावर पोहोचणे हे अभिमानास्पद आहे.' या वेळी सामाजिक कार्यकर्ते संतोष इंगळे, पंकज बनसोड, विनय कांबळे, रितेश गायकवाड, सतीश इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी आपल्या भावना व्यक्त करत सांगितले की, 'संगीता ढोले यांची जिद्द, कठोर मेहनत आणि शिस्तबद्ध जीवनशैली ही आजच्या तरुण पिढीसाठी आदर्श आहे. वाशिम जिल्ह्याचा अभिमान वाढविणाऱ्या संगीता ढोले यांचा नागरिकाने गौरव करावा.' या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनय कांबळे यांनी केले तर आभार रितेश गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाला जिल्ह्यातील कराटे असोसिएशनचे प्रशिक्षक व खेळाडू उपस्थित होते.

**संगीता ढोले यांचा प्रवास प्रेरणादायी :** ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या संगीता ढोले यांनी पोलिस सेवेसह वेटलिफ्टिंग सारख्या कठीण क्रीडा प्रकारात सातत्य राखत जागतिक स्तरावर आपली छाप पाडली आहे. त्यांच्या या यशामुळे वाशिम जिल्हा तसेच महाराष्ट्र पोलिस दलाचा मान अभिमानाने उंचावला आहे.

# विराट हिंदू धर्मसभेचा नागरिकांनी लाभ घ्यावा - संदिप काळे यांचे आवाहन



■ प्रतिनिधी | कारंजा ■

मंगरूळनाथ येथे येत्या १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या विराट हिंदू धर्मसभेसाठी सर्व हिंदू बांधव व भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा माजी विस्तारक संदिप काळे यांनी केले आहे.

ही धर्मसभा सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आली असून कार्यक्रमाचे ठिकाण जिल्हा परिषद क्रीडा मैदान, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मंगरूळनाथ असेल. धर्मसभेचे प्रमुख वक्ते म्हणून टायगर राजाभैय्या ठाकुर, विधायक (गोशामहल – भाग्यनगर, हैद्राबाद) हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच, श्री सुदर्शन गिरी नागा संन्याशी, सिद्धेवरनाथ आश्रम, वृंदावन आणि श्री विभूषित स्वामी श्री श्री श्री शिवव्यंकटेशानंद भारती महाराज यांचीही प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या धर्मसभेद्वारे हिंदू समाजात एकजूट, धर्मजागृती व सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याचा संदेश दिला जाणार आहे. आयोजकांच्या मते, धर्म, संस्कृती व परंपरांचे संरक्षण करण्यासाठी संघटित राहण्याचे आवाहन या सभेतून करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, या धर्मसभेबाबत जिल्हाभरातील नवयुवकांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे.

## शनिवारी ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी शिबिर

**अकोला :** ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी अंतर्गत आर्थिक मालमत्तांच्या निकालीकरणासाठी अग्रणी बँकेच्या सहकार्याने शनिवार, १ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता विशेष जिल्हास्तरीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय अकोला येथे हे शिबिर होणार आहे. शिबिरात खातेदारांच्या दावा न केलेल्या ठेवींचे निराकरण करणे तसेच ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व बँका या शिबिरात सहभागी होणार आहेत.ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधीअंतर्गत सर्व नामनिर्देशित, पात्र लाभार्थ्यांनी या शिबिरास उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.वित्तीय सेवा विभाग आणि राज्यस्तरीय बँक समिती यांच्या निर्देशानुसार हे शिबिर होत आहे.

# शेतकऱ्यांसाठी शोले आंदोलन करणाऱ्या फकीर बाबांच्या झोळीत आश्वासनाचे दान

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील तीर्थक्षेत्र पोहरादेवी गावचे निवासी महाराज परिवारातील रमेश तुकाराम महाराज उर्फ फकीर बाबा यांनी शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसह अनुषांगिक समस्या सोडविण्यासाठी सुरू केलेले शोले आंदोलन प्रशासनाच्या मध्यस्थीमुळे स्थगित केले आहे.

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी. खरीप, रब्बी व उन्हाळी पिकांची वन्य प्राण्यांकडून होणारी नासाडी थांबविण्यासाठी तारकुंपणाकरिता शत प्रतिशत अनुदान देण्यात यावे.



हंगाम संपल्यानंतर रोजगारासाठी स्थलांतरित होणाऱ्या मजूर व अति अल्पभूधारक शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा. पोहरादेवी धावंडा, पोहरादेवी काकड चिखली पांदन रस्ता तातडीने तयार करण्यात यावा या व इतरही मागण्यांच्या पूर्ततेसाठी पोहरादेवी येथे शोले स्टाईल आंदोलन नुकतेच आरंभले होते.

महसूल प्रशासनाने बाबांच्या आंदोलनाची दखल घेऊन त्यांच्या मागणीचा पाठपुरावा शासनाकडे करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने फकीर बाबांनी शोले आंदोलन तूर्तास थांबविले आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी आता पावेतो ३० पेक्षा अधिक उपोषणे व आंदोलन करूनही केवळ लेखी आश्वासनाशिवाय कुठलीच ठोस उपाययोजना शासन व प्रशासनाकडून होत नसल्याची खंत रमेश महाराज यांनी प्रस्तुत प्रतिनिधी जवळ व्यक्त केली.

# धनश्री हिंगणकर जि.प. धनज सर्कलमधून निवडणूक लढविण्यास इच्छुक

■ प्रतिनिधी | कारंजा ■

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा बिगुल वाजण्याच्या तयारीत असताना अनेक उमेदवारांनी राजकीय मैदानात उतरायची तयारी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर कामठा येथील रहिवासी धनश्री सतीश हिंगणकर यांनी जि.प. धनज सर्कलमधून निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

हिंगणकर या बी.टेक पदवीधर असून, त्यांना समाजकार्यात विशेष रस आहे. सामाजिक प्रश्नांची उकल, नागरिकांच्या अडचणी सोडविणे आणि परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याचा त्यांचा निर्धार आहे. 'समाजाची सेवा व विकास हीच खरी राजकारणातील प्रेरणा आहे,' असे मत त्यांनी व्यक्त केले.विशेष म्हणजे,



त्यांचे वडील सतीश हिंगणकर हे शासकीय ठेकेदार तसेच शेतकरी असून त्यांनी आपल्या मुलीच्या या निर्णयाला पाठिंबा दर्शविला आहे. 'राजकारणात तरुण व तरुणींनी सक्रीय सहभाग घेतल्यास देश अधिक सक्षम होईल,' असे ते म्हणाले. धनज सर्कलमधील नागरिकांच्या इच्छेनुसार व त्यांच्या पाठिंब्यामुळे निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतल्याचे धनश्री हिंगणकर यांनी सांगितले.

# एकांबा गावातील वार्ड ३ मध्ये गटारगंगा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशीम तालुक्यातील एकांबा गावातील वार्ड ३ मध्ये मागील अनेक महिन्यापासून गटारगंगा साचली आहे.या गटारगंगेमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.गावातील सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी ग्रामसेवक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.एकांबा गावातील वार्ड ३ मधील गटारगंगा त्वरीत बंद करुन गावातील सांडपाण्याची वरिष्ठांनी योजना करून नागरिकांना न्याय द्यावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे. वाशीम तालुक्यातील एकांबा गावामध्ये ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून तेथील ग्रामसेवक यांचेकडे सर्व अधिकार आहेत,गावातील वार्ड ३ मध्ये गावातील सांडपाणी साचल्यामुळे या भागात गटारगंगा निर्माण झाली आहे.या गटारगंगेचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी स्थानिक नागरिकांनी अनेकवेळा ग्रामसेवकाला प्रत्यक्ष भेटून सांगितले.परंतु संबंधित ग्रामसेवकाने अद्यापपर्यंत या गंभीरबाबीची दखल घेतली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. वार्ड ३ मध्ये बहुतांश दलीत नागरिक राहतात.केंद्रशासन व राज्यशासन ग्रामविकासाच्या, आरोग्याच्या, स्वच्छतेच्या, शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी अनेक योजना राबविते.परंतु शासनाच्या 'या' दोन्ही शासनाच्या योजना एकांबा गावात आजपर्यंत पोहोचल्यात नाहीत का ? माजी पदाधिकारी व ग्रामसेवकाने कागदोपत्री विकास दाखवून स्वत:चा विकास केला ? असा सवालही केल्या जात आहे.

## महानगरात खाटू श्याम जन्मोत्सवाचे आयोजन

**अकोला :** सकल भक्तांचे तारणहार खाटू नरेश श्यामबाबा यांच्या पावन जन्मोत्सवावर महानगरात रामदेवबाबा-श्यामबाबा सेवा समितीच्या वतीने तीन दिवसीय भव्य खाटू श्याम जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर पर्यंत नित्य साय ७ ते रात्री १० वा पर्यंत स्थानीय गीता नगर रस्त्यावरील रामदेवबाबा-श्यामबाबा मंदीरात हा उत्सव नृत्य नाटिका व भजन संध्येच्या माध्यमा तून साजरा करण्यात येणार आहे. महोत्सवाचा प्रारंभ दि ३१ऑक्टोबर व १ नोव्हेंबर रोजी साय ७ वाजता जबलपूर व वृंदावनचे कलाकार हेमेश राज व त्यांचा संच नृत्य नाटिका व भजनांच्याज माध्यमातून होणार आहे.दि १ नोव्हेंबर रोजी खाटू नरेश जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. या दिनी स ८ वाजता स्थानीय राणी सती धाम येथून खाटू श्याम यांची भव्य निशाण यात्रा निघणार असून ही यात्रा गांधी चौक, सिटी कोतवाली, खोलेश्वर, लक्झरी बस स्टँड मार्गे रामदेवबाबा शामबाबा मंदिरात येऊन या ठिकाणी या निशान यात्रेचे महाआरती ने समापन होणार आहे. मंदिरात विद्युत् रोशनाई व फुलांची सजावट, विविध झाकी, दिव्य ज्योत दर्शन, पुरोहित वर्गाद्वारे पूजन, हवन व अभिषेक, केक व प्रसाद वितरण आदी साकार करण्यात येणार आहे.

# सोनल प्रकल्प गाळमुक्त करण्यासाठी कार्यशाळा

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील शेलुबाजार, वनोजा, तऱ्हाळा व परिसरातील गावांसाठी वरदान ठरलेला सोनल प्रकल्प अधिक सक्षम व गाळमुक्त करण्याच्या उद्देशाने शेलुबाजार येथील साई मंदिरात सोनल विकास समितीच्या वतीने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेस मार्गदर्शनासाठी जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता सुरेंद्र जाधव, तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे, जलसंधारण विभागाचे अधिकारी कांबळे, तसेच नारायणराव बारड उपस्थित होते. कार्यशाळेत सुरुवातीला उपस्थित शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेत अभियंता जाधव यांनी त्यांच्या प्रश्नांना उत्तर दिली. त्यांनी सांगितले



की, 'सोनलच्या कालव्याद्वारे पाणी प्रभावीपणे सोडले जाईल आणि यावर्षी शेवटपर्यंत पाणी पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न असेल.' त्यानंतर जलसंधारण विभागाचे अधिकारी कांबळे यांनी प्रकल्पातील गाळ काढण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती दिली. तसेच कृषी अधिकारी सचिन कांबळे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धती व पाण्याचा कार्यक्षम वापर याविषयी मार्गदर्शन केले. या प्रसंगी किशोर देशमुख, सचिन डोफेकर, विलास लांभाडे, अर्जुन सुर्वे, अशोक हांडे, विजय राऊत, बाळकृष्ण रोकडे, प्रशांत गावंडे, बाळू कराळे, निलेश देशमुख, गोवर्धन राऊत, सागर खोडके, घनश्याम ठाकरे, सागर महेशने, दिलीप भगत, राम चौधरी, राम राऊत, राजेंद्र मुळे, रमेश देवळे, दत्तात्रय राऊत, वासुदेव राऊत, अशोक रोकडे, हातोलकर, राजेश बहिष्कार, आदी उपस्थित होते.

# अपघातास आमंत्रण देऊ पाहणारा धोकादायक पूल तातडीने उभारा



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील सावरगांव कान्होबा या देवस्थान असलेल्या गावाला जाण्यासाठी गरजेचे असलेले जोगलदरी या गावा नजीकचे पूल देखभाल व दुरुस्ती अभावी खचलेले असून भगदाड पडलेल्या या पुलामुळे अपघात व संभाव्य जीवित हानी लक्षात घेता तातडीने तालुका आपत्ती नियंत्रण प्राधिकरणाकडून आवश्यक ती उपाययोजना करण्यासंदर्भात लेखी मागणीचे निवेदन सावरगांव कान्होबा येथील नागरिकांकडून देण्यात आले आहे.

जोगलदरी ते सावरगांव कान्होबा हे जवळपास पाच किमीचा रस्ता शासनामार्फत सावरगांध कान्होबा, खापरि कान्होबा, साळंबी आणि जोगलदरी येथील तथा बाहेर गावा वरून तीर्थक्षेत्र सावरगांव कान्होबा येथे ये जा करण्यासाठी शासनाकडून चाळीस वर्षांपूर्वी निर्माण करण्यात आलेला आहे.

जोगलदरी गावालगतच्या ओढ्यावर असलेल्या या पुलाची देखभाल व दुरुस्ती या पुलाचे नियंत्रण असलेल्या संबंधित विभागाकडून गांभीर्याने करण्यात आली नसल्याने या पुलाला एका भागाला मोठे भगदाड पडले आहे ज्यामुळे अपघात निर्माण होऊन शारीरिक व जीवित हानी होण्याची संभावना तालुका आपत्ती नियंत्रण प्राधिकारी तथा तहसीलदार यांना स्थानिक सामाजिक कार्यकर्ते सुरेश राठोड यांनी दिलेल्या निवेदनाद्वारे दिलेल्या निवेदनामध्ये नमूद केले आहे.

# पुणे येथील जैन बोर्डिंग चा ताबा परत मिळावा!

■ दि जैन महासमिती कारंजाची मागणी
■ दि जैन समाज आक्रोषित





**कारंजा :** पुणे येथील सेठ हिराचंद नेमचंद स्मारक ट्रस्ट या सार्वजनिक ट्रस्टच्या विश्वस्त मंडळाने लबाडीपूर्वक धर्मदाय आयुक्त महाराष्ट्र शासन यांना खोटी व चुकीची माहिती सादर करून विश्वस्तांनी संस्थेची पुणे येथील मॉडल कॉलनी परिसरातील तीन एकर जागा चुकीच्या व बेकायदेशीर रित्या विकली या प्रकाराने देशातील शांत असलेला जैन समाज अत्यंत आक्रोषित झाला असुन ट्रस्ट डिड रद्द करून ती संबंधित जागा संस्थेला परत करण्यात यावी अशी मागणी दिगम्बर जैन महासमिती कारंजा लाड संभाग व सकल दिगम्बर जैन समाजाने मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माननीय तहसीलदार मार्फत एका निवेदनाच्या माध्यमातून केले आहे.

पुढे निवेदनात नमूद केले आहे की या जागेवर सेठ हिराचंद नेमचंद दिगम्बर जैन बोर्डिंग या नावाने जैन विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह सुविधा १९६० साला पासुन सुरु करण्यात आली होती मात्र संस्थेची इमारत जीर्ण व मोडकळीस आल्याचे कारण देत विश्वस्त मंडळाने हया जागेची विक्री केली वास्तविक पाहता संस्थेच्या घटनेनुसार विश्वस्त मंडळाला अशा पद्धतीने जागा विक्री करण्याचा अधिकार नाही. संस्थेच्या घटनेनुसार संस्था चालवितांना जर काही आर्थिक अडचण आल्यास विश्वस्त मंडळाने समाजाकडे दान मागुन रक्कम उभी करावी हा पर्याय उपलब्ध असतांना विश्वस्त मंडळांनी या पर्यायांचा विचार न करता व्यक्तिगत फायदा मिळविण्यासाठी संस्थेची जैन मंदिर सह संपूर्ण जागा विकण्याचा निर्णय घेतला

या सर्व प्रकारामुळे देशातील जैन बांधवांच्या भावना दुखावल्या असुन हा प्रकार म्हणजे जैन धर्मावर सरळ सरळ घाला असुन जैन धर्माच्या व देशाच्या इतिहासात प्रथमच जैन मंदिराचे अस्तित्वच नाकारण्याचा व ते गहाण टाकण्याचा प्रकार घडला.

विश्वस्तांचा हा निर्णय अत्यंत निंदनीय व निषेधार्थ असुन बोगस व पैसाच्या लोभापायी बनविलेला खरेदीखत रद्द बादल करून संस्थेला मालकी हक्क मिळवून देऊन देण्याची मागणी यावेळी दिगम्बर जैन महासमिती ने मुख्यमंत्र्यांना केली आहे . या वेळी दिगम्बर जैन महासमिती चे अध्यक्ष अ‍ॅड संदेश माणिकचंद जिंतुरकर , उपाध्यक्ष गिरीश मिश्रीकोटकर सचिव कविश गहाणकरी, सहसचिव अनंत रवने, प्रदेश उपाध्यक्ष आशुतोष जोहरापुरकर, प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजेंद्र खंडारे, वंदनाताई मोहळे तसेच रितेश मिश्रीकोटकर, प्रज्वल गुलालकरी, विवेक गहाणकरी, पुष्पक हरसुले, प्रांजल गहाणकरी, विवेक देवलसी, अमिता खंडारे, चेतन नांदगावकर, पारस खंडारे, प्रांजल दर्यापुरकर, समीर जोहरापुरकर, अनुप नांदगावकर, बाहुबली रायबागकर, प्राजक्त गहाणकरी, भारत हरसुले, सिध्देश नांदगावकर , सुमेर दर्यापुरकर, सार्थक भोरे, चेतन आग्रेकर, आर्जव माळवी, प्रणव रायबागकर, प्रफुल्ल आग्रेकर, नयन दर्यापुरकर, अविनाश नांदगावकर, राजु रायबागकर, अनुप जोहरापुरकर, अविन नांदगावकर ,मनिषाताई रायबागकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३३० ■ गुरुवार, ३० ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सार्ध शताब्दी वर्षानिमित्त केवडिया (गुजरात) येथे महाराष्ट्राचा चित्ररथ

### १ ते १५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान केवडिया गुजरात येथे होणाऱ्या भारत पर्व महोत्सवात


### महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचा सहभाग

**मुंबई जनमाध्यम :** ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सार्ध शताब्दी (१५० व्या) जयंती वर्षानिमित्त केंद्रीय गृह मंत्रालयामार्फत केवडिया, गुजरात येथे आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय संचलन कार्यक्रमात यंदा प्रथमच महाराष्ट्र राज्याचा चित्ररथ सहभागी होणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे या वर्षी 'स्वराज्य: एकतेचा धागा' या संकल्पनेवर हा चित्ररथ साकारण्यात आला आहे. या चित्ररथात अग्रभागी छत्रपती शिवाजी महाराज सिंहासनावर विराजमान असल्याचे दर्शन घडते. त्यांच्या मागे वारकरी संप्रदायातील वारकरी यांची मूर्ती तर पार्श्वभूमीवर मराठा आरमारातील प्रसिद्ध गुराब नौका दर्शविण्यात आली आहे. या माध्यमातून राज्याच्या वैभवशाली इतिहासाची आणि एकतेची झलक दर्शविण्यात आली आहे.

या चित्ररथासोबत १४ कलाकारांचा चमू सांस्कृतिक सादरीकरण करणार असून, महाराष्ट्राच्या विविधतेतून एकतेचा संदेश देणारे हे सादरीकरण राष्ट्रीय स्तरावर राज्याची सांस्कृतिक ओळख अधोरेखित करेल.

तसेच, १ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत भारत पर्व अंतर्गत महाराष्ट्र व गोवा राज्यांच्या सांस्कृतिक



कार्य विभागांद्वारे संयुक्त सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण करण्यात येणार आहे. या महोत्सवाचा मुख्य कार्यक्रम ७ -८ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडेल. महाराष्ट्र राज्याकडून या कार्यक्रमात राज्यातील समृद्ध लोकपरंपरेचे दर्शन घडविण्यासाठी गोंधळ नृत्य, कोळी नृत्य, लावणी, तसेच वारी परंपरेवर आधारित सादरीकरणे यांचा समावेश असलेले सुमारे १५ ते २० कलाकारांचे पथक सहभागी होणार आहे.

या कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ?ड. आशिष शेलार यांची असून यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांचे मार्गदर्शन आहे, या उपक्रमांद्वारे महाराष्ट्र राज्याचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि लोकपरंपरेचे वैभव राष्ट्रीय तसेच आंतरराज्यीय पातळीवर प्रभावीपणे सादर होणार आहे.

## नागपूरकडे जाणाऱ्या एसटींना ब्रेक
## बच्चू कडूंच्या मोर्चामुळे वाहतूक ठप्प

**वर्धा जनमाध्यम :** माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या महा एल्गार ट्रॅक्टर मोर्चाने मंगळवारी नागपूर जिल्ह्यात धडक दिल्याने वाहतूक व्यवस्था बुधवारीही विस्कळित झाली आहे. आंदोलकांनी हिंगणा, बुटीबोरी आणि खापरी परिसरात रास्ता रोको केल्याने वर्धा, हिंगणघाट आणि पुलगाव आगारातील बसफेऱ्यांवर तोड पडली. हिंगणघाट व पुलगावच्या पाच बसेस जामठा येथे अडकल्या असून, एका दिवसात सुमारे दोन लाख पंच्याऐंशी हजारांचा फटका तिन्ही आगारांना बसला आहे.वर्धा शहरातील धुनिवाले चौकात पोलिसांनी प्रवाशांना नागपूर प्रवास टाळण्याचे आवाहन केले. आंदोलनामुळे वर्धा विभागातील १५० बसफेऱ्या नागपूरसाठी धावतात, मात्र सर्व फेऱ्या रद्द कराव्या लागल्या.

दुपारी काही बसेस हिंगणा मार्गे सोडल्या, पण आंदोलकांनी तोही मार्ग बंद केल्याने वाहतूक पुन्हा ठप्प झाली.पुलगाव आगारातील नागपूरसाठी नियमित सहा बसफेऱ्यांबरोबरच दिवाळीनिमित्त वाढवलेल्या फेऱ्याही थांबल्या. हिंगणघाट आगारातून ४२, वर्धा आगारातून ३० फेऱ्यांचे नियोजन होते. परंतु



रस्ते जाम असल्याने सर्वच बसफेऱ्या रद्द करण्यात आल्या. जामठा येथे अडकलेल्या बसमधील प्रवाशांना पिण्याचे पाणी मिळाले नाही, काहींनी इतर वाहनांतून सुटका करून घेतली. चालक-वाहक मात्र अन्न-पाण्याविना अडकून असल्याचे परिवहन अधिकाऱ्यांनी सांगितले.नांदेड-नागपूर या लांब पल्ल्याच्या बस वर्धेवरच वळवण्यात आल्या तर पांढरकवडा मार्गावरील सर्व फेऱ्याही रद्द करण्यात आल्या. वाढत्या गोंधळामुळे पोलिसांनी खबरदारी घेत प्रवाशांना आज नागपूरकडे जाणे टाळण्याचा सल्ला दिला आहे.

### -वर्धा विभागाला ३ लाखांचा तोटा

## नागपूरकडे जाणारे मार्ग ठप्प
## बच्चू कडूंच्या शेतकरी कर्जमाफी आंदोलनाने राज्याची वाहतूक विस्कळीत

**समुद्रपूर जनमाध्यम :** संपूर्ण शेतकरी कर्जमाफीच्या मागणीसाठी प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या तीव्र आंदोलनाचा फटका बुधवारी वाहतूक व्यवस्थेला बसला. नागपूरकडे जाणारे सर्व प्रमुख मार्ग ठप्प झाल्याने जाम चौकासह परिसरातील रस्त्यांवर वाहनांच्या



लांबलचक रांगा लागल्या. आंदोलनासाठी निघालेल्या वाहनांमध्ये अडकलेले अनेक शेतकरी तासन्?तास रस्त्यावरच थांबले. अखेर वाहनातून उतरून ते चौरस्त्यावर बसले, त्यामुळे वाहतूक पूर्णपणे खोळंबली. चारही बाजूंनी गाड्यांचे साचलेले ओघळ नागरिकांना त्रासदायक ठरले.गेल्या अनेक दिवसांपासून बच्चू कडू शेतकरी कर्जमाफी, शेतीसंबंधी अडचणी आणि शेतकऱ्यांच्या विविध मागण्यावर ठाम आहेत. शासनाच्या दुर्लक्षामुळे त्यांनी राज्यभरातून आलेल्या शेतकरी, मजूर, दिव्यांग, मच्छीमार आणि मेंढपाळ बांधवांसह नागपूरच्या सीमेवर ठिय्या सत्याग्रह सुरू केला.या तीव्र आंदोलनामुळे नागपूरची सर्व वाहतूक ठप्प झाली असून उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, ठाणेदार रवींद्र रेवतकर, पोलीस उपनिरीक्षक चेतन टेंभुरने, गिरीश मोहतुरे व अनिल वाघमारे यांनी तातडीने घटनास्थळी दाखल होत पोलिसबलासह परिस्थिती नियंत्रणात आणली. नागपूरकडे जाणारी वाहतूक उमरेडमार्गे वळवण्यात आली.

### महाएल्गार आंदोलनाचा तडाखा
## नागपूर- वर्धा मार्गावर समृद्धीसह तुळजापूर महामार्ग ठप्प

### -शेतकरी मागण्यांवर शासन मौन

**वर्धा जनमाध्यम :** शेतकऱ्यांच्या कर्जमाफी, हमीभाव आणि शेतीखर्च कमी करण्याच्या मागण्यांसाठी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले महाएल्गार आंदोलन आता नागपूरच्या सीमेवर पेटले आहे. हजारो शेतकऱ्यांनी महामार्गावर ठिय्या मांडल्याने समृद्धी महामार्ग, नागपूर–तुळजापूर आणि नागपूर–हैदराबाद मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे.चार पदरी महामार्गावर दोन्ही बाजूंनी वाहनांची लांबच लांब रांग लागली असून, फळभाज्या, धान्य आणि जीवनावश्यक वस्तू घेऊन जाणारी ट्रकसुद्धा अडकल्या आहेत. या ठप्प झालेल्या मार्गांमुळे व्यापार आणि



बाजारपेठांवर मोठा परिणाम झाला आहे. प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून वाहनांचा तात्पुरता थांबा जाहीर केला आहे. परिणामी वाहतूक कोंडी वर्धा जिल्ह्यातील सेलूपर्यंत पोहोचली असून, नागरिक व वाहनचालक दोघांनाही त्रास सहन करावा लागत आहे.दरम्यान, आंदोलनाची झळ वर्ध्यापर्यंत पोहोचल्याने पोलिसांचा मोठा फौजफाटा महामार्गावर रवाना करण्यात आला आहे. समृद्धी महामार्गासह सर्व मुख्य मार्गांवर बंदोबस्त घट्ट करण्यात आला आहे. शासनाशी चर्चेचा प्रयत्न सुरू असून, अद्याप समाधानकारक तोडगा निघालेला नाही.शेतकरी नेत्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर शासनाने तात्काळ निर्णय घेतला नाही, तर आंदोलन राज्यभर थैमान माजवेल. शासनाच्या दुर्लक्षामुळे जनतेत तीव्र नाराजी आहे.

## ग्रामीण औद्योगिक विकासात 'एमगिरी'चा देशव्यापी ठसा : डॉ. आशुतोष मुरकुटे

### -नवतंत्रज्ञानातून शेतकरी व महिला वर्गात सकारात्मक परिवर्तन

**वर्धा जनमाध्यम :** ग्रामीण औद्योगिक तंत्रज्ञान विकास, कौशल्य प्रशिक्षण आणि उद्यमिता वृद्धीच्या क्षेत्रात 'एमगिरी'ने देशभरात उल्लेखनीय कार्य केले आहे. महात्मा गांधी ग्रामीण औद्योगीकरण संस्था (एमगिरी) वर्धा येथील संचालक डॉ. आशुतोष मुरकुटे यांनी ही माहिती दिली. ते नुकत्याच एमगिरीत आयोजित राष्ट्रीय जागरूकता कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. एमगिरीच्या जैव-प्रक्रिया व औषधी वनस्पती विभाग आणि माही नॅशनल को-ऑपरेटिव्ह फेडरेशन ऑफ एफपीओज, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने 'एमगिरी द्वारा विकसित तंत्रज्ञानावर आधारित उद्यमिता विकासाच्या संधी' या



विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमात देशातील विविध सहा राज्यांतील एफपीओ फेडरेशन संचालकांनी सहभाग नोंदवला.डॉ. मुरकुटे म्हणाले की, पूर्वोत्तर राज्ये आणि लेह-लडाख भागात नैसर्गिक संसाधनांच्या मूल्यवर्धनासाठी आणि स्थानिक रोजगारनिर्मितीसाठी एमगिरीने महत्त्वपूर्ण प्रयत्न केले आहेत. संस्थेच्या नवतंत्रज्ञानामुळे ग्रामीण महिलांना आणि शेतकऱ्यांना नव्या आर्थिक उंचीवर नेण्यास मदत होत असल्याचे त्यांनी नमूद केले.भारतीय किसान संघाचे अखिल भारतीय संघटनमंत्री दिनेश कुलकर्णी यांनी या वेळी सांगितले की, एमगिरीचे शास्त्रज्ञ हे केवळ तंत्रज्ञ नव्हे तर समाजपरिवर्तनाचे वाहक आहेत. त्यांच्या संशोधनातून गावागावात तंत्रज्ञान पोहोचत असून, शेतकऱ्यांना फक्त उत्पादनापुरते न ठेवता व्यापार व मूल्यवर्धनाच्या दिशेने प्रेरणा मिळत आहे.कार्यक्रमात संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष साई रेड्डी, अ. भा. रोजगार प्रमुख कुमारस्वामी आणि माही-नॅशनल को-ऑपरेटिव्ह फेडरेशनचे संचालक ऋषी कुमार यांचीही उपस्थिती होती. सत्रादरम्यान एमगिरीच्या वैज्ञानिकांनी विविध तंत्रज्ञानांवर सादरीकरण केले. त्यानंतर झालेल्या ब्रेनस्टॉर्मिंग सत्रात विविध राज्यांतील संचालकांनी आपल्या भागात एमगिरीच्या तंत्रज्ञानाचा अवलंब कसा करता येईल यावर विचारमंथन केले.कार्यक्रमाचे संचालन डॉ. जयकिशोर छांगाणी यांनी केले, तर आभार प्रदर्शन ऋषी कुमार यांनी केले.

### अमरावती येथे १ व २ नोव्हेंबरला पक्षीमित्र संमेलन
## बहार नेचर फाउंडेशनची संमेलनासाठी सायकलवारी

**वर्धा जनमाध्यम** - अमरावती येथे दि. १ व २ नोव्हेंबर रोजी आयोजित महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनात सहभागी होण्याकरिता बहार नेचर फाउंडेशनचे ११ सदस्य सायकलने गुरूवार, दि. ३० ला रवाना होणार आहेत. दरवर्षी आयोजित विदर्भस्तरीय व राज्यस्तरीय पक्षीमित्र संमेलनात पर्यावरण जनजागृती आणि शाश्वत जीवनशैलीचा संदेश देत सायकलने जाण्याची परंपरा याही वर्षी बहारचे सदस्य कायम ठेवणार आहेत.

निसर्गसंवर्धन, जैवविविधता जनजागृती आणि पर्यावरण शिक्षण या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या बहार नेचर फाउंडेशनने १० वर्षे पूर्ण केली असून अकराव्या वर्षात पदार्पण केले आहे. या निमित्ताने बहारचे ११ सायकलपटू या संमेलनात सहभागी होण्यासाठी दि. ३० रोजी दुपारी १ वाजता स्थानिक शिवाजी चौकातून प्रस्थान करतील. बहारचे संस्थापक अध्यक्ष तथा सायकलवारीचे प्रेरणास्त्रोत प्रा. किशोर वानखडे यांच्यासह डॉ. बाबाजी घेवडे, जयंत सबाने, राजदीप राठौर, दर्शन दुधाने, अतुल शर्मा, सुषमा शर्मा, मनेशकुमार सज्जन, डॉ. लोकेश तमगिरे, ॲड. प्रसाद सोईतकर आणि हेमंत धानोरकर यांचा या सायकल यात्रेत सहभाग आहे.

बहारची ही सायकलिंग टीम पहिल्या दिवशी आर्वी येथे मुक्काम करणार आहे. दि. १ नोव्हेंबरला सकाळी ही चमू संमेलनस्थळी दाखल होईल. या प्रवासादरम्यान बहारचे सदस्य विद्यार्थी तसेच नागरिकांशी पर्यावरण संरक्षणाबाबत संवाद साधणार आहेत.



**सायकलचा वापर आरोग्यदायी व पर्यावरणपूरक**

'सायकल चालविल्याने केवळ कार्बन उत्सर्जन कमी होत नाही, तर आपण निसर्गाच्या अधिक जवळ जातो. या प्रवासातून आम्ही लोकांना पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्यासाठी प्रेरित करू इच्छितो.'

**-डॉ. बाबाजी घेवडे**
अध्यक्ष, बहार नेचर फाउंडेशन, वर्धा

### मी..प्रथम शेतकरी पुत्र, नंतर भाजप आमदार'
## आ.राजेश बकाने यांनी दिला शेतकरी आंदोलनाला पाठिंबा

**वर्धा जनमाध्यम :** नागपुरातील प्रहार संघटनेच्या 'महा एल्गार ट्रॅक्टर मोर्चा'ने राज्याच्या राजकीय वर्तुळात नव्या हालचालींना सुरुवात केली आहे. या मोर्चाला देवळीचे भाजप आमदार राजेश बकाने यांनी दिलेला अप्रत्यक्ष पाठिंबा आता चर्चेचा विषय ठरला आहे.बकाने हे मंगळवारी रात्री नागपुराकडे जात असताना देवळी तालुक्यात शेतकऱ्यांचा मोर्चा पाहून थांबले. त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत मी प्रथम शेतकरी पुत्र, नंतर भाजप आमदार, असे सांगत आपल्या भूमिकेची स्पष्ट दिशा दाखवली. या एका वाक्याने राजकीय




वातावरणात खळबळ उडाली.

यावेळी बकाने यांनी प्रहार संघटनेचे संस्थापक आणि माजी आमदार बच्चू कडू यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या हमीभाव, कर्जमुक्ती आणि इतर मागण्यांवर चर्चा केली. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. आतापर्यंत आठ हजार कोटींची मदत दिली असून आणखी दहा हजार कोटींच्या अनुदानासाठी तयारी सुरू आहे, असे बकाने यांनी स्पष्ट केले.मध्यरात्री गर्दीतून वाट काढत आमदारांनी घेतलेल्या या भेटीने सोशल मीडियावर चर्चेचा वादळ उठले आहे.

समर्थकांनी त्यांचे कौतुक केले, तर काहींनी हा भाजपमधील अंतर्गत असंतोषाचा संकेत असल्याचे मत व्यक्त केले.शेतकरी नेते सचिन डाफे यांनी बकाने यांच्या भूमिकेचे स्वागत करत म्हटले, हा पाठिंबा शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवणारा आहे. आता या मागण्या थेट विधानभवनात पोहोचाव्यात. देवळीच्या या घटनाक्रमाने शेतकरी आंदोलनाला नवा राजकीय सूर प्राप्त झाला असून, बकाने यांच्या वाक्याने शेतकऱ्यांना बळ मिळाला आहे,

## बेद लेआउटमध्ये ऐतिहासिक किल्ल्याची उभारणी

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र ही किल्ल्यांची भूमी म्हणून ओळखली जाते. या ऐतिहासिक परंपरेचा वारसा जपण्यासाठी बेद लेआउट, व्हीआयपी रोड येथील बँक कर्मचारी प्रीती ऋषभ जाजू यांनी आपल्या निवासस्थानाच्या अंगणात एक आकर्षक किल्ला उभारून परिसरात विशेष उदाहरण निर्माण केले आहे.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेवर आधारित हा किल्ला तयार करताना जाजू यांनी परिसरातील लहान मुलांना मराठ्यांच्या शौर्याचा व शिवसंस्कृतीचा परिचय करून दिला. या उपक्रमात त्यांना त्यांच्या कन्या अंतरा जाजू यांच्यासह दीप लड्ढा, कृष्णा शर्मा, पार्थ शर्मा आणि इस्पिता शर्मा या बालमित्रांचा उत्साही सहभाग लाभला.या किल्ल्यामुळे समाजात इतिहासाबद्दल आकर्षण वाढले असून या परिसरामध्ये दिवसभर मुले आणि नागरिकांचे पाहण्यासाठी गर्दी करताना दिसत आहेत. या प्रयत्नाबद्दल समाजातील सर्व स्तरातून जाजू कुटुंबाचे कौतुक होत आहे.

## रेल्वे क्रॉसिंगवरील उंच गतिरोधक ठरला दुचाकीस्वारासाठी धोकादायक

### -अपघातात तरुण जखमी; तत्पर पत्रकारांनी दाखवली मदत

**देवळी जनमाध्यम :** वर्धेकडून देवळीकडे राष्ट्रीय महामार्गाने जात असलेल्या वर्धा येथील दुचाकीस्वाराचा रात्री साडेआठच्या सुमारास देवळी रेल्वे क्रॉसिंगजवळ अपघात झाला. रुळाच्या अगोदर असलेला उंच गतिरोधक अंधारात न दिसल्याने दुचाकी अनियंत्रित होऊन थेट पटरीवर घसरली. यात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. अपघातानंतर मागून येणाऱ्या काही पत्रकारांनी तत्परता दाखवत आपल्या वाहनांना थांबवले व जखमीला सुरक्षित ठिकाणी हलविले. घटनेची माहिती मिळताच सेलसुराचे भोर्जेकर यांनी रुग्णवाहिका घेऊन घटनास्थळी धाव घेतली व जखमीस सावंगी येथील रुग्णालयात दाखल केले.दरम्यान, या क्रॉसिंगवर गेल्या काही महिन्यांत असे अनेक अपघात झाले असून नागरिकांनी प्रवासी सुरक्षेचा प्रश्न अनेकदा उपस्थित केला आहे. रात्री उंच गतिरोधक स्पष्ट दिसत नसल्याने दुचाकीस्वार व चारचाकी वाहनचालकांना धोका निर्माण होत आहे. तरीदेखील रेल्वे विभागाकडून अद्याप आवश्यक दखल घेण्यात आलेली नाही, अशी नाराजी स्थानिक रहिवाशांनी व्यक्त केली.

## मित्रावर ठेवलेल्या विश्वासाचा गैरफायदा

### -बँक खात्याचा गैरवापर करून जीवे मारण्याची धमकी

**-८० हजारांच्या खंडणीची मागणी, सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल**

**वर्धा जनमाध्यम :** मित्रावर ठेवलेल्या विश्वासाचा गैरफायदा घेऊन त्याच्याच नावाने उघडलेल्या बँक खात्याचा गैरवापर करून नामांकित भागातील तरुणाला जीवे ठार करण्याची धमकी देत तब्बल ८० हजार रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आल्याचे धक्कादायक प्रकरण उघडकीस आले आहे. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गौरक्षण भागातील शशांक आटे यांनी मित्र रोशन भोयर (रा. गौरक्षण वार्ड) याच्या विनंतीवरून बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये स्वतःच्या नावाने खाते उघडून काही दिवस वापरण्यासाठी दिले होते.

परंतु विश्वासघात करीत रोशनने हे खाते इतरांच्या व्यवहारांसाठी वापरले. बराच कालावधी उलटल्यानंतर शशांकने पासबुक मागितल्यावर पैसे देण्याच्या बहाण्याने टाळाटाळ सुरू झाली. संशय आल्यावर शशांकने नाव बदलून नवे पासबुक मिळवत खात्याची उपलब्ध शिल्लक तपासली. या दरम्यान खात्यात जमा झालेले पैसे वेगवेगळ्या व्यक्तींनी पाठविल्याचे निदर्शनास आले.

शशांकने त्यांना पैसे परत देण्याची तयारी दाखविली असता संबंधितांनी उलट जीवे ठार करण्याची धमकी देत ८० हजार रुपयांची खंडणी मागितली. या घटनेने त्रस्त झालेल्या शशांकने थेट शहर पोलिसांकडे धाव घेत तक्रार नोंदविली. पोलिसांनी रोशन भोयर, रोहित जांगडे, सय्यद फरमान अली, चाँद पठाण (रा. पुलफैल), परवेज उर्फ फर्रू (रा. नागपूर) आणि आसिफ शेख (रा. पुलफैल) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## झाड तोडल्यावर नगरपरिषदेची झोप उडाली ; दोषींवर आज करणार गुन्हा दाखल

**वर्धा जनमाध्यम :** साई मंदिर रस्त्यावरील दोन झाडांची तोड होताच परिसरातील नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला. अखेर नगरपरिषद प्रशासनालाही झोप उडाली असून अज्ञात तोडखोरांवर आज गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

ही कारवाई मुख्याधिकारी देशमुख यांच्या आदेशानुसार होणार असून, नगरपरिषदेतील कर्मचारी सोमवंशी यांनी याची माहिती दिली. २९ ऑक्टोबर रोजी 'जनमाध्यम' दैनिकात झाडे लावा आणि झाडे तोडा प्रशासनाची नवी योजना या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध होताच प्रशासन हरकत घेण्यास प्रवृत्त झाले. शहरातील पर्यावरणप्रेमी नागरिकांनी प्रशासनाच्या कारवाईचे स्वागत केले आहे, परंतु भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

e paper www.janmadhyam.com ■ गुरुवार ३० आक्टोबर २०२५





## मंत्री बच्चू कडूंच्या भेटीला भरपावसात रस्त्यावरच चर्चा



**नागपूर/प्रतिनिधी :** शेतकरी कर्जमुक्तीसह विविध मागण्यांसाठी आंदोलन करत असलेल्या बच्चू कडू आणि इतर शेतकरी नेत्यांची सरकारच्या शिष्टमंडळाने भेट घेतली. मंत्री आशिष जयस्वाल, पंकज भोयर यांनी बच्चू कडू, अजित नवले, राजू शेट्टी यांच्यासोबत चर्चा केली. यावेळी शिष्टमंडळाने चर्चेसाठी येण्याची विनंती केली. त्याला बच्चू कडू यांनी होकार दिला. चर्चा करून येईपर्यंत आंदोलकांना धक्का लागणार नाही, याची जबाबदारी सरकारची असेल, असे शेतकरी नेते शिष्टमंडळाला म्हणाले. त्याला सरकारने हमी दिली. मंत्री आशिष जयस्वाल, मंत्री पंकज भोयर यांनी बच्चू कडू, अजित नवले, राजू शेट्टी, रविकांत तुपकर यांच्याशी चर्चा केली. सरकारच्या शिष्टमंडळाने आंदोलक नेत्यांना मुंबईत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्यासाठी मुंबईला बैठकीला येण्याची विनंती केली.

### आम्हाला चुना लावला तर सोडणार नाही, सरकारला इशारा



शिष्टमंडळासोबत चर्चा केल्यानंतर बच्चू कडू यांनी उपस्थित आंदोलकांशी चर्चा केली. त्यानंतर बच्चू कडू म्हणाले की, आपल्याला चर्चा करावी लागेल. चर्चा केल्याशिवाय तोडगा निघणार नाही. मी मंत्री म्हणून काम केले आहे. चर्चेशिवाय मार्ग निघणार नाही. पण, आपल्याला पूर्ण तोडगा निघाल्याशिवाय आंदोलन थांबवायचं नाही. जर तोडगा निघाला नाही किंवा आम्हाला चुना लावण्याचा प्रयत्न केला, तर आल्यानंतर थेट रेल रोको करणार असा इशारा बच्चू कडूंनी दिला.

**गुरुवारी मंत्रालयात बैठक-** शिष्टमंडळासोबत झालेल्या चर्चेनंतर गुरुवारी (२९ ऑक्टोबर) मंत्रालयात बैठक होणार असल्याचे निश्चित झाले. आंदोलक नेते आणि मुख्यमंत्र्यांची बैठक होणार आहे. त्यासाठी आंदोलक नेते सकाळी ११ वाजता मुंबईला रवाना होणार आहेत. यावेळी अजित नवले म्हणाले की, आम्ही आंदोलन ठिकाणावरून पुढे आलो आहोत. त्यामुळे न्यायालयाचा अवमान झालेला नाही. पण, जर न्यायालयाचा वापर करून जर आंदोलन दडपण्याची प्रक्रिया यापुढेही सुरू ठेवली, तर जेलला आम्ही घाबरत नाही. आमची जेलमध्ये जायची तयारी आहे. भगतसिंगांची अवलाद आहोत, पाहिजे ते करण्याची तयारी आहे, असा संदेश आम्ही मुख्यमंत्री सरकारला देत आहोत, असे अजित नवले म्हणाले.

## 'आम्हाला जेलमध्ये टाका' शेतक-यांचा मोठा आक्रोश !

### सुरुवात फडणवीसांनी केली, शेवट आम्ही करणार

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यातील महायुती सरकारविरोधात मोठ्या संख्येने शेतकरी रस्त्यावर उतरले आहे. बच्चू कडू यांच्या नेतृत्वात हजारो शेतकयांनी रस्त्यावर ठिय्या दिला आहे. या मोर्चात प्रमुख शेतकरी नेते सहभागी झालेत. त्यात माजी मंत्री महादेव जानकर यांनी आक्रमक भाषण करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. देवेंद्र फडणवीस सुरुवात तुम्ही केली, शेवट आम्ही करणार..जेलमध्येही जायला आम्ही तयार आहोत पण मागे हटणार नाही असा इशाराच त्यांनी मोर्चातून सरकारला दिला.महादेव जानकर म्हणाले की, सरकार बदलल्याशिवाय देवेंद्र फडणवीस यांना शांत बसू देणार नाही. महाराष्ट्रात आम्ही मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरू. आम्ही लोकशाही मार्गाने मोर्चा काढतोय, तो कुणाला दिसत नाही. जनता कोर्ट आहे. जोपर्यंत नेते सांगत नाहीत, तोपर्यंत आंदोलन थांबणार नाही. महाराष्ट्रातील एकही जेलमध्ये रिकामे ठेवणार नाही. आमच्या माणसांना घेउन जावा, आम्ही जेलमध्ये जायला तयार आहोत. सरकार मागे हटतंय की आम्ही हटतोय हे आम्हाला बघायचे आहे. देवेंद्र फडणवीस तुमचा बिस्तारा नागपूरला आणल्याशिवाय आम्ही शांत राहणार नाही असा इशारा त्यांनी दिला.तर पोलिसांनी कोर्टाचा आदेश आपल्याला आणून दिला. सहा वाजायच्या आत रस्ता रिकामा करा असा आदेश दिलाय. आदेश देणायांना इंग्रजांनी काढलंय का हे आम्हाला माहिती नाही. आदेश देताना संदर्भ एका इंग्रजी पेपरचा घेतलेला आहे. एकाबाजूने सरकार चर्चेस तयार आहे असं सांगते, दुसया बाजूला कोर्टाची ऑर्डर येते. शिखंडीचा डाव सरकारमधील कुणी खेळत असेल तर त्यांच्या कमरेला चड्डीही शिल्लक राहणार नाही हे लक्षात ठेवावे. आम्ही संविधानाचा आदर करतो पण न्यायव्यवस्थेनेही जबाबदारीने वागले पाहिजे असं जबाबदार नागरीक म्हणून सांगतोय. न्यायव्यवस्था भरकट चाललीय का असा प्रश्न निर्माण होतो. भविष्यात सगळ्या प्रश्नांची उत्तरे सरकारला द्यावी लागतात. आम्ही दोन्ही हात वर करून सरेंडर व्हायला तयार आहोत. तुम्ही आम्हाला जेलमध्ये घेउन जा असं आव्हान शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी दिले. दरम्यान, आंदोलन आता संपले नाही, असेच सुरू राहणार आहे. मैदान कुणीही सोडणार नाही. पाठ दाखवून कुणी जायचे नाही. कोर्टालाही निर्णय देताना जाण झाली



पाहिजे. आजही आम्ही न्याय व्यवस्थेचा आदर करतो. पण न्याय व्यवस्था अशीच पुढे राहिली तर कोर्टासमोर आंदोलन उभं करावे लागेल. रोज शेतकरी मरतायेत त्यावर कुणी बोलत नाही. ज्या ताकदीने पोलीस येतील, त्या ताकदीने आम्ही शरण जाउ. पोलिसांनी आम्हाला अटक करून दाखववी असं बच्चू कडू यांनी सरकारला इशारा दिला.

## आंदोलकांनी रेल रोको, रास्ता रोको, चक्काजाम अशा गोष्टी करू नयेत



**पुणे /प्रतिनिधी-** शेतक-यांच्या कर्जमाफीसाठी प्रहार जनशक्ती पार्टीचे प्रमुख बच्चू कडू यांनी नागपूरमध्ये आंदोलन सुरू केलं आहे. या आंदोलनावर व शेतक-यांच्या मागण्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. फडणवीस म्हणाले, शेतकयांच्या आंदोलनाबाबत सरकार पहिल्या दिवसापासून सकारात्मक भूमिकेत आहे. पण आंदोलकांनी लोकांना त्रास होईल असं काहीही करू नये. अशा प्रकारच्या आंदोलनात काही हौसे नवसे गवसे शिरतात. अर्थात या आंदोलनात शेतकरी देखील आहेत. परंतु, अनेक लोक, वेगवेगळ्या प्रवृत्ती आंदोलनात शिरून आंदोलनाला हिंसक वळण कसं देता येईल यासाठी प्रयत्न करतात. त्यामुळे सावध राहणं आवश्यक आहे. आंदोलकांनी रेल रोको, रास्ता रोको, चक्काजाम अशा गोष्टी करू नयेत.

## शेतक-यांच्या प्रश्नांबाबत शासन सकारात्मक:मुख्यमंत्री

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यातील शेतक--यांच्या प्रश्नांबाबत शासन सकारात्मक असून ३२ हजार कोटींचे मदतीचे पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. तसेच शेतक--यांच्या खात्यावर पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना सांगितली. नीती आयोगाच्या वतीने देशाचा आधुनिक उत्पादन प्रकल्पाबाबत व्यापक आराखडा तयार करण्यात आला आहे त्याच्या अनावरण कार्यक्रमासाठी ते येथे आले होते. त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले शेतक-यांचे प्रश्न आंदोलन करून सुटणार नाहीत तर त्याची सोडवणूक चर्चेच्या माध्यमातून करण्यात येईल. मध्यंतरीच्या जोरदार पावसामुळे शेतीचे आणि पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतक-यांना योग्य ती नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. त्याचा एक भाग म्हणजे शेतक-यांच्या खात्यावर पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे. यासाठी प्रदेशाध्यक्ष आणि मंत्री बावनकुळे हे त्यांच्या संपर्कात आहेत. उत्पादन प्रकल्पाबाबत केंद्र महाराष्ट्रात व्हावे यासाठी शासन योग्य ते सहकार्य करण्यास तयार आहे असे नमूद करून ते म्हणाले, या नियोजित केंद्रामुळे रोजगारनिर्मितीला आणखी चालना मिळणार आहे.



## सरकारने न्यायालय विकत घेतले-बच्चू कडू

**नागपूर/प्रतिनिधी :** रस्त्यावर ठिय्या मांडून बसलेल्या आंदोलकांना न्यायालयाने रस्ता मोकळा करण्यास सांगितल्याने आंदोलक संतप्त झाले आहे. ते आंदोलन करण्यावर ठाम आहे, आम्हाला कारागृहात टाका,असे बच्चू कडू यांनी सांगितले व रात्री ते आंदोलकांसह स्वतःला अटक करून घेण्यासाठी शहराच्या दिशेने निघाले. दरम्यान सरकारने न्यायालय विकत घेतले आहे,अशी प्रतिक्रिया त्यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्तकेली.संपूर्ण कर्जमाफीच्या मागणीसाठी मंगळवारपासून बच्चू कडू यांच्यासह हजारो शेतकरी नागपूर हैदराबाद महामार्गावर ठाण मांडून बसले होते. त्यामुळे वाहतूक ठप्प झाली होती. प्रवाशांची गैरसोय झाली होती. दुसया दिवशीही हिच स्थिती होती. नागपूर उच्च न्यायालयाने याची दखल घेउन आंदोलकांना रस्ता मोकळा करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस आंदोलकांना हटवण्यासाठी गेले असता आंदोलकांनी त्याला विरोध केला. बच्चू कडू यांनीही आम्ही आंदोलनावर ठाम असल्याचे सांगत न्यायालयाच्या निर्मयाचा आदर करीत आहो असे स्पष्ट केले. आम्हाला अटक करा,असे त्यांनाी सांगतले व रात्री ते आंदोलकांसह स्वतःला अटक करून घेण्यासाठी नागपूरकडे निघाले होते. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी न्यायालयाच्या निर्णयावर भाष्य केले. ते म्हणाले सरकारने न्यायालय विकत घेतले आहे.

## वडेट्टीवार यांना आयकर विभागाची नोटीस

### ओबीसी मोर्चाच्या घोषणेनंतर तपास यंत्रणांच्या रडारवर

**मुंबई/प्रतिनिधी :** काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांना आयकर विभागाने नोटीस पाठवली आहे. विजय वडेट्टीवार यांनी एका कार्यक्रमात बोलताना ही माहिती दिली. नागपूरमध्ये ओबीसी आरक्षणाच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी काढण्यात आलेल्या मोर्चाआधी ही नोटीस मिळाल्याचे विजय वडेट्टीवार म्हणाले.गडचिरोली येथे सोमवारी जिल्ह्यातील अनेक महत्त्वाच्या नेत्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. गडचिरोली नगर परिषदेचे माजी



अध्यक्ष सुरेश सावकर पो-रेड्डीवार, कविता पोरेड्डीवार, विजय गोरडवार, माजी जिल्हा परिषद सदस्य लालसू पोगती आणि शिवसेनेचे गजानन नईअम यांनी शेकडो समर्थकांसह काँग्रेसमध्ये दाखल झाले. या कार्यक्रमात बोलताना विजय वडेट्टीवार यांनी ओबीसी आरक्षणाच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी नागपुरात मोठ्या मेळाव्याची घोषणा केल्यानंतर लगेचच आयकर नोटीस बजावण्यात आल्याचे सांगितले.ओबीसी आरक्षणाच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी नागपुरात मोठ्या मेळाव्याची घोषणा केल्यानंतर लगेचच आयकर नोटीस बजावण्यात आली, लोकांसाठी उठवलेला आवाज दाबण्यासाठी सरकार त्यांच्या एजन्सींचा गैरवापर करत आहे असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. ही नोटीस म्हणजे ओबीसी आणि सामान्य लोकांच्या हक्कांसाठी उभे राहणा-यांना धमकावण्याचा स्पष्ट प्रयत्न आहे. पण आम्ही गप्प बसणार नाही, असा इशारा विजय वडेट्टीवार यांनी सरकारला दिला.

## साईबाबांच्या दर्शनासाठी जातांना नाशिकजवळ अपघात; 3 ठार, 2 गंभीर

**नाशिक/ प्रतिनिधी-** नाशिक जिल्ह्यातील येवला तालुक्यात साईभक्तांच्या फार्च्युनर गाडीचा भीषण अपघात झाला असून ३ जणांचा मृत्यू, तर ४ जण गंभीर जखमी झाले आहेत. सुरतवरून शिर्डीकडे साईबाबांच्या दर्शनासाठी येत असताना एरंडगाव रायते शिवार परिसरात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. हा अपघात एवढा भीषण होता की



फार्च्युनर गाडीचे पुढील व मागील दोन्ही भाग पूर्णपणे चक्काचूर झाले आहेत. स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदतकार्य सुरू करून जखमींना बाहेर काढले, तर पोलिसांनी अपघाताचे कारण शोधण्यासाठी तपास सुरू केला आहे. उपचारासाठी नाशिकला नेत असताना एका जखमीने मार्गातच प्राण सोडला. त्यामुळे मृतांची संख्या तीनवर पोहोचली आहे. उर्वरित चार जण नाशिकमधील खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यापैकी दोन जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डाक्टरांनी सांगितले. पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून अपघातग्रस्त वाहन रस्त्याच्या बाजूला हलवण्यात आले आहे. वाहतूक सुरळीत करण्यात आली असून घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी वाहनाची तांत्रिक तपासणीही केली जाणार आहे. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे त्या रस्त्यावरील धोकादायक वळणांवर चेतावणी फलक आणि स्पीडब्रेकर्स बसवण्याची मागणी केली आहे.

## भाभा अणुसंशोधन केंद्रात आदिल, अख्तरची हेरगिरी!

### संवेदनशील माहिती परदेशी पाठविली; आदिलची कबुली

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताच्या अणुसंशोधनामधील महत्त्वाचं नाव असलेल्या भाभा अणुसंशोधन केंद्राची हेरगिरी करण्याचा मोठा डाव उधळला गेला आहे. दिल्ली पोलिसांनी अटक केलेल्या आदिल हुसेन आणि त्याचा भाउ अख्तर हुसेन या दोन आरोपींच्या केलेल्या चौकशीमधून हेरगिरी संदर्भात धक्कादायक माहिती समोर आली आहे. आदिल हुसेन आणि अख्तर हुसेनी हे आरोपी आपण मुंबईतील भाभा अणुसंशोधन केंद्रात शास्त्रज्ञ असल्याची बतावणी करत होते. या दोघांनीही बनावट ओळखीच्या माध्यमातून संवेदनशील माहिती परदेशी संस्थांना पाठवल्याचा आणि त्यांचा संबंध आयएसआयचे हँडलर्स आणि इराणमधील अणुसंस्थेशी असल्याचा आरोप आहे. आदिल आणि अख्तर या भावांनी भाभा अणुसंशोधन केंद्राची चीनी बनावट ओखळपत्रं बनवली होती. या ओळखपत्रांच्या मदतीने ते अणुकेंद्रात



प्रवेश मिळवण्याच्या प्रयत्नात होते. मात्र त्यांचा हा डाव यशस्वी होण्यापूर्वीच पोलिसांनी त्यांना बेड्या ठोकल्या आहेत. आरोपी स्वतः शास्त्रज्ञ असल्याचे भासवण्यासाठी भाभा आणुसंशोधन केंद्राचा लोगो आणि इतर अधिकृत कागदपत्रांच्या बनावट प्रति तयार करायचे, अशी माहितीही पोलिसांनी दिली.आरोपींकडे करण्यात आलेल्या सखोल चौकशीमधून ही टोळी आयएसआयचे हँडलर्स, इराणमधील अणूसंस्था आणि रशियाच्या गुप्तहेर यंत्रणेच्या संपर्कात होती, अशी माहिती समोर आली आहे. स्पेशल सेलने दिलेल्या माहितीनुसार आदिल सय्यद हा आदिल हुसेन, मोहम्मद आदिल हुसेन आणि नसीमुद्दीन यांसारख्या अनेक नावांनी काम करत होता. पोलिसांनी केलेल्या चौकशीमध्ये आदिल याने भावासोबत मिळून बनावट ओळख बनवून संवेदनशील माहिती परदेशात पाठवल्याचं मान्य केलं आहे. आरोपींकडून अनेक गोपनीय कागदपत्रे आणि इलेक्ट्रानिक डिव्हाईसही पोलिसांच्या हाती लागले आहेत, त्यांचा तपास फॉरेन्सिक पथकाकडून सुरू आहे.

## पुण्यातील 'आयटी' इंजिनिअरचा लादेनच्या अल-कायदाशी संबंध!

**पुणे/प्रतिनिधी :** दहशतवाद विरोधी पथक एटीएसने पुण्यातून जुबेर हंगरगेकर या सॉफ्टवेअर इंजिनिअरला अटक केली आहे. जुबेर अल कायदा दहशतवादी संघटनेच्या संपर्कात असल्याचा संशय आहे. २७ ऑक्टोबरला पुण्यातील कोंढवा परिसरातून त्याला अटक करण्यात आली. जुबेर



हंगरगेकरकडे कुख्यात दहशतवादी लादेनच्या भाषणाचे उर्दू भाषांतर सापडले. त्याशिवाय हंगरगेकर जवळ अल कायदा इन्स्पायर मासिकातील एके ४७ रायफलने गोळीबार करण्याची आणि बॉम्ब तयार करण्याच्या पद्धतीचे छायाचित्र व माहिती आढळून आली जुबेरच्या संपर्कात किती कट्टरतावादी तरुण मुले आहेत, त्याने अल-कायद्याचे सदस्य बनण्यासाठी आणखी कोणाची मनधरणी केली, याचा तपास एटीएसकडून केला जात आहे. जुबेर हंगरगेकर उच्चशिक्षित असून आयटी कंपनीत लाखोचे पॅकेज तो घेतो. आरोपी जुबेर हंगरगेकरला ४ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. जुबेर हंगरगेकरने महाराष्ट्राच्या कुठल्या शहरात घातपात घडवण्याचा कट रचलेला? याची माहिती पोलीस गोळा करत आहेत. एटीएसने सोमवारी पुण्यात १० ठिकाणी छापेमारीची कारवाई केली. एटीएसने या कारवाईत १९ लॅपटॉप आणि ४० मोबाइल फोन जप्त केले. जुबेर विरोधात यूएपीएअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. मूळचा सोलापूरचा असलेला जुबेर हंगरगेकर विवाहित आहे. त्याला दोन मुलं आहेत. कल्याणीनगरमधील एका सॉफ्टवेअर कंपनीत नोकरीला आहे.

## माजी क्रिकेटर अझरुद्दीन यांना मंत्रिपद, तेलंगणात उलटफेर!



**हैदराबाद/वृत्तसंस्था-** येत्या ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी अझरुद्दीन यांचा मंत्रिमंडळात समावेश केला जाणार आहे. ११ नोव्हेंबर रोजी ज्युबली हिल्स विधानसभा पोटनिवडणुकीसाठी मतदान होणार आहे. हीच बाब लक्षात घेता अल्पसंख्याक समाजाचे प्रतिनिधित्त्व म्हणून अझरुद्दीन यांना मंत्रिपद दिले जाणार आहे, असे सांगितले आत आहे. ज्युबली हिल्स या मतदारसंघात मुस्लीम मतदारांची संख्या लक्षणीय आहे. ही निवडणूक जिंकायची असेल तर मुस्लिमांची मतं मिळणं गरजेचे आहे. त्यामुळेच काँग्रेसने हा निर्णय घेतल्याचे म्हटले जात आहे. अझरुद्दीन यांना ऑगस्ट महिन्यात काँग्रेसने विधानपरिषदेत आमदारकी दिली होती. अझरुद्दीन हे राज्यपाल नियुक्त आमदार आहेत. त्यांचे नाव सुचवण्याआधी काँग्रेसने कोडांदारम आणि अमेर अली खान यांच्या नावांची राज्यपालांकडे शिफारस केली होती. मात्र राज्यपालांनी या नेत्यांची शिफारस फेटाळून लावली होती. त्यानंतर आंध्र प्रदेश सरकारने कोडांदारम आणि अझरुद्दीन यांचे नाव सुचवले होते. ही शिफारस मान्य केल्यानंतर आता अझरुद्दीन लवकरच मंत्री होतील.

## छगन भुजबळ रुग्णालयात दाखल

**नाशिक/प्रतिनिधी-** राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांना गेल्या काही दिवसांपासून तब्येतीची तक्रार जाणवत होती. सततचा कामाचा ताण आणि थकवा जाणवल्याने त्यांनी वैद्यकीय तपासणीसाठी मुंबईतील प्रसिद्ध जसलोक रुग्णालयात दाखल होण्याचा निर्णय घेतला. भुजबळ यांच्या निकटवर्तीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून त्यांना शरीरात थकवा, अशक्तपणा आणि किंचित छातीत जडपणा जाणवत होता. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून त्यांनी स्वतःच वैद्यकीय तपासणी करण्याचा निर्णय घेतला. नियमित चाचण्यांनंतर डॉक्टरांनी त्यांच्या आरोग्य स्थितीवर




लक्ष ठेवत अँजिओग्राफी करण्याची गरज व्यक्त केली आहे. सध्या भुजबळ यांची प्रकृती स्थिर असून, रुग्णालयात त्यांच्या सर्व तपासण्या केल्या जात आहेत. दरम्यान, छगन भुजबळ हे गेल्या काही आठवड्यांपासून सतत दौ-यावर होते. नाशिक, मुंबई आणि पुणे येथे ते विविध शासकीय बैठका, कार्यक्रम आणि जनसंपर्क दौरे करत होते. त्यामुळे प्रवासाचा थकवा आणि अतिव्यस्त दिनचर्या यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम झाल्याची शक्यता व्यक्तकेली जात आहे. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी त्यांच्या प्रकृतीविषयी चौकशी केली आहे.

## न्यायालयाच्या आदेशानंतरही शेतकरी आंदोलनावर ठाम

**नागपूर/प्रतिनिधी :** शेतकरी आंदोलनाची स्वतःहून दखल घेत न्यायालयाने सायंकाळी सहा वाजेपर्यंत रस्ते मोकळे करण्याचे आदेश दिले. मात्र, या आदेशानंतरही शेतकरी आपल्या मागण्यांवर ठाम आहे.. पोलिसांनी न्यायालयाचे आदेश घेउन आंदोलनस्थळी धाव घेतली, पण आंदोलकांचा विरोध पाहता त्यांना आदेशासह परत जावे लागले.यावेळी शेतकरी नेते बच्चू कडू यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. त्यांनी सांगितले की, आम्ही न्यायालयाच्या आदेशाचे पालन करतो, रस्ते मोकळे करतो, पण आमची व्यवस्था तुरुंगात करा. त्यांनी पुढे प्रश्न उपस्थित केला की, शेतकरी आत्महत्या करतात तेव्हा न्यायालय सरकारला आदेश देत नाही, पण शेतकरी एक दिवस रस्त्यावर उतरले तर तात्काळ आदेश दिले जातात. या दुहेरी निकषाबद्दल त्यांनी आश्चर्य आणि नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, प्रशासनाने परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी अतिरिक्त पोलिस तैनात केले आहेत. शेतकयांच्या मागण्यांबाबत सरकारकडून कोणतीही ठोस भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. त्यामुळे आंदोलन आणखी तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.शेतकयांची संपूर्ण कर्जमाफी तसेच सुमारे २२ विविध मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते आणि माजी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली ट्रॅक्टर आणि बैलगाडी मोर्चा तसेच राष्ट्रीय महामार्गावर ठिय्या आंदोलन दुसया दिवशीही होते. नागपूर-वर्धा मार्गावरील पांजरा येथील कापूस संशोधन केंद्राजवळ शेकडो आंदोलक काल रात्रीभर



मुक्काम ठोकत आणि आज ठिय्या देउन शेतकयांनी आपले आंदोलन सुरू ठेवले. त्यामुळे आज दिवसभर नागपूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक ठप्प होती. आज सकाळी काही आंदोलक रेल्वे रुळांवर उतरले आणि रेल्वे रोको करण्याचा प्रयत्न केला, तर काहींनी नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर टायर जाळत निषेध व्यक्त केला. त्यामुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. दरम्यान, राज्य सरकारने राज्यमंत्री आशिष जयस्वाल आणि पकंज भोयर हे आंदोलनस्थळी येउन शेतकयांशी चर्चा करणार असल्याचे जाहीर केले आहे. काही आंदोलकांनी आसपासच्या शेतात, मोकळ्या जागेत तसेच एनएचएआयतर्फे विकसित केलेल्या ऑक्सीजन-बर्ड पार्कमध्ये प्रवेश करून तेथे ठिय्या दिला आहे. काही शेतकरी विश्रांती घेत असताना, इतरांनी मागण्यांवर ठाम भूमिका कायम ठेवली आहे.

प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते आणि माजी आमदार बच्चू कडू यांच्या समर्थकांनी आज नागपूरात मोठे रेल्वे रोको आंदोलन सुरू केले आहे. समर्थकांनी सकाळपासून रेल्वे ट्रॅकवर उतरून घोषणाबाजी केली असून संपूर्ण वाहतूक विस्कळीत झाली आहे. आंदोलनकर्त्यांनी २२ मागण्यांसाठी हा आंदोलनाचा मार्ग अवलंबला आहे. या मागण्यांमध्ये शेतकयांची संपूर्ण कर्जमाफी, बेरोजगारांना नोकरीच्या संधी, अपंग, विधवा आणि वृद्धांना नियमित अनुदान, तसेच शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील सुधारणा यांचा समावेश आहे.आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, सरकारकडून वारंवार आश्वासन मिळूनही ठोस निर्णय होत नसल्याने त्यांनी रास्ता रोको आणि आता रेल्वे रोको आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# सुरक्षेचा प्रश्न

इंदूरमध्ये भररस्त्यात दोन ऑस्ट्रेलियन महिला क्रिकेटपटूंना झालेल्या छेडछाडीची दखल फार कुठे गांभीर्याने घेतली गेल्याचं दिसत नाही. कप्पेबंद विचार करणाऱ्या आपल्या सवयीमुळे आणि माध्यमांतही विषयवार बंद कप्पे असल्याने असं घडलं असावं. छेडछाड क्रिकेटपटूंची असल्याने सामाजिक - राजकीय विषय हाताळणाऱ्यांच्या दृष्टीने हा विषय क्रीडा क्षेत्राशी संबंधित झाला आणि क्रीडा क्षेत्राशी संबंधित लिखाण करणाऱ्यांच्या दृष्टीने हा विषय स्त्री अत्याचाराचा, म्हणजे सामाजिक ठरला असावा! त्यामुळे हा विषय कोणाचा ना हवा तशी दखल घेतली गेली, ना या घटनेचं गांभीर्य नीट अधोरेखित झालं. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीच्या वेगवेगळ्या वायद्यांनी एकूणच भारतीय सध्या 'सातवें आसमाँ पर' आहेत, असा सगळ्या जगाचा समज झाला आहे. त्यात विविध देशांत दोन-तीन पिढ्या घालवलेल्या भारतीय कुटुंबातील व्यक्ती त्या-त्या देशात वेगवेगळ्या क्षेत्रांत उच्च स्थानी येऊ लागल्या आहेत. त्या प्रत्येक व्यक्तींचा भारतीयांना इतका गर्व वाटतो, की त्यांच्या वर्णनासाठी भारतीयांनी 'भारतीय वंश' नांवाचा नवा वंशच जन्माला घातला आहे!! या सगळ्यांसाठी आपण समाजमाध्यमांवर जो आनंद व्यक्त करतो, तो अनेकदा उन्मादी वाटू लागतो. त्यातून विविध देशांत भारतीयांच्या विरोधात रोष उफाळून येऊ लागला आहे. भारत सरकारने विशेष मोहीम आखून त्यावर काही उपाययोजना करायला हवी. ज्या भारतीयांना जागतिक ओळख आहे, त्यांनी भारतीयांची प्रतिमा सावरायला हवी. ते राहायला बाजूला, उलट इंदूरसारख्या घटना या सगळ्या भारतविरोधी वातावरणात तेल ओतायला कारण ठरतात. भारतात सार्वजनिक जीवन महिलांसाठी फारसं सुरक्षित नाही, असा सल्ला अमेरिका, इंग्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आदी देश आपापल्या देशांतल्या पर्यटकांना देतच असतात. इंदूरमध्ये घडलेल्या घटनेने या पाश्चिमात्य देशांच्या पोकळ आरोपांना विनाकारण पुष्टी मिळते. अपवादात्मक स्वरूपात घडणाऱ्या अशा घटना म्हणजे जणू इथे नियमच आहे, असं वातावरण तयार करायला टपलेल्यांना हाती आयतं कोलीत मिळतं. भारत आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वतःची नवी ओळख स्वतःच्या नव्या सामर्थ्यासह प्रस्थापित करू पाहतो आहे, हे खरंच आहे. आपली अशी ओळख निर्माण करण्यासाठी भारत क्रीडा क्षेत्रातही नवनव्या जबाबदाऱ्या घेण्याच्या तयारीत आहे. रस्त्यावर घडलेल्या एका छोट्याशा घटनेने अशा तयारीत गतिरोध निर्माण होऊ शकतात. ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू म्हणजे काही साध्या पर्यटक नव्हेत. त्यांना आंतरराष्ट्रीय दर्जा आहे. अशा खेळाडूंच्या सुरक्षिततेसाठी काही नियम आहेत. त्या नियमांना छेद देऊनही जर छेडछाडीच्या घटना घडू शकत असतील, तर आंतरराष्ट्रीय महिला खेळाडू भारतात येण्यापूर्वी चारदा विचार करतीलच ना! त्यांना पाठवणारे देशही भारताकडून अपमानास्पद हमीपत्रं लिहून घेतील किंवा सुरक्षेच्या व्यवस्थेची लेखी माहिती पुन्हा पुन्हा मागून घेतील! २०३० मधील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा भारतात, अहमदाबादला आयोजित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. २०३६ च्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांचं यजमान पद स्वीकारण्यास भारत उत्सुक आहे. पॅरा ऑलिम्पिक स्पर्धा भारतात व्हाव्यात यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. या सगळ्या प्रक्रियेला अशा घटनांनी काहीशी खीळ बसते किंवा देश म्हणून वेगवेगळी स्पष्टीकरणं द्यावी लागतात, खात्री द्यावी लागते. एक देश म्हणून आपल्या सगळ्यांसाठी ही शरमेची बाब आहे. भारतीय समाजमनाला तशी जाणीव होणं महत्त्वाचं आहे. माध्यम आणि समाज माध्यमांतून त्याचं प्रतिबिंब तसं दिसायला हवं होतं. दुर्दैवाने ते दिसत नाही, हीच खंत आहे. समाज म्हणून आपण एक नाही. त्यामुळे, अशा घटनांची टोचणी जशी लागायला हवी, तशी आपल्याला लागत नाही. त्यातलं गांभीर्यही समजत नाही. ज्याने केलं, तो ज्या जाती - धर्माचा असेल; जिथे घडलं, ते शहर - राज्य जिथे कुठे असेल; तिथे तसं घडू शकतंच, ती 'त्यांची' जबाबदारी आहे, अशी भावना आपल्या मनात असते. 'आपण' त्यात कुठे नाही, आपला त्याच्याशी काही संबंध नाही, ही 'आपली' धारणा असते. जगालाही माहीत नसतं. त्यांच्यादृष्टीने भारत आणि भारतीय सगळं एकच असतं. प्रश्न आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पाहुण्या क्रिकेटपटूंचा नाही. महिलांच्या सुरक्षिततेचा आहे. तो इथल्या महिलांच्या सुरक्षिततेचाही आहे. इथल्या महिलांची सुरक्षितताच महत्त्वाची वाटत नसेल, तर पाहुण्या महिलांची सुरक्षितता महत्त्वाची कशी वाटेल? त्यामुळे, आपल्या महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकस झाल्याशिवाय परदेशातून येणाऱ्या महिलांकडे निरोगी दृष्टीने कसं बघणार? हा देश किती विविधतेने नटलेला आहे! पण, तरीही आपल्याकडे जागतिक पर्यटकांचा ओघ हवा त्या प्रमाणात नाही. गेल्यावर्षी आपल्याकडे ९.९ दशलक्ष परदेशी पाहुणे आले. आपल्यापेक्षा कितीतरी लहान असलेल्या थायलंडमध्ये ही संख्या ३५.५ दशलक्ष होती. पर्यटनातून मिळणाऱ्या रोजगाराच्या कितीतरी संधी, परकीय चलन, जगात भारताची प्रतिमा सुधारण्याची संधी आपण दर दिवशी गमावत आहोत. इंदूरमध्ये घडलेल्या त्या प्रकाराची चर्चा केली, तर त्यातून भारताची प्रतिमा आणखी डागाळेल. त्यामुळे, त्याची दखलही नको आणि शक्यतो चर्चाही नको, असा कोणाचा समज असेल, तर तो भाबडा म्हणावा लागेल. कारण, परदेशी प्रसिद्धीमाध्यमांनी त्यांच्या पद्धतीने याची जी दखल घ्यायची, ती घेतलीच आहे. नव्या जगात सर्व देशांतल्या माध्यमांवर सर्व देशांतल्या माध्यमकर्मींचं, धोरणकर्त्यांचं, अभ्यासकांचं बारीक लक्ष असतं. सार्वजनिक ठिकाणी, दिवसाढवळ्या महिलेची अवहेलना होते आणि त्याबाबत आपल्याला फार काही वाटत नाही, असा बाहेरच्यांचा समज होणं आपल्यासाठी अधिक घातक आहे. या देशाला महासत्ता बनवण्याचं कंत्राट आपण कोणाला तरी दिलं आहे; त्यात आपल्यावर काही जबाबदारी नाही, असा इथला रस्त्यावरच्या माणसाचा समज असेल, तर तो लवकरात लवकर दूर झालेला बरा. इंदूरसारख्या घटना त्यामुळे टळतील.

**अलिकडच्या चर्चित आंतरराष्ट्रीय आर्थिक घडामोडीपैकी एक म्हणजे भारताच्या वाढत्या ईव्ही उत्पादनामुळे ड्रॅगनला पोटशूळ उठला आहे. दरम्यान, जागतिक बाजारपेठेमध्ये सतत माकडचेष्टा करणाऱ्या ट्रम्प यांच्याविरोधात अमेरिकन कंपन्या न्यायालयात गेल्याचे वृत्त आहे. अन्य एक लक्षवेधी बातमी म्हणजे देशातील पहिले 'ग्रीन स्टील हब गडचिरोलीमध्ये उभे रहात असून तेथील उद्योग आणि समाजचित्र पालटत आहे'.**

# चीनमध्ये गलका, ट्रम्पना दणका

वेगवान आर्थिक घडामोडी अनुभवायला मिळत आहेत. त्यापैकी एक महत्त्वाची बातमी म्हणजे भारताच्या ईव्ही उत्पादनामुळे ड्रानला पोटशूळ उठला आहे. दरम्यान, जागतिक बाजारपेठेमध्ये सतत माकडचेष्टा करणाऱ्या ट्रम्प यांच्याविरोधात अमेरिकन कंपन्या न्यायालयात गेल्याचे वृत्त - आहे. अन्य एक लक्षवेधी बातमी म्हणजे देशातील पहिले 'ग्रीन स्टील हव' गडचिरोलीमध्ये उभे रहात असून तेथील उद्योग आणि समाजचित्र पालटत आहे.



भारत इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) आणि बॅटरी उत्पादनात वेगाने विकास करत आहे. सरकारने या क्षेत्रात देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. त्यामुळे भारताला जगातील सर्वात मोठ्या ईव्ही' बाजारपेठेत स्थान मिळवता आले आहे. तथापि, या वाढत्या यशावर चीन नाराज आहे. त्याने जागतिक व्यापार संघटनेकडे भारताविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. चीन म्हणतो, की भारताच्या अनुदान योजना जागतिक व्यापार नियमांचे उल्लंघन करतात. मुळात, चौनला भारताने या क्षेत्रात मुसंडी मारणे अपेक्षित नाही, कारण तो या वेगाने वाहणाऱ्या भारतीय औद्योगिक धोरणाला योका मानतो. चीनच्या तक्रारीचा केंद्रबिंदू भारताची उत्पादन-लिंक्ड इन्सेंटिव्ह (पीएलआय) योजना आणि 'ईव्ही' धोरण आहे. ही धोरणे भारतीय कंपन्यांना अनुदाने देतात; जेणेकरून ते देशांतर्गत अधिक इलेक्ट्रिक वाहने आणि बॅटरी तयार करू शकतील. चीनचा आरोप आहे, की ही अनुदाने नियमांच्या विरुद्ध आहेत. कारण ते परदेशी कंपन्यांना स्पर्धेसाठी समान व्यासपीठ प्रदान करत नाहीत आणि स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देऊन आयात कमी करण्याचा प्रयत्न करतात.

### चीनच्या उत्पादनशक्तीला आव्हान

जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांनुसार, अशी कोणतीही तक्रार प्रथम सल्लामसलत करून सोडवली जाते. चीनने तुर्कस्तान, कॅनडा आणि युरोपीय महासंघाविरुद्धदेखील अशाच तक्रारी केल्या आहेत. तिथे हरित तंत्रज्ञानासाठीपाठिंबा वाढवला जात आहे. भारत आर्थिक विकास आणि राष्ट्रीय सुरक्षेसाठी आयातीवरील अवलंबित्व कमी करू इच्छित आहे. 'ईव्ही' आणि बॅटरी उद्योग या धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. सरकारने या क्षेत्रांमध्ये उत्पादन वाढवण्यासाठी विशेष प्रोत्साहने दिली आहेत, जेणेकरून भारत स्वतःहून उत्त्व-तंत्रज्ञान उत्पादने तयार करू शकेल. ही धोरणे हळूहळू कार्यरत आहेत आणि भारत एक प्रमुख उत्पादन केंद्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. चीनसाठी हे चिंतेचे कारण आहे. कारण भारताची वाढ चीनच्याच जागतिक उत्पादनशक्तीला आव्हान देत आहे.

### भारत एक मजबूत स्पर्धक

चीन भारतावर ज्या धोरणांचा आरोप करतो, ते चीनच्या स्वतःच्या औद्योगिक धोरणांची प्रतिकृती आहे. अनेक दशकांपासून चीनने मोठ्या प्रमाणात अनुदाने, स्वस्त कर्जे आणि संरक्षणवादी धोरणांद्वारे आपल्या देशांतर्गत उद्योगांना चालना दिली आहे. या धोरणामुळे चीन हे जगातील सर्वात मोठे उत्पादन केंद्र बनले आहे. आता भारत है मॉडेल स्वीकारत आहे. त्यामुळे चीन नाराज झाला आहे. चीनने जागतिक व्यापार संघटनेकडे औपचारिक तक्रार दाखल केली. चीनने 'भारतावर त्यांच्या नवीन इलेक्ट्रिक वाहन आणि बैटरी अनुदान योजनांद्वारे देशांतर्गत उद्योगांना अन्याय्यपणे फायदा करून देत असल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे चिनी कंपन्यांना नुकसान झाले आहे. भारताच्या या योजनांमुळे चीनत्त्या बाजारपेठेत घसरण होऊ शकते. म्हणूनच चीनने भारताच्या नवीन योजनेला विरोध केला आहे. या घडामोडींमुळे घाबरलेल्या चीनने एक निवेदन जारी करून म्हटले आहे, की भारताने हो चूक ताबडतोब दुरुस्त करावी, अन्यथा चीन आपल्या देशांतर्गत कंपन्यांचे संरक्षण करण्यासाठी कठोर पावले उचलेल. जागतिक तज्ज्ञांचे मत आहे, की भारत आणि चीनमधील हा संघर्ष केवळ नवीन धोरणांबद्दल नाही. चीन भारताकडे एक मजबूत स्पर्धक म्हणून पाहत असल्याने अशा प्रकारे नोंद घेत आहे.

आता बातमी ट्रम्पतात्यांना बसलेल्या दणक्याची नवीन एव-१वी व्हिसा अर्जदारांवर एक लाख डॉलर शुल्क लादण्याच्या डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाच्या निर्णयाविरुद्ध 'अमेरिकन चेंबर ऑफ कॉगर्स'ने खटला दाखल केला आहे. चेंबरने या निर्णयाला 'अन्याथ्य' आणि कायदेशीररित्या चुकीचे म्हटले आहे. शुल्काची घोषणा एका महिन्यापूर्वी करण्यात आली होती आणि 'व्हाईट हाऊस'ने अमेरिकन कामगारांच्या जागी स्वस्त परदेशी प्रतिभा नियुक्त करणाऱ्या कंपन्यांविरुद्धचा उपाय म्हणून त्याचे वर्णन केले होते. अधिकाऱ्यांनी नंतर स्पष्ट केले, की है शुल्क विद्यमान व्हिसाधारकांना नव्हे, तर केवळ नवीन अर्जदारांना लागू होईल. शिवाय या शुल्काच्या माफीसाठी अजदेखील उपलब्ध करून देण्यात आला आहे. चेंबरने म्हटले आहे, की हे शुल्क इमिग्रेशन कायद्याचे उल्लंघन करते. ट्रम्प प्रशासनाविरुद्ध हा खटला चेंबरची पहिली कायदेशीर कारवाई आहे. हे चेंबर तीस हजारांहून अधिक व्यवसायांचे प्रतिनिधित्व करते. या खटल्यात गृह सुरक्षा विभाग आणि परराष्ट्र विभाग यांना प्रतिवादी म्हणून नामांकित केले आहे. त्यात म्हटले आहे, की कंपन्यांना कुशल कामगारांची भरती कमी करणे टाळण्यास भाग पाडले जाऊ शकते. टीकाकार म्हणतात, की 'एच-वन बी' आणि इतर कुशल कामगार व्हिसा कार्यक्रम अमेरिकन कामगारांच्या जागी स्वस्त कामगार आणतात, तर व्यावसायिक गटांचा युक्तिवाद आहे, की कामगारांच्या कमतरतेला तोंड देण्यासाठी कमी किमतीचा व्हिसा आवश्यक आहे. विशेषतः अभियांत्रिकी, आयटी आणि आरोग्य विज्ञान यासारख्या क्षेत्रात अशा कामगारांची संख्या जास्त असते. 'एच-वन वी व्हिसा कार्यक्रमामुळे दर वर्षी ८५ हजार कुशल परदेशी कामगारांना सहा वर्षांपर्यंत अमेरिकेत काम करण्याची परवानगी मिळते. या संख्येपैकी अंदाजे ७१ टक्के भारतीय नागरिक आहेत आणि तंत्रज्ञान आणि आयटी सेवा कंपन्या प्रमुख वापरकर्ते आहेत. ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे अमेरिकेचे नुकसान होईल.

### ग्रीन स्टील हबची घोषणा

अलीकडेच समोर आलेले आणखी एक लक्षवेधी अर्थवृत्त म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली हे भारतातील पहिले ग्रीन स्टील हब बनवले जाईल, अशी घोषणा केली. सरकार यासाठी तीन लाख कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक करत आहे. यामुळे एक लाख तरुणांना नोकऱ्या मिळतील. यापैकी ९५ टक्के नोकऱ्या स्थानिक लोकांना मिळतील. याव्यतिरिक्त, पर्यावरण वाचवण्यासाठी पाच कोटी झाडे लावली जातील. गडचिरोलीची मौलिकता जपण्याबरोबरच पाणी, जंगले आणि जमीन जपायचे आहे. विकासासाठी हे नष्ट केले जाणार नाही. गडचिरोलीला 'प्रदूषणमुक्त स्टील सिटी' बनवण्याचे उद्दिष्ट आहे. या तीन लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा थेट फायदा स्थानिक तरुणांना होईल, फडणवीस म्हणाले, की आम्ही गुंतवणूकदारांना स्पष्टपणे सांगितले आहे, की आम्ही सर्व प्रकारच्या सवलती देऊ; परंतु त्यासाठी त्यांनी किमान ९५ टक्के स्थानिक तरुणांना भरती करायला हवे.

पुढील पाच ते सात वर्षांमध्ये गडचिरोली आणि चंद्रपूरमधील एक लाख तरुणांना रोजगार देण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. त्याचे वर्णन त्यांनी या प्रदेशातील तरुणांसाठी 'पूर्ण परिवर्तन' करण्याचे साधन म्हणून केले. विकास आणि पर्यावरणाचे संतुलन साधण्याचे आव्हान नेहमीच महत्त्वाचे असते. सरकार यावरही उपाय शोधल्याचा दावा करते. गडचिरोलीमध्ये ५० दशलक्ष झाडे लावण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प जिल्हाधिकाऱ्यांच्या थेट देखरेखीखाली राबवला जाईल. या वर्षी आतापर्यंत ४० लाख झाडे लावण्यात आली असून पुढील वर्षी हा आकडा एक कोटीपर्यंत पोहोचेल. औद्योगिकीकरणादरम्यान जिल्ह्याच्या हिरवळीला आणि परिसंस्थेला कोणताही धोका होणार नाही याची खात्री या मोहिमेद्वारे केली जाईल.

**महेश देशपांडे**

# 'मिडकॅप'ची निवड का करावी?




**मिडकॅप विभागातील दीर्घकालीन गुंतवणूक ही वेळेच्या कसोटीवर टिकणारी, संपत्ती निर्माण करणारी रणनीती ठरू शकते. जरी या विभागात अस्थिरता जास्त असली, तरी वेळ जसजसा पुढे जातो, तसतशी ती अस्थिरता सरासरी होते आणि कंपाऊंडिंगचा फायदा गुंतवणुकीला मिळतो. दीर्घकाळात मिडकॅप कंपन्या मोठ्या वाढीची क्षमता दाखवतात; पण संयम आणि कालबद्धता आवश्यक आहे.**

बहुतेकदा नवगुंतवणूकदार चंचल असतात. कधी लार्जकॅपचा मोह, कधी स्मॉलकॅपची झोकदार चढ-उतारांची मजा, तर कधी थीमॅटिक फंडांच्या झगमगाटाकडे ओढा या हिंदोळ्यांवर ते स्वार होतात. त्यातून वर्षागणिक हॉट श्रेणी बदलण्याची प्रवृत्ती अनेकांमध्ये दिसते. मात्र व्हाईटओक कॅपिटल म्युच्युअल फंडाच्या ताज्या एसआयपी विश्लेषण अहवालानुसार, गेल्या दहा वर्षांच्या कालावधीत मिडकॅप फंड हे इक्विटी विभागातील सर्वात यशस्वी आणि स्थिर परफॉर्मन्स देणारे सेगमेंट ठरले आहेत. मिडकॅप फंडांनी सरासरी १७.४ टक्के वार्षिक परतावा दिला, तर मीडियन रिटर्न १७.९ टक्के इतका नोंदवला गेला. सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे गेल्या जवळपास तीन दशकांच्या डेटामध्ये प्रत्येक एसआयपी कालावधीत सकारात्मक परतावा दिसून आला आहे.

लार्ज कॅपच्या शेअर्समध्ये सामान्यतः अस्थिरता कमी असते आणि पोर्टफोलिओला स्थैर्य मिळतं मात्र निफ्टी मिडकॅप १५० टीआरआयने गेल्या काळात ठळक आणि सातत्यपूर्ण कामगिरी दाखवली आहे. सरासरी व मध्यमपरतावे अनुक्रमे १७.४%आणि १७.९% राहिले आहेत. तज्ज्ञांच्या मते, एसआयपीमार्फत दीर्घकालीन गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांनी वारंवार फंड बदलण्याची सवय टाळावी. गुंतवणुकीला वेळ द्यावा, म्हणजे तीच गुंतवणूक कालांतराने संचित (कंपाऊंडिंग) शक्तीने आपले उत्पन्न वाढवते.अहवालात १९९६ ते २०२५ या कालावधीत १० वर्षांच्या रोलिंग एसआयपी रिटर्नचे विश्लेषण करण्यात आले. यासाठी लार्ज, मिड आणि स्मॉलकॅप निर्देशांकांची तुलना केली गेली. याचा निष्कर्ष स्पष्ट होता-निफ्टी मिडकॅप १५० टोटल रिटर्न इंडेक्सने सर्वाधिक आणि सातत्यपूर्ण परतावे दिले आहेत.

या काळात मिडकॅप एसआयपीचा सरासरी एक्सआयआरआर (अनियमित गुंतवणुकीचा खरा वार्षिक परतावा दर) १७.४% राहिला. प्रत्येक एसआयपी कालावधीत १००% सकारात्मक परतावे मिळाले.९८% प्रकरणांत १०% पेक्षा जास्त, ९५% प्रकरणांत १२% पेक्षा जास्त परतावा दिसून आला आणि तब्बल ७९% वेळा १५ टक्क्यांहून जास्त परतावा मिळाला. डेटा एकच गोष्ट सांगतो, मिडकॅप विभागातील दीर्घकालीन गुंतवणूक ही वेळेच्या कसोटीवर टिकणारी, संपत्ती निर्माण करणारी रणनीती ठरू शकते. जरी या विभागात अस्थिरता जास्त असली, तरी वेळ जसजसा पुढे जातो, तसतशी ती अस्थिरता सरासरी होते आणि कंपाऊंडिंगचा फायदा गुंतवणुकीला मिळतो.समजा एखाद्या गुंतवणूकदाराने प्रत्येक वर्षी आपली एसआयपी मागील वर्षी सर्वाधिक परफॉर्मन्स देणाऱ्या निर्देशांकात स्विच केली असती, तर ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत त्याचा एक्सआयआरआर १५.२४% इतकाच राहिला असता. पण, जर त्याने एकाच मिडकॅप निर्देशांकात एसआयपी सुरू ठेवली असती, तर त्याच कालावधीत एक्सआयआरआर तब्बल १७.३०इ झाला असता. ही दोन आकडेवारी एक मोठा गुंतवणूक धडा देऊन जाते, तो म्हणजे धीर हीच दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्याची गुरुकिल्ली आहे.

मार्केट टाइमिंगपेक्षा मार्केटमध्ये राहणं महत्त्वाचं

व्हाईटओकच्या २९ वर्षांच्या सेन्सेक्स आणि निफ्टी डेटानुसार, सात ते दहा वर्षे सातत्याने गुंतवणूक केल्यावर बाजारातील अस्थिरता आपोआप कमी होते. दीर्घकालीन एसआयपी रिटर्न नंतर जवळजवळ समांतर होतात, मग गुंतवणूक कोणत्या वेळी सुरू केली याचं महत्त्व कमी होतं. म्हणजेच, मार्केट टाइमिंगपेक्षा मार्केटमध्ये राहणं हे अधिक महत्त्वाचं आहे.मूल्यमापनाच्या काळात जरी गुंतवणूक सुरू केली, तरी १० वर्षांचा एसआयपी कालावधी सरासरी खर्च (अ‍ॅव्हरेज कॉस्ट) संतुलित करतो आणि दीर्घकाळात समाधानकारक परतावा देतो.शेवटी योग्य वेळ शोधण्यात आयुष्य निघून जाऊ शकतं; पण योग्य पद्धतीने गुंतवणूक सुरू ठेवणं हेच खरं शहाणपण आहे. या आकडेवारीनं हे अधोरेखित केलं आहे की, एसआयपी ही केवळ योजना नाही, तर दीर्घकालीन संपत्ती निर्मितीची शिस्तबद्ध जीवनशैली आहे.

**विधिषा देशपांडे**

## भटके-विमुक्त समाज अजूनही उपेक्षेच्या अंधारात

अलीकडेच राज्यात भटके-विमुक्त गौरव दिन साजरा केला गेला. पण हा दिवस केवळ भाषणांपुरता आणि औपचारिक कार्यक्रमापुरता मर्यादित राहणे योग्य ठरणार नाही. भटके-विमुक्तांचा इतिहास हा शॉर्याचा आणि त्याचबरोबर अन्यायाचा आहे. कोळी, रामोशी, गोंधळी, डोंबारी, वासुदेव, पारधी अशा अनेक जमातींनी इंग्रजांविरुद्ध शस्त्र उचलले होते. या लढ्याचीच शिक्षा म्हणून ब्रिटिशांनी १८७१ मध्ये क्रिमिनल ट्राइब्ज कायदा लादला. संपूर्ण समाजाला जन्मजात गुन्हेगार ठरवण्याचे कलंकित लेबल लावले गेले. १९५२ रोजी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली तो कायदा रद्द झाला आणि या जमातींना विमुक्त दर्जा मिळाला. पण कायदेशीर बेड्या तुटल्या तरी समाजाच्या माणिकतेतल्या बेड्या अजूनही कायम आहेत. आज सत्तरहून अधिक वर्षे उलटून गेली, तरी भटके-विमुक्त समाज उपेक्षेच्या अंधारात आहे. शासनाच्या अहवालानुसार, राज्यात साठ लाखांहून अधिक लोकसंख्या या समाजाची आहे. पण त्यापैकी शिक्षणातील गळती दर अजूनही पन्नास टक्क्यांच्या जवळपास आहे. शंभर मुले शाळेत दाखल झाली तरी दहावीपर्यंत फक्त तीस ते पस्तीस मुले पोहोचतात. स्थलांतरामुळे शाळा वारंवार बदलावी लागते. स्थिर पत्ता नसल्यामुळे शिष्यवृत्ती मिळत नाही. तुम्ही गुन्हेगार जमातीतील आहात अशा टोमण्यांमुळे अनेक मुले शाळेतून बाहेर पडतात. शिक्षण फक्त पाठयपुस्तकाचे नव्हे, तर आत्मसन्मानाचे दार आहे. पण हे दार त्यांच्यापुढे अजूनही अर्धवट बंद आहे. महिलांची परिस्थिती तर अधिकच भयावह आहे. भटक्या-विमुक्त स्त्रियांना समाजाकडून फक्त उपेक्षा नाही, तर अमानवी वागणूक दिली जाते. असंघटित मजुरी, रोजंदारीच्या मजुरीतून होणारे शोषण या त्यांच्या जीवनातील स्थायी छटा आहेत. रोजगाराच्या बाबतीतही असुरक्षिततेशिवाय काही नाही. पारंपरिक कला, फेरी विक्री, हातमाग, डोलकी-नृत्य अशा कलेत त्यांचे कसव असले तरी आधुनिक बाजारपेठेत त्याला काही किंमत मिळत नाही. कौशल्याशिवाय योजना आहेत, पण प्रशिक्षण केंद्रांपर्यंत त्यांना पोहोच नाही. त्यामुळे बहुतेक कुटुंबे दारिद्र्याच्या सापळ्यातून बाहेरच पडत नाहीत. सर्वात मोठे आव्हान म्हणजे सामाजिक, कलंक, आजही गुन्हेगार असेच गृहीत धरले जातात. भटके-विमुक्त गौरव दिनाला खरी धार द्यायची असेल तर केवळ घोषणा नव्हे तर प्रत्यक्ष कृती अपेक्षित आहे. या दिनाचे स्मरण महत्वाचे आहे. पण तेवढ्यावर थांबले तर केवळ दिखावा ठरू शकेल. या समाजाच्या भविष्यासाठी ठोस पावले उचलणे ही शासन, प्रशासन आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

**प्रा. मधुकर चुटे** नागपूर

## खेड्यातचं कृषीपूरक उद्योग उभारा

आपला भारत देश जगामध्ये कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो तो जगाचा पोशिंदा आहे मात्र देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे लोटली तरीही बळी राजाची आर्थिक सुबत्ता सुधारली नाही हे वास्तव नाकारता येत नाही नोकरांना विविध वेतन आयोग लागू होतात मात्र शेतकऱ्याला कोणता आयोग आहे का ? कोणतीही आपत्ती आली की पहिल्यांदा शेतकऱ्याला कात्री लावली जाते याला काय म्हणावे शेतकरी रात्रंदिवस काबाडकष्ट करुन वेळेप्रसंगी हिंस्त्र प्राण्यांची गय न करता आपली शेतजमीन पिकवतो मात्र त्याच्या उत्पादनाला आजही योग्य दर मिळनासा झाला आहे. वातावरणातील होणाऱ्या सततच्या बदलामुळे शेती व्यवसाय पूर्णपणे बेभरवशाचा झाल्याने आणि ग्रामीण भागात उद्योगधंदे नसल्यामुळे खेड्यातील लोक शहरांकडे स्थलांतर करत आहेत आजची तरुणाई शेती करण्यास निरुत्साही दिसुन येते आहे शेतीतून फार काही साध्य होत नसल्याने युवा वर्ग नोकरी, धंद्यासाठी खेड्यांतून शहरांकडे धाव घेत आहेत. या सर्वाची परिणीती शेतजमीन ओस पडून झपाटयाने शहरीकरण वाढत असल्याने तेथेही जमिन कमी पडत आहे शेतजमिनी, माळराने, जंगले यासाठीच असणाऱ्या ठिकाणीचं घरांची निर्मिती होते आहे. त्यामुळे एकप्रकारे हे निसर्गावर अतिक्रमणचं म्हणावे लागेल शेतकऱ्यांच्या कृषीमालाला हमीभाव मिळत नसल्याने लोक शेती व्यवसाय सोडून शहरांकडे वळत आहेत हे अद्योगतीकडे नेणारे आहे शहरीकरण वाढले आणि जमिन कमी पडू लागली तर भविष्यतात अन्नधान्यापासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यासाठी भारत सरकारने शेती उद्योगासाठी कल्याणकारी योजनां राबवाव्यात, शेतकऱ्यांना हमी भाव द्यावा, खेड्यातचं कृषीपूरक, विविध छोट्या - मोठ्या उद्योगधंद्याची उभारणी करावी त्यामुळे शेतकरी आणि तरुणाई गावातचं राहुन आपली आर्थिक प्रगती साधतील त्यामुळे वाढत्या शहरीकरणाला आळा बसेल

**राजू जाधव,** मांगूर जि.बेळगांव

## 'देशातील बोगस २२ विद्यापीठांची यादी यूजीसीकडून जाहीर'

नव्या शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी झाल्यावर देशातील शिक्षण क्षेत्रात जागतिक स्तरांवर स्पर्धा सुरू होईल. देशात विद्यार्थ्यांना हवे असलेले शिक्षण, कॉलेज, विद्यापीठात शिक्षण पूर्ण करता येईल. तत्पूर्वी जाहीर केलेल्या तपासांत शिक्षण संस्थांना शिक्षण विभाग, अनुदान आयोगाकडून परवाने मिळाले आहेत का नाही याची सरसकट खात्री पटवून घेण्यापूर्वी स्थापन केल्या गेलेल्या विद्यापीठांना अनुदान आयोगाकडून परवाने नसल्याचे आढळून आले आहे. देशभरातील २२ विद्यापीठे ही बोगस किंवा बनावट असल्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाने स्पष्ट झाले आहे. राजधानी दिल्लीतील दहा विद्यापीठे बनावट असल्याचे आढळून आले आहे. संपूर्ण देशातील २२ विद्यापीठे बनावट ही विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा खेळ करणारी संस्थाने स्थापन करून त्यांचे व्यवहार सुरू करेपर्यंत देशातील केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि त्यांच्या अखात्यारीतील विविध प्रभाग, खाती यांना या प्रकरणी माहिती कां पोहोचली नाही हे मोठे गूढ आहे. विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि त्यांना शिक्षण देणारी विद्यापीठे जेव्हा देशाच्या सात राज्यांत आपले विद्यार्जनाचे कार्य विना अडथळे सुरू ठेवत असताना एकाही राज्याच्या जबाबदार अधिकाऱ्यांना त्या विद्यापीठांच्या कारभाराची चौकशी, तपासणी करावीशी वाटली नाही इथेच देशाच्या शैक्षणिक संस्था आणि त्यांच्या व्यवहारांची पाळेमुळे कोठवर रुतली आहेत हे समजून येते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची काळजी नसलेल्या विद्यापीठातील कारभारांत आणि संबंधित राज्यांत राज्याच्या कारभाऱ्यांना अशा बनावट तपासासाठी क्षणाचीही उसंत मिळू नये हे गौडबंगाल काय आहे ? यूजीसी प्रतिवर्षी बोगस विद्यापीठांची यादी जाहीर करते त्या याद्यांमध्ये भर पडत असते त्या विद्यापीठांवर कारवाई केली जात नाही याचे आश्चर्य वाटते.'

**राजन पांजरी,** जोगेश्वरी.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# शिवाई बसमध्ये दिव्यांगांना सवलत नाही फक्त जागा राखीव..! दिव्यांग प्रवाशांचा निषेध



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड आगारामध्ये नुकत्याच वातानुकूलित "शिवाई" इलेक्ट्रॉनिक बस दाखल झाल्या आहेत. या बस प्रदूषणमुक्त, आधुनिक व 44 आसन क्षमतेच्या असून त्यामध्ये मोबाईल चार्जिंग, आरामदायक आसन आणि वातानुकूलन यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत. मात्र, या अत्याधुनिक बसमध्ये दिव्यांग प्रवाशांसाठी कोणतीही तिकीट सवलत नसल्याचे स्पष्ट झाले आहे, ही बाब संतापजनक आणि खेदजनक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

बसच्या समोरील आसनांवर "दिव्यांगांसाठी जागा राखीव" असा उल्लेख असला, तरी तिकीट देताना चालक किंवा वाहक यांच्याकडून दिव्यांग सवलत लागू केली जात नाही. तिकीट मशीनमध्ये दिव्यांग सवलतीचा पर्यायच उपलब्ध नसल्याचे संबंधित कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात येत असल्याचे प्रवाशांनी नमूद केले. दिव्यांग प्रवाशांच्या सेवेची माहिती घेती असता दिव्यांग यांच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. "इतर एसटी बसप्रमाणे आम्हालाही 'शिवाई' बसमध्ये सवलत मिळाली पाहिजे. फक्त जागा राखीव ठेवून सवलत नाकारणे अन्यायकारक आहे." "तिकीट देताना आम्हाला संपूर्ण भाडे आकारले जाते. विरोध केल्यास इतर प्रवाशां समोर लाजिरवाणी परिस्थिती निर्माण होते. आम्हाला बसमधून उतरावे लागते. हे अत्यंत अमानवी आहे." दिव्यांग प्रवाशांनी या अन्यायाविरुद्ध तीव्र नाराजी व्यक्त करत, राज्य परिवहन मंत्री यांनी तात्काळ दखल घेऊन दिव्यांग सवलतीचा पर्याय 'शिवाई' बसमध्ये सुरु करावा, अशी मागणी केली आहे. एसटी महामंडळाने दिव्यांगांसाठी तिकीट सवलत असलेल्या पारंपरिक बस सेवांमध्ये सवलती लागू ठेवल्या आहेत, परंतु नव्याने सुरु झालेल्या "शिवाई" वातानुकूलित बससेवेत हा लाभ उपलब्ध नाही. त्यामुळे सामाजिक न्याय आणि समानतेच्या दृष्टीने हे दुर्लक्ष गंभीर मानले जात आहे. महामंडळाकडून यासंदर्भात कोणती भूमिका घेतली जाईल, हे आता पाहणे उत्सुकतेचे ठरत आहे.

## दिव्यांग प्रवाशांवरील अन्यायाचा गुरुदेव युवा संघाचा जाहीर निषेध

इलेक्ट्रॉनिक 'शिवाई' बसमध्ये अपंगांना सवलत नाकारली, सदृश्य प्रवाशांना दिली सवलत! महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने सुरु केलेल्या इलेक्ट्रॉनिक शिवाई बसमध्ये हात-पाय अपंग असलेल्या दिव्यांग प्रवाशांना प्रवास सवलत देणे अत्यावश्यक असताना, त्यांना सवलत नाकारून इतर सदृश्य प्रवाशांना सवलत देण्यात आली आहे. या दुजाभावाच्या वागणुकीचा गुरुदेव युवा संघाच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. गुरुदेव युवा संघाचे अध्यक्ष यांनी निवेदनात म्हटले आहे की, "दिव्यांग नागरिक हे समाजाचा अविभाज्य भाग असून त्यांना सरकारी योजना आणि सवलतींपासून वंचित ठेवणे अन्यायकारक आहे. एसटी महामंडळाने तत्काळ नियम स्पष्ट करून सर्व दिव्यांग प्रवाशांना समान सवलत द्यावी, अन्यथा संघाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल." संघाने या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच दिव्यांगांच्या हितासाठी स्पष्ट व पारदर्शक धोरण तयार करण्याची मागणीही केली आहे.



## स्व.विमल रामभाऊ डुकरे अनंतात विलीन

जनमाध्यम प्रतिनिधी

उमरखेड : येथील कै. रामभाऊ डुकरे यांच्या पत्नी विमलताई डुकरे4यांचे दि. 27 ऑक्टोंबर. रोजी दुपारी 1वा.वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांचेवर सोमवारी दि. 27 ऑक्टोबर. रोजी. सायंकाळी 7 वा. उमरखेड येथील स्मशानभूमीत अग्निसंस्कार करण्यात आले. स्व विमलताई डुकरे यांचे पश्चात दोन मुलं, दोन मुली, 1 सुन, 2 नाती 2नात नातवंडं असा मोठा परिवार आहे. अंत्यविधी प्रसंगी सर्वस्तरातील नागरिक, नातेवाईक मोठ्या संख्येत उपस्थित होते. देव त्यांना या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो.

# डेहणी शेतशिवारात गांजाची अवैध लागवड उघड

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, ११३ जिवंत झाडे जप्त; २.९४ लाखांचा मुद्देमाल ताब्यात



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - आर्णी पोलीस ठाणे हद्दीतील डेहणी शेतशिवारात गांजाची अवैध लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळच्या पथकाने सोमवारी (दि. २८ ऑक्टोबर २०२५) केलेल्या कारवाईत ११३ जिवंत गांजा वनस्पती जप्त करण्यात आल्या असून एकूण २,९४,३०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

खात्रीलायक माहितीच्या आधारे स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकाने ग्राम डेहणी येथील प्रदीप पांडु आडे (वय ३४, रा. धानोरा तांडा, ता. दिग्रस) यांच्या शेतात छापा टाकला. त्यावेळी शेतात गांजाची झाडे बोंडे लागलेली अवस्थेत आढळली. एकूण ११३ जिवंत झाडांचे पान व बोंडांचे वजन ५८.८६० किलोग्रॅम इतके निघाले, ज्याची किंमत सुमारे २.९४ लाख रुपये आहे. ही लागवड कोणत्याही शासकीय परवानगीशिवाय केल्याचे निष्पन्न झाले. सदर झाडे पंचासमक्ष जप्त करून आरोपी प्रदीप पांडु आडे यास अटक करण्यात आली आहे. त्याच्याविरुद्ध एन.डी.पी.एस. (अंमली पदार्थ प्रतिबंधक) कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास आर्णी पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहेत. या कारवाईत पोलीस अधीक्षक कुमार चिंता आणि अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतिश चवरे यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक पवन राठोड, संतोष मनवर, तसेच पोलीस अंमलदार बबलू चव्हाण, मिथुन जाधव, सोहल मिर्झा, अमित झेंडेकर, किशोर झेंडेकर, योगेश गटलेवार, अजय डोळे, निलेश राठोड आणि आर्णी ठाण्याचे पोलीस अंमलदार अशोक टेकाळे यांनी सहभाग घेतला.

# नॅचरल शुगर कारखान्याच्या १० व्या गळीत हंगामाचा शुभारंभ ऊसतोड करण्यासाठी एक रुपया सुद्धा देऊ नका : बी.बी. ठोंबरे



जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव : गुंज, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना माझे कळकळीचे आव्हान व विनंती आहे की यावर्षीच्या ऊस गाळप हंगामात तुमच्या कडे ऊस मजुरांकडून किंवा हार्वेस्टिंग मशीन चालकांकडून पैशाची मागणी झाल्यास एक रुपया तर सोडाच फडावर नारळ सुध्दा फोडु नका तुमच्या संपूर्ण ऊसाची जबाबदारी ही आमची आहे. तो आम्ही गाळपासाठी नेऊ ऊस तोडणी करतांना भेदभाव करुन मागेपुढे केल्यास संबंधितांवर तातडीने निलंबनाची कारवाई करण्यात येईल अशी सत्क ताकीद आजच्या गव्हान पुजन कार्यक्रम प्रसंगी आपल्या आध्यक्षीय भाषनात कारखाण्याचे चेअरमन तथा सर्वेसर्वा कृषीरत्न श्री बि बी ठोंबरे यांनी सांगितले.

मागीलवर्षी शासनाने तोडणी वाहतूक दरात तब्बल ३३ टक्के भरीव आशी वाढ केलेली आहे. त्यामुळे तोडणी वाहतूक मजुरांकडून ऊत्पादकांची कोणत्याही परिस्थितीत पिळवणूक खपुन घेतली जानार नाही. तोडणी वाहतूक दराची एकंदरीत रक्कम ही एफ आर पी मधुनच दिली जाते तरीपण जेवणाच्या चहापाणी किंवा बक्षीसाच्या नावाखाली मजुर व वाहतुक ठेकेदाराकडून आर्थिक पिळवणूक केली जाते. मागीलवर्षी च्या गळीत हंगामात आशा प्रकारच्या आनेक तक्रारी माझ्याकडे आल्या परंतु या हंगामात आशा कोणत्याही व्यक्तीची गय केली जानार नाही. या गळीत हंगामात ८ हजार हेक्टर ऊसाची नोंद करण्यात आली आसुन ७ लाख गाळपाचे ऊद्दीष्ट ठेउन तसे नियोजन करण्यात आले आहे. मागील वर्षीच्या गळीत हंगामात सर्वात जास्त ऊस पुरवठा करणारे शेतकरी पिंपळखुटा येथील नानाराव जाधव व त्यांच्या सौभाग्यवती यांना यावर्षीचा पुजेचा मान देण्यात आला तर मागील हंगामात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गाडीवान, वाहतूक ठेकेदार,आधीकारी, कर्मचारी यांना सन्मानित करुन रोख बक्षीस देण्यात आले. हा १० गळीत हंगाम यशस्वी पार पाडण्यासाठी सर्व नियोजन करण्यात आले आहे.

सर्वानी आपला संपूर्ण ऊस आपल्या कारखान्यास पुरवठा करुन सहकार्य ठेवावे विदर्भात सर्वाधिक ऊस दर देण्याची पंरपरा आम्ही यावेळी सुध्दा कायम ठेऊ याबाबत आपन निश्चिंत राहावे तसेच युनिट २ चा सीएनजी प्रकल्प लवकरच कार्यान्वित करु याची सुरुवात म्हणून पुसद येथील दयाराम जाधव व महागाव येथील संजय नरवाडे यांच्या सौभाग्यवती या दोन शेतकऱ्यांना सीएनजी पंपाचे परवाने यावेळी देण्यात आले. नॅचरल परीवार हा शेतकरी व कामगार यांचे हीताला प्रथम प्राधान्य देणारा एकमेव ग्रुप आहे. त्यामुळे याला आम्ही एक परीवार संबोधले आहे. यावेळी एन साई बॅंकेचे संचालक जनरल मॅनेजर कदम साहेब, कृषीभूषण पांडुरंग आबा आव्हाड, चितांगराव कदम,नानाराव जाधव व त्यांच्या सौभाग्यवती इत्यादी व्यासपिठावर उपस्थित होते. परीसरातील विविध संस्थानचे अध्यक्ष पदाधिकारी ऊस उत्पादक शेतकरी ठेकेदार,आधीकारी, कर्मचारी, पत्रकार यांचे सर्वाचे हस्ते गव्हानीत ऊस मोळी टाकून व ऊस बैलगाडी पुजन करुन गाळप हंगामाचा शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पांडुरंग आबा आव्हाड यांनी केले तर आभार एन साई बॅंकेचे अध्यक्ष मानले. यावेळी उपस्थित शेतकरी सु.ना.माजी संचालक साहेबराव ठेगें, शिवाजीराव देशमुख,विशाल पवार अध्यक्ष खरेदी विक्री संघ महागाव, गोविंदराव देशमुख सवनेकर, अविनाश भांगे, हनंवतराव देशमुख, गोविंदराव शिन्दे,मंचकराव देशमुख, मंचकराव गोरे,टिकाराम कदम,एम डी मीराशे व इतरही अनेक शेतकरी उपस्थित होते.

# फ्रिजमध्ये शॉर्टसर्किट झाल्यामुळे घराला लागली आग

## अग्निशामन दल तात्काळ पोहचल्याने मोठा अनर्थ टळला



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - शहरातील नाईक चौक जवळ असलेले आसेगावकर नगर,पालडीवाल लेआउट मध्ये राहणारे महेश सूर्यवंशी हे कुटुंबासह शेंबाळपिंपरी,बाहेरगावी गेल्याने घर बंद होते फ्रिजमध्ये चालू असलेल्या लाईनच्या श्वास सर्किट मुळे अचानक आग लागल्याचे शेजारी यांना कळाल्यामुळे तात्काळ त्या ठिकाणी पोहोचलेल्या अग्निशमन दलाच्या जवानांनी घराचे दार व गेट तोडून आतमध्ये प्रवेश करून आगीवर नियंत्रण मिळविले घराला शॉटसर्किटमुळे आग लागली.

परंतु परिसरात राहणाऱ्या नागरिकांनी तात्काळ अग्निशामन दलाला माहिती कळविली वअग्निशनदल तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळविले आगीमुळे महेश सूर्यवंशी यांच्या घरातील साहित्याची मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. आग विझविल्यामुळे शेजारी असलेल्या आसपासच्या घराला नुकसान झाले नाही तात्काळ आगीवर नियंत्रण मिळविल्यामुळे मोठी हानी टळली यामध्ये नगर परिषदेचे अग्निशामक दल प्रमुख रोहित पाशमवाड, अभिजीत अवताडे, योगेश नेमाडे,रवी नेटके, जयवंत उचित यांनी तात्काळ आगीवर नियंत्रण मिळविले त्यामुळे मोठा होणारा अनर्थ टळला.

## वेचक

### राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी तीन खेळाडूंची जिल्हा संघात निवड

वणी - भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथे ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या ३६ वी सब ज्युनियर महिला राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी वणी येथील तिन खेळाडूंची जिल्हा कबड्डी संघात निवड झाली आहे. अम्युचर कबड्डी असोसिएशन ऑफ विदर्भशी संलग्न असलेल्या भंडारा जिल्हा हौशी कबड्डी असोसिएशनच्या वतीने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी क्रीडा क्षेत्रात स्वतःच्या कर्तृत्वाची चमक दाखविणाऱ्या वणी शहरातील कु.श्रद्धा देशमुख, कु. गौरी पिदुरकर व कु.जान्हवी ठाकरे ता तिनही खेळाडूंची निवड झाली आहे. श्री नृसिंह स्पोर्टींग क्लब वणीचे हे तिन्ही खेळाडू आहेत.या खेळाडूंना येथे योग्य प्रशिक्षण व प्रशिक्षक कुणाल विशाल ठोंबरे यांचं उत्तम मार्गदर्शन लाभलं आहे. मैदानी खेळात या खेळाडूंनी घेतलेले परिश्रम आणि त्यांच्यातील जिद्द व चिकाटीमुळे ते आज उत्कृष्ट खेळाडू म्हणून समोर आले आहेत.मैदानी खेळात आपल्या खेळाचं उत्तम प्रदर्शन करणाऱ्या या तिनही खेळाडूंची राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी झालेली निवड शहरातील क्रीडा क्षेत्रासाठी गौरवाची बाब असून शहराचाही अभिमान वाढविणारी आहे. शहरातील या तिन खेळाडूंची राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी जिल्हा संघात निवड झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांचं कौतुकही होत आहे.

### कपाशी विक्री नोंदणीसाठी किसान मोबाईल ॲप, भारतीय कपास महामंडळाचा उपक्रम

यवतमाळ : भारतीय कपास महामंडळ (CCI) तर्फे कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी "कापूस किसान मोबाईल ॲप" हे नवीन मोबाईल ॲप्लिकेशन सुरु करण्यात आले आहे. हे ॲप शेतकऱ्यांना कापूस हंगामात २४ तास व ७ दिवस उपलब्ध राहणार असून नोंदणी व स्लॉट बुकींग प्रक्रियेसाठी उपयुक्त ठरणार आहे. या ॲपच्या माध्यमातून शेतकरी सहजपणे आपली नोंदणी करून सीसीआय खरेदी केंद्रावर कापूस विक्रीसाठी स्लॉट बुकींग करू शकतील. या प्रक्रियेस मदत करण्यासाठी एक विशेष लिंक तयार करण्यात आली आहे, ज्यामध्ये स्थानिक भाषेत माहिती व मार्गदर्शक व्हिडीओ उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांनी या लिंकवर जाऊन माहिती पाहावी. https://www.youtube.com/@KapasKisan-Official स्लॉट बुकींग सुविधा ७ दिवसांच्या रोलिंग बेसिसवर खुली राहणार आहे. दररोज एक तारीख बंद होईल आणि त्याच वेळी दुसऱ्या दिवशी नवीन तारीख खुली केली जाईल. उद्घाटनाच्या दिवशी कोणतीही सुट्टी राहणार नाही. स्लॉट बुकींगची वेळ अकोला आणि औरंगाबाद केंद्रासाठी दररोज सकाळी १०.०० वाजता भारतीय कपास महामंडळाने सर्व शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की त्यांनी शक्य तितक्या लवकर आपली नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून, खरेदी केंद्रावर कापूस विक्रीस येण्यापूर्वी स्लॉट बुकींग करावी.

### 'बजाज फायनान्स'च्या नावाने महिलेला ९२ हजारांचा गंडा, पोलिसांत तक्रार दाखल

वणी : 'बजाज फायनान्स' कंपनीचे नाव वापरून एका महिलेला तब्बल ९२ हजार १८६ रुपयांचा गंडा घालण्यात आला आहे. ही धक्कादायक घटना मंगळवारी उघडकीस आली आहे. मीना अशोककुमार पाटील असे फसवणुक झालेल्या महिलेचे नाव आहे. मीना पाटील यांनी वणी पोलीस निरीक्षकांकडे दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांना 'बजाज फायनान्स'कडून वैयक्तिक कर्ज मंजूर झाल्याचे सांगत काही संशयास्पद व्यक्तींनी संपर्क साधला. आरोपींनी स्वतःला 'बजाज फायनान्स शाखा वणी' येथील अधिकारी भासवून त्यांचा बँक तपशील, आधार क्रमांक आणि पॅन क्रमांक मागितला. कॉल अधिकृत असल्याचा विश्वास झाल्यानंतर आरोपींनी ईसीएस अपडेट करायचे आहे' किंवा कर्ज मंजूर झाले आहे, असे सांगत एक लिंक पाठवली. मीना पाटील यांनी ती लिंक क्लिक करताच त्यांच्या दोन्ही बँक खात्यांतून ८८ हजार ६४५ रुपये आणि ३ हजार ५४१ रुपये, अशी एकूण ९२ हजार १८६ रुपये रक्कम काही क्षणांतच गायब झाली. फसवणूक झाल्यानंतर मीना पाटील यांनी जेव्हा मूळ बजाज फायनान्स कार्यालयाशी संपर्क साधला, तेव्हा अशी कोणतीही प्रक्रिया किंवा कॉल कंपनीकडून केलेला नसल्याचे त्यांनी दिली. त्यानंतर वणी पोलीस सायबर विभागात या प्रकरणी तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे. नागरिकांनी अशा फसवणुकीच्या कॉल्सपासून सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# पुसद येथील बाल विकास प्रकल्प कार्यालय सुट्टीवर?

## अधिकारी, कर्मचारी नसल्याने अंगणवाडीची कामे खोळंबली



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - येथील एकात्मिक प्रकल्प कार्यालय केवळ उघडण्यासाठी व बंद करण्यासाठीच ठरले आहे. अधिकारी आणि कर्मचारी नसल्याने वा कार्यालयातील कारभार वाऱ्यावर आहे. एकात्मिक बाल विकास कार्यालयात कर्मचारीच नाही. उपलब्ध कर्मचारी हजर राहत नाही. त्यामुळे या कार्यालयाला केवळ उघडण्यासाठी आणि बंद करण्यासाठी वेतनावर कर्मचारी असल्याचे बोलल्या जात आहे.

एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयाला प्रकल्प अधिकारी कधीच उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी वाढत आहे. अधिकारी अमावस्या पौर्णिमेलाच हजर होतात. वरिष्ठ अधिकारी येणार असेल तरच कर्मचारी कार्यालयात हजर होतात. त्यामुळे कार्यालयात इतर दिवस कोणीही राहत नसल्याने आलेल्या या नागरिकांना परत जावे लागत आहे. तालुक्यातील अंगणवाड्या आणि मिनी अंगणवाड्यांसह पोषण आहाराचा कारभार या कार्यालयाव्दारे नियंत्रित केला जातो. या कार्यालयांतर्गत नेर, महागाव, ढाणकी, पुसद, उमरखेड, दिग्रस, दारव्हा, आणी तालुक्याचा समावेश आहे. मात्र, अंगणवाडी अधिकारीच वेळेवर हजर राहत नसल्यामुळे सेविकांना कागदपत्रांसाठी मोठी अडचण होत आहे. कार्यालयाचे दरवाजे सकाळी उघडले जाते तर सायंकाळी बंद केले जाते. या संदर्भात प्रकल्प एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयाचे प्रकल्प अधिकारी प्रशांत विधाते यांचेशी संपर्क केला असता प्रतिसाद मिळला नाही. एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयाला प्रकल्प अधिकारी कधीच उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी वाढत आहे. अधिकारी अमावस्या पौर्णिमेलाच हजर होतात. वरिष्ठ अधिकारी येणार असेल तरच कर्मचारी कार्यालयात हजर होतात. यामुळे सामान्य नागरिक वैतागले आहेत. नेमकी तक्रार कोणाकडे करावयाची हाच प्रश्न त्यांना पडला आहे.

# कचराडेपो जमीन खरेदीत शासनाची फसवणूक केल्याची तक्रार!

## खरेदी व्यवहारातील भ्रष्टाचाराची जिल्हाधिका-याकडे तक्रार

जनमाध्यम प्रतिनिधी

बाभूळगाव - नगर पंचायत बाभूळगावद्वारा घनकचरा व्यवस्थापनासाठी कचराडेपोची निर्मिती करण्याच्या उद्देशाने शेतजमीन थेट वाटाघाटीने खरेदी करण्यात आली. मात्र सदरची शेतजमीन खरेदी करताना शासकीय नियमांचे सर्रास उल्लंघन करून शासनाच्या लाखो रूपयांचा अक्षरश: चुराडा करण्यात आला. या खरेदी व्यवहारात शासनाची फसवणूक झाल्याचा प्रकार माहिती अधिकार कार्यकर्ते राहुल सहारे यांनी उघडकीस आणला असून या भ्रष्टाचाराची जिल्हाधिका-यांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

बाभूळगाव नगर पंचायत हद्दीत घरकचरा संकलन झाल्यानंतर डंपिंग ग्राउंड म्हणजेच कचराडेपोमध्ये साठवणूक व त्यावर प्रक्रीया करण्यासाठी आवश्यक असलेली शासकीय ई-क्लास जमीन उपलब्ध नव्हती. त्यामुळे शेजारील शीवरातील बाभूळगाव पासून किमान पाच किमीपेक्षा कमी अंतरावरील शेतजमीन खरेदी करण्याबाबत सन 2022 मध्ये निविदा प्रक्रीया नगर पंचायत बाभूळगाव द्वारे राबविण्यात आली. त्यासाठी दोन वेळा वर्तमानपत्रांमधून निविदाबाबतची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. मात्र त्यांना प्रतिसाद न मिळाल्याने पुन्हा तिस-यांदा दि. 13/09/2022 रोजी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यामध्ये दि. 30/09/2022 पर्यंत ईच्छुक खाजगी शेतमालकांनी मालकी हक्काबाबतचे पुरावे जसे.. सातबारा, आठ-अ, नकाशा व विहित नमुन्यातील अर्ज नगर पंचायतकडे सादर करण्याचे कळविण्यात आले होते. त्यामध्ये शेख आसीफ शेख इमाम, रा. बाभूळगाव यांनी त्यांच्या गणोरी शिवारातील गट क्र. 114 क्षेत्रफळ 1.31 हे.आर. या शेतजमीनीच्या बाबत दि. 29/09/2022 रोजी नगर पंचायतकडे अर्ज सादर केला होता. मात्र या अर्जासोबत त्यांनी मालकीहक्क बाबतचा कुठलाही ठोस पुरावा जोडला नव्हता. याउलट आणखी पाच शेतमालकांनी अर्ज सादर करून त्यांच्या मालकी हक्काबाबतचे पुरावे देखील जोडले होते. असे असताना येथील नगर पंचायत प्रशासन व विद्यमान कार्यकारिणी यांनी संगनमत करून शासकीय नियमांना बगल देवून शेख आसीफ शेख इमाम यांची शेतजमीन कचराडेपोसाठी खरेदी केली. मात्र हा सर्व व्यवहाराच आतबट्याचा खेळ ठरला असून सदरचा शेतमालक निविदा भरतेवेळी त्या शेतजमीनीचा मालकच नसल्याचे समोर आले आहे. शेख आसीफ शेख इमाम यांनी दस्त क्र. 1024, दि. 19/09/2022 दुय्यम निबंधक बाभूळगाव यांचेकडे मौजा गणोरी येथील गट क्र. 114 क्षेत्रफळ 1.31 हे.आर. ही जमीन खरेदी केली. त्या जमीनीचा फेरफार क्र. 2277 हा दि. 19/10/2022 रोजी होवून ते सदरच्या जमीनीचे मालक झाले. त्यामुळे नगर पंचायतला निविदा भरताना ते सदरच्या जमीनीचे पुर्णतः मालक नव्हते. हे या वरून स्पष्ट होते. निविदांच्या छाणणी दरम्यान त्यांनी मालकी हक्काचा कोणताही पुरावा सादर केला नसताना सुद्धा त्यांची निविदा पात्र ठरविण्यात आली.

# मजुरांना कामावरून काढून टाकल्याने तीन मजुरांचे आमरण उपोषण सुरू

## वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मजुरांना धमकी!



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - वनपरिक्षेत्र पुसद प्रादेशिक अंतर्गत खंडाळा वर्तुळ मधील रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे. मजुरांना मजुरी न मिळाल्याने व कामावरून काढून टाकल्याने .२५ ऑक्टोंबर पासून (अन्नत्याग आमरण) उपोषणाला बसले आहे. वन विभाग कार्यालय समोर गजानन भिका दिंडे रा.जमुना, किसन मावजी भोरकडे रा. येलदरी व दौलत रामचंद्र पातोंडे रा.खंडाळा हे उपोषणाला बसले आहेत. चार दिवसांपासून (आमरण अन्नत्याग) उपोषणामुळे मजुरांची प्रकृती खालावली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की,खंडाळा वर्तुळ मधील खंडाळा चेक पोस्ट व इतर दोन मधील मागील १ एप्रिल २०२४ पासून ते १ ऑगस्ट २०२५ पर्यंत या १६ महिन्यात मजुरांना मजूर मिळाली नाही. यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ अधिकारी आणत आहेत. संबंधित अधिकाऱ्यांना वारंवार निवेदन सूचना देऊन सुद्धा त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्या जात आहे.रोजमजुर १३ ऑगस्ट २०२५ रोजी पुसद येथील वनविभाग कार्यालयासमोर उपोषण उपोषणाला बसणार होते. अशावेळी अधिकाऱ्यांनी त्यांना कामावरून काढण्याची धमकी दिली होती. त्यामुळे उपोषण तूर्तास थांबले होते. त्यानंतर मजुरांनी १ ऑगस्ट २०२५ रोजी एक लेखी अर्ज करून उपोषण माघार घेत असल्याचे अधिकाऱ्यांना कळविले होते. तरीसुद्धा संबंधित अधिकाऱ्याने १२ ऑगस्ट २०२५ रोजी मजुरांचे काम बंद केले. वनपरिक्षेत्रांतर्गत येत असल्यास जाम बाजार येथील कंपार्टमेंट नंबर ३९९ मध्ये जलयुक्त शिवार अंतर्गत जाळेबंद म्हणजेच गॅबियन बांधकाम न करता जुने गॅबियन दुरुस्त करून नव्याने काम न करता पैशाची उचल केल्याचा दावा उपोषणकर्त्या मजुरांनी केला आहे. त्यासंदर्भात मजुरांनी संबंधित अधिकाऱ्यांना तक्रार केल्यामुळे त्यांना कामावरून काढून टाकण्यात आले आहे. मुख्य वनरक्षक यवतमाळ यांच्याकडे तक्रार दिली म्हणून काम बंद केले आहे, अशी त्यांना माहिती मिळाली आहे.त्यांच्यावर अधिकाऱ्यांकडून अन्याय होत असल्याने व वरिष्ठ अधिकारी भ्रष्टाचार करीत असल्याने त्याची सखोल चौकशी करून संबंधितावर कारवाई करण्याची मागणी मजुरांनी तक्रारीद्वारे संबंधित विभागाला केली होती.त्यांच्या तक्रारीची दखल न घेतल्यामुळे ते दि.२५ ऑक्टोबर २०२५ पासून वनविभाग कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहे.

# शेतकरी वाघाच्या दहशतीत; वनविभागाचे दुर्लक्ष

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : काळी दौलत खान वनक्षेत्रात अनेक दिवसांपासून वाघाचा संचार सुरू असूनही वनविभागाचे दुर्लक्ष होत आहे. यामुळे परिसरातील नागरिकांत संतापाची लाट असून शेतकऱ्यांनी वाघाच्या दहशतीमुळे शेतात जाणे बंद केले आहे. त्यामुळे वनविभागाने त्वरित उपाययोजना करण्याची मागणी शेतकऱ्यांसह नागरिकांतून होत आहे.

मोरवाडी परिसरातील शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात जागलीसाठी रब्बी हंगामाच्या सिंचनासाठी रात्रीच्या वेळेस महावितरणची लाइन चालू होते. त्यामुळे शेतात पाणी देण्यासाठी जावे लागते. वाघाच्या दहशतीमुळे शेतकरी वर्ग भयभीत झाला आहे. काळी दौलत खान वन विभाग मात्र या समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्या आरोप अनिता चव्हाण यांच्यासह नागरिकांनी केला आहे. वन विभागाचे गस्त किंवा बिबट्याचा बंदोबस्त करायला तयार नाही. उद्धट भाषेत शेतकऱ्यांशी संवाद साधत असल्याचे सांगितले जात आहे. संबंधित विभागाने या गंभीर तक्रारीकडे लक्ष न दिल्यास वनविभाग काळी दौलत खान येथे परिसरातील शेतकरी यांच्यासोबत आंदोलन व उपोषण करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्त्या अनिता चव्हाण यांनी निवेदनातून दिला आहे. शेतकऱ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला आहे. गत काही दिवसांपूर्वी सुनील पवार यांच्या शेतात बिबट्याने रानडुकर ठार केले होते. दरम्यान, बिबट्याच्या भीतीमुळे रात्री शेतकरी शेतीत जाण्यास धजावत नाहीत. वनविभागाचे अधिकारी फोन उचलत नसून बोलण्यास टाळाटाळ करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची दखल घेत तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी करण्यात येत आहे. काळी दौलत खान वनविभाग यांना मी अधिकाऱ्यांना वारंवार फोन केले आहेत. ते फोन उचलायला तयार नाहीत. त्यामुळे आता रीतसर तक्रार दाखल करणार आहे.

# श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात राज्यस्तरीय विज्ञान नाट्योत्सव

**शांतिनिकेतन विद्यामंदिर, सांगलीने पटकावले प्रथम पारितोषिक, पार्ले टिळक विद्यालय, मुंबई - द्वितीय; न्यू इंग्लिश स्कूल, लांडेवाडी - तृतीये**





**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषद , कोलकाता आणि नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई यांच्या सहकार्याने, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे; राज्य विज्ञान शिक्षण संस्था (प्रादेशिक विद्या प्राधिकरण), नागपूर; विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग; जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती आणि डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय विज्ञान नाट्योत्सव २०२५-२६ श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या सर सी. व्ही. रमण सभागृहात अत्यंत उत्साहात पार पडला.

या नाट्योत्सवात विज्ञान, कला आणि नाट्याचा अप्रतिम संगम दिसून आला वैज्ञानिक संकल्पना सादर करताना विद्यार्थ्यांच्या कलात्मक उर्जेची मेजवानी प्रेक्षकांना अनुभवता आला.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान हर्षवर्धनजी देशमुख, अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था यांनी भूषवले. उद्घाटन सौम्या शर्मा चांडक (भा.प्र.से.), आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. हर्षलता बुराडे, संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर यांनी सादर केले तर डॉ. जी. व्ही. कोरपे, प्राचार्य, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय यांनी स्वागतपर भाषण केले.मुख्य अतिथी मा. संजिता महापात्र (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत 'प्रत्यक्ष जीवनातील अनुभवातून शिकणे हेच खरे शिक्षण आहे,' असे सांगून विद्यार्थ्यांना विज्ञान आणि कलेच्या माध्यमातून आपले भवितव्य उज्ज्वल घडविण्याचे आवाहन केले. प्रमुख उपस्थिती अनिल साबळे, विभागीय अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावती विभाग यांनी विद्यार्थ्यांना नाटकाच्या माध्यमातून समाजोन्नतीसाठी विज्ञानाचे तत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.अधिकाधिक विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धांमधून सहभाग घेऊन व्यक्तिमत्व विकास साधावा, यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या सोहळ्याला डॉ. व्ही. जी. ठाकरे, सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमाचे संचलन डॉ. दिनेश खेडकर यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ. पंकज नागपुरे, राज्यस्तरीय नाट्योत्सव समन्वयक यांनी केले.या राज्यस्तरीय नाट्योत्सवात महाराष्ट्रातील आठ विभागांमधील आठ विजेत्या चमूंचा सहभाग होता. परीक्षक म्हणून प्रख्यात लेखक-दिग्दर्शक डॉ. चंद्रकांत शिंदे, ज्येष्ठ रंगकर्मी प्राचार्य राजाभाऊ दखणे आणि प्रा. डॉ. दिनेश खेडकर यांनी जबाबदारी पार पाडली.

सहभागी संघ:- लातूर विभाग – सरस्वती विद्यालय, तामलवाडी (धाराशिव); पुणे विभाग – न्यू इंग्लिश स्कूल, लांडेवाडी; अमरावती विभाग – प्रभात किड्स स्कूल, अकोला; मुंबई विभाग – पार्ले टिळक विद्यालय (इंग्रजी माध्यम), विलेपार्ले; नाशिक विभाग – जनता विद्यालय, लोहोणेर (देवळा, नाशिक); मराठवाडा विभाग – संस्कार प्रबोधिनी विद्यालय, कमळापूर (गंगापूर, छत्रपती संभाजीनगर); कोल्हापूर विभाग – शांतिनिकेतन विद्यालय, सांगली; नागपूर विभाग – नूतन कन्या शाळा, भंडारा.

नाट्यविषय आणि कलाविष्कार:-या वर्षीच्या नाट्योत्सवाचा मुख्य विषय होता — 'मानवकल्याणासाठी विज्ञान व तंत्रज्ञान', तर उपविषयांत हरित तंत्रज्ञान, स्मार्ट शेती, डिजिटल भारत जीवन सक्षमीकरण, स्वच्छता की दिंडी, सक्षम भारत इत्यादींचा समावेश होता.

## संक्षिप्त

### दर्यापूर नगर परिषदेच्या निवडणूक रिंगणात पत्रकार अजय

**खल्लार** - दर्यापूर नगर परिषद निवडणूक रणसंग्राम सुरू झाला असून कोण कोणत्या प्रभागातून निवडणूक लढवणार याची सर्वत्र चर्चा दर्यापूर शहरात रंगली आहे. यावेळी दर्यापूर नगर परिषद निवडणुकीत नविन चेहरे समोर येत असून प्रभाग क्रमांक ५-ब मधून या भागातील रहिवासी व पत्रकार अजय वर हे निवडणूक रिंगणात उतरणार आहेत.प्रभागातील समिरकरण लक्षात घेऊन नागरिकांच्या विचारानुसार योग्य पक्षाद्वारे निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. अनेक वर्षापासून राजकीय,सामाजिक, पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून दर्यापूर शहरातील नगर परिषद प्रभागामध्ये त्यांचा दांडगा जनसंपर्क असून गेल्या ३० वर्षापासून सर्वसामान्याच्या हक्कासाठी व त्यांच्या सुखदुःखात सहभागी होऊन अत्यंत जबाबदारी पणे सेवा कार्य आहेत.त्या बळावर ते निवडणूक रिंगणात उतरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.



### उपसरपंच शरद आठवले जि. प. निवडणूक लढविणार

**खल्लार** - दर्यापूर तालुक्यात जिल्हा परिषद निवडणूक रणसंग्राम सुरू झाला असून कोण कोणत्या सर्कल मधून निवडणूक लढवणार यासाठी सर्वत्र चर्चा तालुक्यातील सर्व गावागावात चालू आहेत. दर्यापूर तालुक्यातील चारही जिल्हा परिषद सर्कल हे अनुसुचित जाती साठी आरक्षित झाले असून पिंपळोद जिल्हा परिषद सर्कल वगळता तिन्ही जिल्हा परिषद सर्कल हे अनुसूचित जाती महिलांकरीता आरक्षित आहेत. या निवडणुकीत नविन चेहरे समोर येत असून पिंपळोद जिल्हा परिषद सर्कलमधून सांगळूदचे रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते तथा उपसरपंच शरद आठवले हे निवडणूक रिंगणात असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. शरद आठवले हे गेल्या अनेक वर्षापासून दर्यापूर तालुक्यातील राजकीय,सामाजिक, क्षेत्रात कार्यरत असून तालुक्यातील चारही जिल्हा परिषद सर्कल मध्ये त्यांचा दांडगा जनसंपर्क असून त्या बळावर ते निवडणूक रिंगणात उतरणार आहेत.



### दहावीच्या परीक्षेचे अर्ज १० नोव्हेंबरपर्यंत भरा

**अमरावती** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेचे नियमित विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाइन पद्धतीने विलंब शुल्कासह १० नोव्हेंबर २०२५ पर्यत भरायचे आहेत. परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांची आवेदनपत्र त्यांच्या शाळाप्रमुखांमार्फत भरावीत, असे आवाहन शालेय शिक्षण मंडळाने केले आहे. दहावी परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदन पत्रे ळअर्घ्ई मधील PEN-ID वरून ऑनलाइन त्यांच्या शाळाप्रमुखांमार्फत भरावयाची आहेत.

### बडनेरात कार्तिकी एकादशीनिमित्त दिंडी

**बडनेरा** - कार्तिकी एकादशीनिमित्त नव्यावस्तीतील श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थानच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिंडी सोहळा त्याचप्रमाणे भक्तीगीत व भावगीतांचा 'कानडा राजा पंढरीचा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्तिकी एकादशीच्या पूर्वसंध्येला १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता दिंडी सोहळा होणार आहे.शिक्षक कॉलनी, शिवाजी नगर, म्हाडा कॉलनी, सत्यसाईबाबा कॉलनी या परिसरात दिंडी मार्गक्रमण करेल. या दिंडी सोहळ्यासाठी विशेष व ख्यातनाम वारकरी दिंडी पथक निमंत्रित करण्यात आले आहे. २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७वाजता नामवंत कलाकारांच्या उपस्थितीत भक्तिगीत व भावगीतांचा 'कानडा राजा पंढरीचा' हा कार्यक्रम आयोजिला आहे. अमरावतीचे कलावंत सचिन गुडे यांनी या सांगीतिक कार्यक्रमाचे संयोजन केले असून यासाठी यवतमाळवरून प्रसिद्ध गायक पूर्णाजी खानोदे यांना निमंत्रित करण्यात आले.

### मालखेड (रेल्वे) ते पलसखेड रस्त्याचे काम रखडले

**अंजनगाव बारी** - तालुक्यातील मालखेड रेल्वे मार्गे कावठा-पलसखेड ७ कि.मी. मार्गाचे काम गेल्या पाच वर्षांपासून रखडले असुन डांबरीकरणाच्या प्रतिक्षेत असुन प्रवासी नागरिकांना ये-जा करताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या पाच वर्षांपासून हा रस्ता खडीकरण करून पडून असुन डांबरीकरण कधी होणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.या मार्गाने प्रवासी नागरिक, विद्यार्थी, आरोग्य कर्मचारी, शेतकरी, मंजूर ये-जा करत असुन खडीकरण रस्त्यावरील मोठ-मोठाल्या गिट्या उकळून उघड्या पडल्या असून किरकोळ अपघाताचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरिकांना त्रस्त झाले असुन याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे याकडे दुर्लक्ष असुन स्थानिक लोकप्रतिनिधी याकडे लक्ष देऊन हा मार्ग डांबरीकरण करण्यात येण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.


# प्रभातकालीन काकडा आरतीने नया अकोला होते भक्तीमय



**वलगाव** - कार्तिक महिन्याच्या आगमनानंतर ग्रामिण भागात सर्वत्र अध्यात्मिक आणि भक्तीमय वातावरण अनुभवायला मिळत आहे. नया अकोला येथेही पहाटेच्या शांत वातावरणात दररोज निघणाऱ्या काकडा आरतीच्या प्रभातफेरीने गावाचा परिसर भक्तीभावाने दुमदुमत आहे. या परंपरागत धार्मिक उपक्रमात गावातील चिमुकल्या पासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांचा उत्स्फूर्त सहभाग असतो.

सकाळच्या वेळेस काकडा आरतीसाठी मंडळी एकत्र येतात आणि गावातील प्रमुख रस्त्यांवरून आरती, भजन आणि भक्तिगीतांच्या गजरात प्रभातफेरी काढली गावातील जाते. प्रभातफेरी दरम्यान प्रत्येक मंदिरासमोर थांबून आरती, पूजन आणि भजनाचे सादरीकरण केले जाते. या भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण गावात सकारात्मक ऊर्जा आणि काकडा आरतीसाठी मंडळी येतात एकत्र आनंदाचे वातावरण धार्मिक उपक्रम कार्तिक महिन्यात निर्माण होते. हा दररोज पार पडत असून, कार्तिक पौर्णिमेला या काकडा आरतीचा समारोप मोठ्या उत्साहात केला जातो. नया अकोला येथे अनेक वर्षापासून सुरू असलेली ही परंपरा आजही तितक्याच श्रद्धा आणि भक्तिभावाने जपली जात असून, प्रभातकाळी होणाऱ्या या आरतीने गावाचा परिसर दररोज भक्तीमय होत आहे.

## एकलव्य गुरुकुल स्कूलच्या खेळाडूंची राज्यस्तरिय धनुर्विद्या स्पर्धेत निवड



**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वाशिम द्वारा आयोजित विभाग स्तरीय शालेय धनुर्विद्या स्पर्धा पार पडल्या.

या स्पर्धेत १४ वर्ष वयोगटात मुलांमध्ये एकलव्य गुरुकुल स्कूल नांदगाव खंडेश्वर येथील विद्यार्थी अंश भोयर याने प्रथम क्रमांक, स्वरित पकडे याने चतुर्थ क्रमांक प्राप्त केला. यश इंग्लिश स्कूलची १४ वर्षे वयोगटात मुलींमध्ये मनस्वी प्रवीण खंडार हिने प्रथम क्रमांक प्राप्त करून सुवर्णपदकाचे मानकरी ठरली या सर्व खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड करण्यात आली असून राज्यस्तर स्पर्धा तालुका क्रीडा संकुल दिग्रस येथे एकलव्य क्रीडा अकादमीच्या मैदानावर नियमित सराव करतात. या सर्व खेळाडूंचे एकलव्य गुरुकुल स्कूलचे मुख्य मार्गदर्शक सदानंद जाधव ( शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त ) एकलव्य क्रीडा अकादमी चे अध्यक्ष विशाल ढवळे, गणेश जाधव ( प्रभारी उपसंचालक क्रीडा विभाग ) एकलव्य गुरुकुल स्कूलचे व्यवस्थापक अनुप काकडे. एकलव्य क्रीडा अकादमीचे पदाधिकारी राजेंद्र लवंगे, उत्तमराव मुरादे, महेंद्र मेटकर, अनिल निकोडे, संदीप डोफे, उमेश परसनकर, एकलव्य गुरुकुल स्कूलचे शिक्षक,शिक्षिका प्रा. गजानन काकडे यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धसाठी शुभेच्छा दिल्या या सर्व खेळाडूंना, धनुर्विद्या क्रीडा मार्गदर्शक एन. आय. एस. कोच अमर जाधव, विलास मारोटकर, प्रतीक पोकळे यांच्या मार्गदर्शनात एकलव्य क्रीडा अकादमीच्या मैदानावर सराव करतात.

# बडनेरा-यवतमाळ महामार्ग बनला जीव घेणारा

**शिंगणापूर रस्त्यांनी खड्डेच खड्डे, शिवसेनेचा दोन दिवसांचा साबा विभागाला अल्टिमेट**



**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

अमरावती यवतमाळ या महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहन चालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. खड्डा चुकवण्याच्या प्रयत्नात दररोज अपघात घडत आहे. दोन दिवसात खड्डे बुजवून रस्ता दुरुस्ती करावी अन्यथा रास्ता रोको आंदोलन छेडू असा इशारा उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रकाश मारोटकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिला.

गेल्या अनेक वर्षापासून अमरावती यवतमाळ महामार्गाचे काम करण्यात आले नसल्याने दरवर्षी पावसाळ्यात रस्त्याला मोठ्या प्रमाणात खड्डे पडतात सार्वजनिक बांधकाम विभाग थातूर मातूर डाग डुजी करून रस्ता दुरुस्ती करतात परंतु सदर महामार्गाने दररोज अपघात होत असल्याने वाहन धारकांचा जीव धोक्यात आला आहे. अमरावती जिल्ह्यातील सर्वच महामार्गाचे काम झाले आहे या भागातील लोकप्रतिनिधींचे याकडे दुर्लक्ष असून अनेक वर्षापासून हा महामार्ग प्रलंबित आहे.

सध्या स्थितीत सदर महामार्गाने बेंबळा पूल, धानोरा गुरव बस स्टॉप, माऊली चोर ते वसू यांचे पेट्रोल पंप धानोरा ते माउली पर्यंत या इत्यादी ठिकाणी मोठ मोठे खड्डे पडले आहे. दररोज शेकडो वाहने सदर रस्त्यांनी जाणे येणे करतात मात्र याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग दुर्लक्ष करीत आहे. तात्काळ खड्डे बुजवून रस्ता दुरुस्ती दोन दिवसात करावी अन्यथा रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन सादर करून दिला आहे.

यावेळी निलेश इखार वासुदेव लोखंडे रवी ठाकूर शुभम रावेकर नितीन दुधे पवन शिरभाते अक्षय हिवराळे भूमेश्वर गोरे इत्यादी उपस्थित होते

# अमरावती महानगरपालिकेची डिजिटल झेप

**ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे प्रशासन अधिक पारदर्शक आणि वेगवान**

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिका आता प्रशासनाच्या डिजिटल युगात एक पाऊल पुढे टाकत आहे. ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित अत्याधुनिक डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर विकसित आणि कार्यान्वित करण्याचा महत्वाकांक्षी उपक्रम महानगरपालिकेत राबविला जात आहे. या माध्यमातून प्रशासन अधिक पारदर्शक, उत्तरदायी, कार्यक्षम आणि नागरिकाभिमुख करण्याचे उद्दिष्ट महानगरपालिकेने ठेवले आहे

फसवणूक-प्रतिबंधित आणि सुरक्षित नोंदी-ब्लॉकचेन ही अशी तंत्रज्ञान प्रणाली आहे जी डेटा एकदा नोंदवल्यानंतर त्यामध्ये फेरफार करणे अशक्य करते. त्यामुळे महानगरपालिकेतील महत्त्वाच्या अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र, विविध परवाने आदी सर्व माहिती अधिक सुरक्षित आणि फसवणूक-प्रतिबंधित बनेल. बनावट कागदपत्रांची शक्यता जवळपास संपुष्टात येईल.

आधारित तात्काळ पडताळणी सुविधा-महानगरपालिकेच्या प्रत्येक अधिकृत प्रमाणपत्रावर कोड असणार आहे. नागरिकांनी केवळ मोबाईलद्वारे स्कॅन करून त्या प्रमाणपत्राची तात्काळ पडताळणी करू शकतील. हे नागरिकांसाठी एक मोठे सुलभीकरण ठरेल आणि बनावट प्रमाणपत्रांचा धोका पूर्णपणे नष्ट होईल.

पूर्ण पारदर्शक आणि उत्तरदायी शासन-ब्लॉकचेन तंत्रज्ञानात प्रत्येक व्यवहाराचा स्पष्ट आणि सार्वजनिक मागोवा ठेवला जातो. यामुळे प्रत्येक निर्णयाची ट्रेसेबिलिटी वाढेल, जबाबदारी निश्चित होईल आणि भ्रष्टाचारास आळा बसेल. प्रशासनातील प्रत्येक पाऊल डिजिटल स्वरूपात नोंदविले जाईल, ज्यामुळे नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल.

नागरिक-केंद्रित आणि कागदविरहित सेवा प्रणाली-महानगरपालिकेच्या सर्व सेवांचा उद्देश नागरिकांना जलद, सोपा आणि विश्वासार्ह अनुभव देणे हा आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञानाच्या मदतीने पूर्णपणे कागदविरहित प्रशासन कार्यान्वित होणार असून, नागरिकांना ऑनलाईन अर्ज, पडताळणी आणि मंजुरी एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर मिळणार आहे.



अमरावतीसाठी नवा 'स्मार्ट प्रशासन' मॉडेल-या प्रकल्पामुळे अमरावती महानगरपालिका राज्यातील इतर शहरांसाठी एक आदर्श ठरणार आहे. प्रशासनिक प्रक्रियेत डिजिटल पारदर्शकता, कार्यक्षमता आणि नागरिकसहभाग वाढविण्याचा हा उपक्रम देशभरातील शहरी स्थानिक संस्थांसाठी मार्गदर्शक ठरेल.

नागरिकांचा सहभाग आणि विश्वास वाढविण्यासाठी पुढील पाऊल-महानगरपालिका लवकरच नागरिकांसाठी जनजागृती मोहिम राबवणार आहे, ज्यामध्ये ब्लॉकचेन तंत्रज्ञानाची माहिती, त्याचा वापर आणि त्याचे फायदे नागरिकांना समजावून सांगितले जातील. तसेच, ऑनलाईन डेमो आणि प्रशिक्षण सत्रांचेदेखील आयोजन करण्यात येणार आहे.

**स्मार्ट शहराकडून स्मार्ट प्रशासनाकडे - अमरावती**

महानगरपालिका तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रशासनात पारदर्शकता, कार्यक्षमता आणि विश्वास निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अमरावती 'स्मार्ट प्रशासन' या नव्या संकल्पनेचे केंद्र बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे.

# पापळ येथील कृषी महाविद्यालयाच्या निमित्ताने

भारतात कृषीं क्रांती आणणारे शिक्षणमहर्षी, कृषिरत्न डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जन्मगावी पापळ येथे भाऊसाहेबांच्या नावाने कृषीं महाविद्यालय स्थापन करण्यासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्था आणि इतर अनेकांच्या प्रयत्नांना यश आले आहे. नुकताच या संदर्भातील शासनादेश प्रसिद्ध झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य सरकारने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेत भाऊसाहेबांना आदरांजली दिली आहे. आज स्व. दादासाहेब गवई यांच्या स्मारकाच्या उद्घाटनप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री अमरावती शहरात येत असतानाच शिवाजी शिक्षण संस्थेच्या कृषीं महाविद्यालयाच्या मागची भुमिका आणि त्यामागील अनेक वर्षांचा प्रवास मांडण्यासाठी केलेला हा लेखप्रपंच.



स्वातंत्र्यापूर्वी ज्या देशात अन्नधान्याचा तुटवडा राहून भूकेने देखील इथला जनता मरत होती त्याच काळात या देशाला मातीशी जुळलेला पहिला कृषिमंत्री डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या रूपाने मिळाला. अतिशय गंभीर परिस्थिती असताना या देशात कृषिक्रांती घडवून आणण्यासाठी भाऊसाहेब देशमुखांनी या देशात अनेक प्रयोग राबविले. शेतकऱ्यांना शेतीचे नवे तंत्रज्ञानाची ओळख करून दिली. दिल्ली येथे जागतिक कृषीं प्रदर्शन भरवून संपूर्ण जगातील कृषीं तंत्रज्ञान भारतात आणून कृषिक्रांतीचा नवा पाया रचला. या देशातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या प्रगत झाला तरच हा देश सुखी होईल ही भाऊसाहेबांची भुमिका देखील तेवढीच महत्वाची होती. भाऊसाहेबांनी भात, मशरूम यांच्या शेतीचे प्रयोग, शेतीत नवे तंत्रज्ञानाचा वापर, अधिक धान्य देणार्या नव्या जातींचा शोध, कृषि क्षेत्रातील चांगल्या संशोधकांना भारतात आणले. एम.एस.स्वामीनाथन हे देखील त्यापैकीच एक होते. कृषिक्रांतीची ज्योत पेटविणाऱ्या भाऊसाहेबांच्या धोरणांमुळेच पुढील दशकभरात हा देश धान्याच्या बाबतीत सक्षम बनला एवढेच नव्हे तर निर्यात देखील करू लागला. भाऊसाहेबांचे कृषीं क्षेत्रातील कार्य हे अनन्यसाधारण असेच आहे. त्यांनी या सर्वच बाबतीत दिलेले योगदान हे या देशासाठी लाभदायी राहिले आहे.

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील पापळ येथे भाऊसाहेबांच्या नावाने कृषीं महाविद्यालय सुरू करण्यासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे प्रयत्न गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहेत. या प्रयत्नांमध्ये संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या नेतृत्वात संपूर्ण कार्यकारिणीने शासनाकडे सातत्याने पाठपुरावा विविध माध्यमातून सातत्याने केला आहे. विशेष म्हणजे या प्रयत्नात आ.रणधीर सावरकर, आ. प्रताप अडसड यांचेही विशेष योगदान लाभले हे सांगणे क्रमप्राप्त आहे. १० एप्रिल २०२३ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांच्याकडे संस्थेने पापळ येथे कृषीं महाविद्यालय स्थापनेला मंजुरी देण्याची विनंती केली असता त्यांनी तात्काळ आपल्या भाषणातून या मागणीला दुजोरा देत हे महाविद्यालय सुरू होईल अशी घोषणा केली होती. या घोषणेनंतर संस्थेने प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा केला. अखेर देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या घोषणेची पूर्तता केली आणि स्वत: मुख्यमंत्री बनल्यानंतर अखेर या कृषीं महाविद्यालयाच्या स्थापनेला मंजुरी प्रदान करित आपला दिलेले वचन पाळले आहे. संतांनी सांगितल्याप्रमाणे 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' ही ओळ निश्चितपणे या ठिकाणी मांडावीशी वाटते.

विदर्भातील बहुजनांना शिक्षणाची वाट दाखवून प्रगतीच्या मार्गावर नेणारे डॉ. पंजाबराव देशमुख यांनी कृषीं आणि शिक्षण या दोन्ही बाबींना महत्व देऊन देशाला दिशा देण्याचे काम केले आहे. त्यामुळेच आज देशात कृषि शिक्षणाचे महत्व अनन्यसाधारण आहे. कृषीं क्षेत्राला प्रगत करण्यासाठी शेतकरीपुत्रांना कृषिचे शिक्षण देऊन इथल्या शेतकरी वर्गाला सक्षम करण्याचा मानस श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा सातत्याने राहिला आहे. संस्थेच्या श्री शिवाजी कृषि महाविद्यालयाने आजवर हजारो, लाखो कृषि पदवीधर समाजाला दिले आहेत. आज कृषीं अभ्यासक्रमांना या भागातील शेतकरी वर्गाची मागणी आहे. भाऊसाहेबांच्या कृषिकार्याचा वसा घेऊन श्री शिवाजी शिक्षण संस्था निश्चितच यापुढेही अशीच मार्गक्रमण करित राहिल असा आम्हाला विश्वास आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, कर्मयोगी संत गाडगे बाबा आणि भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांची कर्मभूमी म्हणून अमरावती जिल्ह्याची ओळख आहे. याच जिल्ह्यात केरळ आणि बिहारचे राज्यपाल राहिलेले दादासाहेब गवई यांचेही राजकीय, सामाजिक योगदान हे अनन्यसाधारण असेच आहे. आज दादासाहेबांच्या स्मारकाचे उद्घाटन करण्यासाठी देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यासह राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अमरावती शहरात येत आहेत. सोबतच भाऊसाहेबांच्या जन्मभूमीत कृषि महाविद्यालय सुरू होणे हा एक दुग्धशर्करा योग बनलेला आहे.

**गौरव निळकंठ इंगळे (देशमुख)**
अमरावती.

# आर एस एस प्रकरणात कर्नाटक काँग्रेस सरकारला हायकोर्टाकडून 'चपराक'

कर्नाटकातील उच्च न्यायालयाच्या धारवाड खंडपीठाने सार्वजनिक कार्यक्रमांसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला (RSS) कर्नाटक सरकारची पूर्वपरवानगी अनिवार्य करणाऱ्या आदेशाला स्थगिती दिली आहे. यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला मोठा दिलासा मिळाला आहे. खरं तर, हा आदेश सरकारकडून काढला गेल्या पासूनच वादग्रस्त ठरला होता. या निर्णयामुळे यापुढे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमांसाठी त्यांना राज्य सरकारची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक नसणार. त्यामुळे हा उच्च न्यायालयाचा निर्णय एकप्रकारे कर्नाटक सरकारला दिलेली 'चपराक' मानला जात आहे. याआधीही कर्नाटकातील चित्तपूर (जिल्हा कलबुर्गी) येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पथ संचलनावरून मोठा राजकीय आणि न्यायालयीन संघर्ष उभा राहिला आहे. हा मतदारसंघ काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि त्यांचे पुत्र तथा राज्याचे गृह राज्यमंत्री प्रियांक खरगे यांचा बालेकिल्ला मानला जातो. स्थानिक प्रशासनाने शांतता आणि कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता व्यक्त करत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पथ संचलनास परवानगी नाकारली होती. एवढेच नाही, तर पोलिसांनी संरक्षणात स्थानिक नगर परिषदेने मुख्य रस्त्यावर लावलेले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कट-आऊट आणि बॅनरही काढून टाकले.प्रशासनाच्या या भूमिकेविरोधात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने अशोक पाटील यांनी कर्नाटक उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवर सुनावणी करताना, न्यायमूर्ती एम.जी.एस. कमल यांनी महत्त्वाचा आदेश दिला. न्यायालयाने राष्ट्रीय स्वयंसेवक



संघाला चित्तपूर येथे २ नोव्हेंबर रोजी 'रूट मार्च' काढण्यासाठी नव्याने अर्ज दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.गेल्या काही महिन्यांपासून काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि त्यांचे पुत्र तथा राज्याचे गृह राज्यमंत्री प्रियांक खरगे सातत्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि हिंदुत्ववादी संघटनांना लक्ष्य करत आहेत. यामागे एक प्रमुख राजकीय कारण असे आहे की त्यांना काँग्रेस हाय कमांड आणि विशेषतः राहुल गांधी यांना हे दाखवायचे आहे की आपणही त्यांच्या इतकेच 'संघ-विरोधी' आहोत. या मागील आणखी एक राजकारण आहे: कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला जो विजय मिळाला, त्याचे श्रेय उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांना दिले जाते. कर्नाटकात लिंगायत आणि वोक्कालिगा हे दोन प्रमुख समाज आहेत. शिवकुमार हे वोक्कालिगा समाजातून येतात. आजपर्यंत हा समाज माजी पंतप्रधान देवेगौडा यांच्या जनता दल सेक्युलर (JDS) पक्षामागे उभा होता, कारण तेसुद्धा याच समाजाचे प्रतिनिधित्व करतात. पहिल्यांदाच हा समाज विधानसभा निवडणुकीत डी.के. शिवकुमार यांच्या नेतृत्वामुळे पूर्णतः काँग्रेसकडे वळला. यामुळे जेडीएसला मोठा धक्का बसला आणि काँग्रेसचा विजय झाला. या विजयानंतर मुख्यमंत्रिपद आपल्या समाजाला आणि त्याद्वारे आपणास मिळण्याबाबत डी.के. शिवकुमार आग्रही होते. परंतु, काँग्रेसने यावर अडीच वर्षांचा फॉर्म्युला काढला: पहिले अडीच वर्षे सिद्धरामय्या आणि दुसरे अडीच वर्षे डी.के. शिवकुमार. येणाऱ्या नोव्हेंबर-२०२५ मध्ये पहिले अडीच वर्षे संपणार आहेत. मात्र, मुख्यमंत्री सिद्धरामय्या हे पद सोडण्यास उत्सुक दिसत नाहीत. यासाठी कर्नाटक काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रिपदावरून जोरदार रस्सीखेच सुरू आहे. एकंदरीत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर निर्बंध लादण्याचा कर्नाटक सरकारचा प्रयत्न उच्च न्यायालयाने फेटाळला, तसेच चित्तपूरच्या पथ संचलनासाठी नव्याने अर्ज करण्याचे आदेश दिले. या न्यायालयीन निर्णयांनी कर्नाटक सरकारला मोठा 'झटका' दिला असला, तरी या संघर्षाचे मूळ खरगे पिता-पुत्रांच्या वाढत्या 'संघ-विरोध' आणि मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या खुर्चीला असलेला धोका यांत दडलेले आहे. नोव्हेंबर २०२५ मध्ये अडीच वर्षांचा कालावधी पूर्ण होणार असताना, राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरील कारवाई हे एक राजकीय 'ढाल' ठरते आहे, ज्याद्वारे सिद्धरामय्या गट मुख्यमंत्रिपदाच्या चर्चेला बगल देऊन आपले वर्चस्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे, आगामी काळात न्यायालयातील लढाईपेक्षाही कर्नाटकातील काँग्रेसच्या अंतर्गत राजकारणात अधिक मोठे राजकीय 'पथ संचलन' पाहायला मिळेल, हे निश्चित.'

**अविनाश देशपांडे**

# जागतिक बचत दिन
# आर्थिक जबाबदारीचे सामाजिक भान

जागतिकीकरणाच्या, उपभोगतावादाच्या आणि झपाट्याने बदलणाऱ्या आर्थिक व्यवस्थेच्या या युगात 'बचत' ही केवळ आर्थिक क्रिया न राहता ती एक सामाजिक मूल्य, संस्कृती आणि नागरिक जबाबदारी म्हणून पाहिली जाऊ लागली आहे. दरवर्षी ३० ऑक्टोबर रोजी जगभरात साजरा केला जाणारा 'जागतिक बचत दिन' म्हणजे केवळ आर्थिक संस्थांचा उत्सव नसून, तो व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांच्या एकत्रित शाश्वत भविष्यासाठीची सजगता दाखवणारा दिवस आहे. या दिवसाची संकल्पना दुसऱ्या महायुद्धाच्या काळानंतर निर्माण झाली. १९२४ मध्ये इटलीतील मिलान येथे झालेल्या पहिल्या International Savings Bank Congress मध्ये या दिनाचे औचित्य जाहीर करण्यात आले. त्यामागील उद्दिष्ट होते की लोकांना बचतीचे महत्त्व समजावून सांगणे, आणि 'थोडे आज राखले तर उद्याचा दिवस सुरक्षित राहील' हा मूलभूत विचार जानामानासाता रुजवणे.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, 'बचत' ही फक्त पैशाची साठवणूक नाही; ती समाजाच्या मूल्यव्यवस्थेचा आणि सांस्कृतिक शिस्तीचा भाग आहे. प्रत्येक समाजाची आर्थिक रचना त्याच्या सामाजिक वृत्तीवर आधारित असते. मॅक्स वेबर यांनी मांडलेल्या 'Protestant Ethic and the Spirit of Capitalism' या सिद्धांतानुसार, आर्थिक शिस्त, मेहनतीची सवय आणि बचतीची वृत्ती या गोष्टी भांडवलशाहीच्या वाढीस कारणीभूत ठरल्या. यावरून दिसते की बचत ही केवळ वैयक्तिक नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचीही गुरुकिल्ली आहे. समाजातील प्रत्येक घटकाने जबाबदारपणे संसाधनांचा वापर करणे आणि उद्यासाठी काही राखून ठेवणे हेच शाश्वत समाजाचे लक्षण आहे.



आजच्या आधुनिक समाजात मात्र उपभोगतावादाची प्रवृत्ती वाढली आहे. त्वरित समाधान, लक्झरीचा मोह आणि क्रेडिट कार्ड संस्कृती यामुळे 'उद्यासाठी बचत' ही कल्पना मागे पडत चालली आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे परिवर्तन आहे. एक काळ असा होता की बचत ही 'मध्यमवर्गीय मूल्यव्यवस्थेचा' आधार होती. पण आता ती हळूहळू 'उपभोगवादी संस्कृतीच्या' प्रभावाखाली दबली आहे. जाहिराती, सोशल मीडिया, ब्रँडेड जीवनशैली, आणि कर्जाधारित अर्थव्यवस्था यांनी व्यक्तीच्या विचारांवर परिणाम केला आहे. 'आत्ताच खर्च करा, नंतर विचार करा' ही मानसिकता नव्या पिढीच्या जीवनशैलीत शिरली आहे. या प्रवृत्तीचा परिणाम केवळ आर्थिक नाही, तर तो सामाजिक आणि सांस्कृतिक अस्थैर्य निर्माण करणारा आहे. समाजशास्त्रानुसार, बचत ही सामाजिक सुरक्षा यंत्रणेचा पाया आहे. जे समाज भविष्यासाठी नियोजन करतात, संसाधनांचे योग्य व्यवस्थापन करतात आणि अनावश्यक खर्च टाळतात, ते समाज संकटकाळात अधिक मजबूत राहतात. उदा. कोविड-१९ महामारीच्या काळात ज्या कुटुंबांकडे थोडीफार बचत होती, त्यांनी रोजगार, उत्पन्न आणि आरोग्य संकटांना अधिक चांगल्या प्रकारे सामोरे गेले. दुसरीकडे, अनियोजित खर्च करणाऱ्या, किंवा 'दिवसेंदिवस जगणाऱ्या' कुटुंबांना अत्यंत आर्थिक ताण सहन करावा लागला. त्यामुळे बचत ही केवळ वैयक्तिक नाही तर सामूहिक सामाजिक स्थैर्याची गुरुकिल्ली आहे.

भारतीय ग्रामीण समाजात बचतीचे रूप 'स्वयं-सहायता गटां'द्वारे अधिक दृढ झाले आहे. महाराष्ट्रातील महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून केवळ आर्थिक स्वावलंबनच मिळवले नाही, तर सामाजिक निर्णय प्रक्रियेतही आपला सहभाग वाढवला आहे. अशा गटांनी बचतीची संस्कृती समाजाच्या तळागाळात रुजवली आहे. याला समाजशास्त्रीय अर्थाने 'ग्रामस्तरीय सामाजिक पूंजी' (social capital) म्हणता येईल. बचतीद्वारे निर्माण झालेला हा सामाजिक विश्वास आणि सहकार्याचा पाया, समाजातील परस्परावलंबित्व अधिक दृढ करतो.अर्थशास्त्रज्ञ ॲमर्त्य सेन यांनी सांगितले आहे की, विकास म्हणजे केवळ उत्पन्नवाढ नव्हे तर मानवी क्षमतांची वाढ होय. बचत हे त्या क्षमतावृद्धीचे मूलभूत साधन आहे. बचत आपल्याला स्वावलंबन देते, निर्णयक्षमता वाढवते आणि जीवनातील अनिश्चिततेविरुद्ध सुरक्षा कवच तयार करते. जेव्हा समाजातील प्रत्येक घटक बचतीचे महत्त्व ओळखतो, तेव्हा समाजात 'आर्थिक लोकशाही' मजबूत होते. याचा अर्थ, समाजातील सर्व स्तरांना आपल्या गरजा पूर्ण करण्याची आणि भविष्यासाठी नियोजन करण्याची समान संधी मिळते.


जागतिक बचत दिनाचा उद्देश केवळ बँकांमध्ये पैसे ठेवण्यापुरता मर्यादित नाही. त्यामागे एक व्यापक सामाजिक अर्थ आहे, तो म्हणजे 'जबाबदार उपभोग' आणि 'शाश्वत विकास' होय. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, बचत आणि शाश्वतता या एकमेकांशी घट्ट निगडित संकल्पना आहेत. जर प्रत्येक नागरिकाने आपल्या संसाधनांचा वापर मर्यादित केला आणि उद्यासाठी थोडे राखून ठेवले, तर समाजातील विषमता कमी होईल. अशा प्रकारे बचत ही समानतेच्या सामाजिक तत्त्वाची पायाभरणी करते. पण बचत केवळ आर्थिक न राहता ती मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपातही आवश्यक आहे. वेळेची बचत, ऊर्जेची बचत, संसाधनांची बचत हे सर्व 'सामाजिक जबाबदारी'च्या रूपात पाहायला हवे. शाळांमध्ये आर्थिक साक्षरता, बचतीचे महत्त्व आणि संसाधन व्यवस्थापन यावर शिक्षण दिले गेले तर नवी पिढी अधिक जबाबदार नागरिक म्हणून घडेल. जर्मनी, जपान, स्वित्झर्लंडसारख्या देशांनी आपल्या नागरिकांमध्ये लहानपणापासून बचतीची सवय लावली आणि त्यामुळेच त्यांचे समाज आर्थिकदृष्ट्या स्थिर झाले. भारतातही 'पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज', 'जन-धन योजना', 'सुकन्या समृद्धी योजना' अशा उपक्रमांद्वारे सरकारने बचतीचा प्रसार करण्याचे प्रयत्न केले आहेत. पण खरी गरज आहे ती 'बचत ही समाजाचा सांस्कृतिक स्वभाव बनवणे' या उद्दिष्टाची. समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खाइम यांनी सांगितले की, समाजातील नैतिक मूल्ये आणि नियम हे समाजाच्या एकात्मतेचे सूत्र आहेत. बचतीची संस्कृतीही असेच एक नैतिक मूल्य आहे. ती व्यक्तीला संयम, आत्मशिस्त आणि उत्तरदायित्व शिकवते. या मूल्यांच्या आधारे समाजात स्थैर्य आणि एकात्मता निर्माण होते. म्हणूनच जागतिक बचत दिन हा फक्त आर्थिक शिक्षणाचा दिवस नाही; तो सामाजिक नैतिकतेच्या पुनर्स्मरणाचा दिवस आहे.शेवटी, बचत ही फक्त पैशाची गोष्ट नाही, ती भविष्याची, स्थैर्याची आणि जबाबदारीची गोष्ट आहे. जो समाज आजची गरज आणि उद्याची तयारी यांच्यात समतोल राखतो, तोच समाज खऱ्या अर्थाने प्रगत होतो. म्हणूनच जागतिक बचत दिन हा प्रत्येकाने आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. आपण आज किती खर्च करतो आणि उद्यासाठी किती राखून ठेवतो? समाजशास्त्र सांगते की, व्यक्तीचा विवेकशील आर्थिक निर्णय हा संपूर्ण समाजाच्या प्रगतीचा आरसा असतो. बचत म्हणजे फक्त आर्थिक नियोजन नव्हे, तर सामाजिक शिस्तीचे आणि नैतिक जबाबदारीचे जिवंत प्रतीक आहे. म्हणूनच या जागतिक बचत दिनानिमित्त आपण सर्वांनी ठरवले पाहिजे की बचत करणे म्हणजे फक्त पैसे वाचवणे नव्हे, तर समाजाला स्थैर्य, जबाबदारी आणि शाश्वत भविष्य देणे होय.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# न्याय मागायचा कुणाला ?

'एखाद्याला मरणासाठी रोज हजारो कारणे मिळू शकतात पण अस्मानी आणि सुलतानी संकटाला चिरून जगणारी जमात म्हणजे शेतकरी 'पण या सरकारी धोरणासमोर कधी कधी तो हतबल होतो आणि शेवटचा पर्याय म्हणून आत्महत्या करतो त्याला असे वाटते आपल्या आत्महत्येमुळे आपल्या परिवाराचे भले होईल, पण त्याला कुठे माहित तो गेल्यामुळे या भ्रष्ट प्रशासनामुळे त्या परिवाराचे काय होते किती कष्ट पडतात त्या विधवेला व तिच्या लहान लेकरांना, शेतकऱ्याने केलेली ती आत्महत्या नसून सरकारी धोरनाणे घेतलेला बळी असतो पण हम करे सो कायदा म्हणणारे सरकार ते मानायला तयारच नसतात.

आज एका वृत्तपत्रात बातमी वाचली 'आठव्या वेतन आयोगाला केंद्राची मान्यता'आता ५० लाख केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांचा पगार वाढणार व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना जानेवारी २०२६ पासून त्याचा लाभ मिळणार न कोणता मोर्चा, न कोणते आंदोलन, न उपोषण न आत्महत्या तरीसुद्धा आठवा वेतन आयोग आणि दुसरी बातमी होती बच्चू कडू यांच्या नेतृत्वात शेतकरी कर्जमाफी व हमीभावासाठी शेतकरी रस्त्यावर त्यासाठी नागपूरात मोर्चा बघा तफावत? शेतकऱ्यांना कोण समजून घेणार खरे म्हणजे शेतकऱ्यांना समजून घेण्याचे काम शेतकरी संघटना, सरकार (विशेषतः कृषी मंत्री),शेतीविषयक धोरणकर्ते आणि कृषी क्षेत्रातील तज्ञ करतात पण सध्या ज्याला त्याला राजकीय हित साधन्यातच धन्यता वाटते त्यामुळे शेतकऱ्यांना समजून घेणार सध्या तरी कुणीही नाही.कारण महिलांवर अत्याचाराचे आरोप असणाऱ्यांना मंत्रिपद व भ्रष्टाचाराचे आरोप असणारे यांच्या मांडीला मांडी लावून बसलेले आहेत. व सरकारवर टीका टिप्पनी केली की नोटीस ही हुकूमशाही राजवट सध्या राज्यात आहे.सरकार व नोकरदार यांची सांगड आहे. जे कधीही तुटू शकत नाही सरकारच्या प्रत्येक विभागात युनियन, असोसिएशन व त्यांचा प्रमुख हा सत्ताधारी पक्षाचा जवळचा असतो तो बदल्या पासून ते एखाद्याची निलंबनाची कारवाई सुद्धा टाळू शकतो अशी कित्येक उदाहरणे महाराष्ट्रात आहे. अनेक भ्रष्ट अधिकारी आरोप सिद्ध झाल्यावरही तात्काळ निलंबनावर स्टे आणतो तो कसा तर राजकीय पक्षाशी हातमीळवनी करूनच ना, तशी एकता किंवा युनियन शेतकऱ्यांची नाही कुणी ती करू पाहत असेल तर त्याला साम, दाम दंड, भेदाचा वापर करून तोडल्या जाते कशी होणार शेतकऱ्यांची युनियन व कशी टिकेल त्यांची एकता.सध्या महाराष्ट्र अशा परिस्थितीतुन जातोय जिथे कोणत्याही क्षणी जनतेचा व शेतकऱ्यांचा उद्रेक होईल कारण राज्यातिल सरकार निवडणूक निवडणूक खेळतंय त्यांना जनतेच्या समस्ये पेक्षा आपला पक्ष स्थानिक स्वराज संस्थेत कसा सत्तेत येईल



याच जास्त महत्व आहे. त्यामुळे जून ते सप्टेंबर मध्ये अतिपावसाने शेतकऱ्यांचे झालेले नुकसान,रोगराई व शेती खरडून गेल्याने पिकात झालेली घट,हमीभाव व बाजार समितीतील भावात असलेली तफावत, महिलावरील अत्याचार, गुंडगिरी, भ्रष्टाचार यापेक्षा सत्ताधारी पक्षाला निवडणूक महत्वाची वाटते.मग बळीराजाचा वाली कोण ? त्याने न्याय कुणाला मागावा?

**अमोल पाटील भारसाकळे**
**अमरावती**

# भारतातील अणू युगाचे जनक-डॉ होमी जहांगीर भाभा



भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज जन्मदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

# कृषी सहाय्यकांना अभय : बदलीस टाळाटाळ!

## खेट्री सरपंचांचा ठिय्या आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

***पातूर तालुक्यातील टाकळी खेट्री परिसरात पीक नुकसानीच्या सर्वेक्षणात घोळ करणाऱ्या कृषी सहाय्यक एम. एम. पेंढारकर यांच्या बदलीचा मुद्दा चांगलाच चिघळला आहे. तहसीलदारांनी १४ ऑक्टोबर रोजी तालुका कृषी अधिकाऱ्यांना बदलीसंदर्भात पत्र दिल्यानंतरही अद्याप कारवाई न झाल्याने शेतकऱ्यांत संताप उसळला आहे.***




खेट्री ग्रामपंचायतीचे सरपंच जहूर खान यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांना २९ ऑक्टोबर रोजी दिलेल्या निवेदनातून, 'चार दिवसात कृषी सहाय्यकांची बदली न झाल्यास कृषी कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येईल,' असा इशारा दिला आहे.

टाकळी खेट्री परिसरात झालेल्या पीक नुकसानीच्या सर्वेक्षणात पथकातील कर्मचाऱ्यांनी आर्थिक व्यवहार करून फक्त ३६ जवळच्या शेतकऱ्यांचाच पंचनामा केल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही शेतकऱ्यांच्या नावावर पीकपेरेची नोंद नसतानाही त्यांना पीक नुकसानीचा लाभ देण्यात आल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

यासंदर्भात सरपंच जहूर खान व शेतकऱ्यांनी २९ सप्टेंबर रोजी तहसीलदारांकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर ९ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला होता. तक्रारीची दखल घेत तहसीलदारांनी १४ ऑक्टोबर रोजी तालुका कृषी अधिकाऱ्यांना बदलीसंदर्भात पत्र दिले होते. मात्र दोन आठवड्यांहून अधिक काळ लोटूनही कारवाई न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

> 'तहसीलदारांनी कृषी सहाय्यक एम. एम. पेंढारकर यांच्या बदलीचे पत्र दिल्यानंतरही कारवाई होत नाही. सर्वेक्षणात आर्थिक घोळ करून शेतकऱ्यांना अन्याय केला गेला. चार दिवसात बदली न झाल्यास तालुका कृषी कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येईल.'
> **जहूर खान,** सरपंच, खेट्री

**तहसीलदारांच्या पत्राला केराची टोपली! :** तहसीलदारांनी १४ ऑक्टोबर रोजी दिलेल्या आदेशाची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे तहसीलदारांच्या आदेशाची पायमल्ली होत असल्याचे चित्र दिसत असून, तालुका कृषी अधिकाऱ्यांकडून कृषी सहाय्यकांना 'अभय' दिले जात असल्याचा आरोप होत आहे.

# ग्रामस्थांना कृषी प्रक्रियेचे धडे देतायेत कृषी विद्यार्थी!

■ प्रतिनिधी | अकोला ■

सध्याच्या बदलत्या हवामान व बाजारपेठेतील परिस्थितीत पारंपारिक शेतीला आधुनिक कौशल्य आणि कृषी प्रक्रिया उद्योगांची जोड देणे ही काळाची गरज बनली आहे. याच उद्देशाने कृषी महाविद्यालय, अकोला अंतर्गत ग्रामीण कृषी कार्यानुभव (RAWE) कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी दत्तक ग्राम राजापूर येथे 'फार्म टू फूड' या संकल्पनेवर आधारित कृषी प्रक्रिया प्रशिक्षणाचे प्रात्यक्षिक सादर केले.

या उपक्रमाचा मुख्य हेतू शेतकऱ्यांना त्यांच्या शेती उत्पादनाचे मूल्यवर्धन करून अधिक उत्पन्न मिळविण्याचे मार्ग दाखविणे हा होता. विद्यार्थ्यांनी केळीपासून वेफर आणि टोमॅटोपासून केचप बनवण्याची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष दाखवून ग्रामस्थांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला.

'ही प्रक्रिया सोपी असून प्रत्येक शेतकरी व महिला स्वतःच्या घरातून लघुउद्योग सुरू करू शकतात,' असा संदेश विद्यार्थ्यांनी दिला.



**'फार्म टू फूड' उपक्रमांतर्गत केळी वेफर व टोमॅटो केचप बनविण्याचे प्रशिक्षण संपन्न**

या प्रात्यक्षिकाला ग्रामस्थ, विशेषतः महिला वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महिलांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत, 'अशा प्रशिक्षणांमुळे ग्रामीण युवक व महिलांना स्वावलंबनाचा नवा मार्ग मिळेल,' असे मत व्यक्त केले.

या उपक्रमाचे मार्गदर्शन कृषि महाविद्यालय, अकोलेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर, उद्यानविद्या विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुधीर दलाल व RAWE कार्यक्रम अधिकारी डॉ. अतुल वराडे यांनी केले. या उपक्रमात कृषी महाविद्यालय अकोला येथील विद्यार्थी ध्रुव गावंडे, प्रतिक इंगळे, दीप काकड, अभय खडे आणि अथर्व पाठक यांनी सहभाग घेतला.

या अभिनव उपक्रमाद्वारे केवळ कृषी प्रक्रिया उद्योगाचे महत्त्वच स्पष्ट झाले नाही, तर ग्रामीण महिलांसाठी स्वावलंबनाच्या नवनव्या संधींचे दालनही खुले झाले आहे.

# थकित मालमत्ता कराचा भरणा करणेसाठीची शास्ती अभय योजनेचे शेवटचे दोन दिवस

**अकोला** :अकोला महानगरपालिका प्रशसनाव्दारा १ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोंबर २०२५ या कालावधी करीता शास्ती अभय योजना (व्याज माफी योजना) कार्यान्वीत करण्यात आली होती.

या अभय योजने अंतर्गत थकित मालमत्ता कर धारकांनी संपूर्ण थकित कराचा भरणा एकरकमी केल्यास त्यांना शास्तीच्या रकमेत मनपा प्रशासनाव्दारा ७५ टक्के सूट देण्यात येत असून या योजनेचे अखेरचे दोन दिवस उरलेले असून शहरातील सर्व थकित मालमत्ता धारकांनी थकित कराचा भरणा एकरकमी करून या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांनी केला आहे.

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी त्यांचा थकित व चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा वेळेवर करून सील, जप्ती व लिलाव सारख्या अप्रीय कार्यवाही टाळून मनपा प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मनपा उपायुक्त विजय पारतवार यांनी केले आहे.

# थकित करापोटी पुर्व झोन येथील ३ मालमत्तांवर सीलची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा उपायुक्त विजय पारतवार आणि सहा.आयुक्त राजेश सरप यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पुर्व झोन अंतर्गत सिव्हिल लाईन येथील वार्ड क्रं. अे-१ मालमत्ता क्रं. २५५ धा.राजुरकर तर्फे मराठा इंटरनेट कॅफे यांचेकडे २०२०-२१ पासून आज पर्यंतचे एकुण रक्कम रूपये ३३,१२९/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने, तसेच धा.राजुरकर तर्फे शुक्ला इंटरनेट, वार्ड क्रं. अे-१, मालमत्ता क्रं. २५६ यांचे कडे सन २०१८-१९ ते आजपर्यंतचे एकुण रक्कम रूपये ४८,५५३/- एवढा थकित कर असल्याने तसेच धा.राजुरकर तर्फे दांदळे क्लिनिक, वार्ड क्रं. अे-१, मालमत्ता क्रं. २५८ यांचे कडे सन २०१६-१७ ते आजपर्यंतचे एकुण रक्कम रूपये ७६,२६३/- एवढा थकित कर असल्याने वरील तिन्ही मलमत्तांवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे.



सदर कारवाईत जप्ती पथक प्रमुख राजेश सोनाग्रे, सहा.कर अधिक्षक रमाकांत बगरेट, कर वसुली लिपिक दीपराज महल्ले, संतोष पांडे, सुधीर मिसूरकर, गणेश पद्मने सुरक्षा रक्षक संगीता शिंदे आदींची उपस्थिती होती.

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांनी ३१ ऑक्टोंबर २०२५ पर्यंत मनपा व्दारा सुरू असलेल्या शास्ती अभय योजनेचा लाभ घेऊन आपला थकित व चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा एकरकमी करून सील, जप्ती व लीलाव सारख्या अप्रीय कारवाई टाळावे असे आवाहन मनपा प्रशासनाव्दारे करण्यात आले आहे.

# महावितरणच्या झटपट योजनेचा उद्योजकांना लाभ

■ प्रतिनिधी | अकोला ■

घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक अशा सर्व वीज ग्राहकांना गरजेनुसार वीजवापर वाढविण्यासाठी महावितरणने झटपट स्वयंचलित परवानगी योजना राबविल्यामुळे राज्यातील ४,१६४ वीज ग्राहकांनी सुमारे एक महिन्यात २२ मेगावॅट क्षमता वाढवून घेतली. यामध्ये २४६० औद्योगिक वीज ग्राहकांचा समावेश असून दिवाळीपूर्वी मागणीनुसार उत्पादन वाढविण्यास त्यांना मदत झाली.

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी सांगितले की, वीज ग्राहकांना अधिकाधिक सहजपणे सेवा मिळण्यासाठी प्रक्रियेत बदल करण्याची सूचना मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. त्यानुसार 'इज ऑफ लिव्हिंग'च्या सूत्रानुसार महावितरणने वीज ग्राहकांसाठी मंजूर भार वाढविण्यासाठी (लोड एनहान्समेंट) एक स्वयंचलित व्यवस्था सुरू केली आहे. या योजनेमध्ये ग्राहक घरबसल्या महावितरणच्या मोबाईल ॲप्लिकेशन किंवा वेबसाईटवर अर्ज सादर करून आणि योग्य शुल्क भरून आपला मंजूर भार वाढवून घेऊ शकतात. महावितरणने ही सुविधा २६ सप्टेंबर रोजी सुरू केली. महिनाभरात राज्यातील ४,१६४ ग्राहकांनी नव्या सुविधेचा लाभ घेतला.

## निधन वार्ता

### प्रशांत शिरसाट




**अकोला** : गंगानगर वाशिम बायपास परिसरातील रहिवासी प्रशांत रामदास शिरसाट यांचे मंगळवारी उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्यावर गेल्या काही दिवसांपासून रुग्णालयात उपचार सुरु होते. ते ५० वर्षांचे होते. त्यांच्यावर गीतानगर येथील स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी व दोन भाऊ असा आत्पपरिवार होता.

# अमली पदार्थ प्रतिबंध समन्वय समितीची बैठक तपासण्यांचे प्रमाण वाढवा -जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात अमली पदार्थांची वाहतूक, विक्री होऊ नये यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी सतर्क राहावे, तसेच तपासण्यांचे प्रमाण वाढवावे, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

जिल्हा अमली पदार्थ प्रतिबंध समन्वय समितीच्या बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक सीमा झावरे, उपवनसंरक्षक नम्रता ताले, सहायक आयुक्त संतोष पोवराज, समाजकल्याण सहायक आयुक्त मारोती वाठ यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.




जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, जिल्ह्यात कुठेही अंमली पदार्थांची वाहतूक, विक्री होता कामा नये यासाठी विविध विभागांकडून होणा-या वाहने, पार्सल, नाका तपासणी, डॉग युनिटद्वारे रेल्वेगाड्यांची तपासणी आदी तपासण्यांत सातत्य ठेवावे. कोटपा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी. भावी पिढीला व्यसनांपासून मुक्त ठेवण्यासाठी योग्य माहितीचा प्रसार, तसेच संबंधित नियम, अधिनियमांची कठोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने समन्वयाने सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत, असे निर्देशही त्यांनी दिले.

एनडीपीएस कायद्यांतर्गत यावर्षी आतापर्यंत ३९ गुन्हे दाखल असून, ३२ आरोपींना अटक करण्यात आली. त्यात ४० लक्ष ६१ हजार रू. किमतीचा २०९ किलो ८३५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. इतर १७ लक्ष ३४ हजार रू. किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, अशी माहिती गृह विभागातर्फे देण्यात आली.

---

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- १२३/२०२५ कलम- १९ जा- प्र ३१३८/२०२५ दि. २७/१०/२०२५

**सार्वजनिक न्यासाचे नाव :** गोकुलधाम गौरक्षण ट्रस्ट नावखेड, ता. जि. अकोला

**अर्जदार :** उमेश बाबाराव भटकर रा. नावखेड ता. जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम , १९५० चे कलम २२/**१९** अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदर चा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- ९०९/- रुपये आहे. आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे चा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त- १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक २७/१०/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

---

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७३२/२०२५ — प्रोसेस नं.१६४०४/२०२५

चौ.ता. २१/११/२०२५ — दिनांक : ३०/०९/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती लिलावती शिवाजी बांगर २ प्रफुल शिवाजी बांगर ३. प्रदिप शिवाजी बांगर ४ प्रजा शिवाजी बांगर ५. विद्या शिवाजी बांगर अर्जदार क्र. १ ते ५ रा. व्ही. एच. बी. कॉलनी, सिद्धार्थ नगर, तारफैल, अकोला. ना. जि. अकोला. ६ वर्षा श्रीकांत दंदी रा. रिधोरा ता. बाळापूर जि. अकोला. ७. संगीता विनोद इंगळे रा. तामशी, पो. बटवाडी, ता. बाळापूर जि. अकोला. ८. वैशाली अरुण डावरे रा. मोहता मिल चाळ गेट, अकोला. ता. जि. अकोला. ९. प्रणाली अमरदिप लांजेवार ग. न्यु समता नगर, न्यु तारफैल, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : शिवाजी भिकाजी बांगर

**पत्ता :-** व्दारा प्रफुल शिवाजी बांगर रा. व्ही. एन. बी. कॉलनी, सिद्धार्थ नगर, तारफैल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की. मयत शिवाजी भिकाजी बांगर यांचे दि. २१/०५/२०२३ रोजी सिद्धार्थ नगर, लेबर कॉलनी, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

परील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०९/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---

## जाहीर नोटीस

सर्वत्र जनतेस वित्तीय संस्थाना बँकांना या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते कि आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा - अकोला ता. जि अकोला यांनी ग्राहक नामे श्री. पंजाब अर्जुन आठवले रा. देवर्डा, ता. अकोट जि. अकोला यांनी आमचे पक्षकाराकडे सदरची मिळकत गहाण ठेऊन कर्ज मिळण्या करीता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन:** मौजे -देवर्डा अनु. क्र. २२९ मालमत्ता क्र. २१७ - बी, क्षेत्रफळ ८७६ चौ.फु. व त्यावरील बांधकामा सह ग्रा.पंचायत देवर्डा, हद्दीतील, ता. अकोट जि. अकोला.

**त्यास चतुर्सिमा :** पूर्वेस :- नागोराव आठवले पश्चिमेस :- भिमराव आठवले उत्तर :- भारत आठवले दक्षिण :- रोड. वरील सदरहू मालमत्ता हि श्री. पंजाब अर्जुन आठवले यांची मालमत्ता आहे. तरी वरील मालमत्तेवर आज रोजी कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्कसंबंध, खरेदी, गहाण, बोजा व ईसार व इतर काही व्यवहार असल्यास वर दिलेल्या पत्यावर ७ दिवसाच्या आत लेखी हरकत नोंदवावी अन्यथा कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नाही. असे समजून आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा -अकोला वरील मालमत्ता गहाण ठेऊन वरील ग्राहक यांना कर्जाची रक्कम वितरित करतील त्या नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करीता जाहीर नोटीस.

दिनांक : २९/१०/२०२५
ठिकाण : अकोला

**अधिवक्ता रुपेश ना. इस्तापे**
(नोटरी भारत सरकार)
ऑफीस : आनंद बेकरी जवळ, रामदास पेठ, अकोला मो. ९४२३४३०१७१

---

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९१९/२०२५ — प्रोसेस नं.१७५७५/२०२५

चौ.ता. २९/११/२०२५ — दिनांक : १८/१०/२०२५

**अर्जदार :** १. संतोष आनंदराव इंगळे रा. नंदान मंगल कार्यालयाजवळ, राव नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. माधवी चंद्रभूषण शेगोकार रा. नागझरी रोड, भिमनगर, शेगांव, ता. शेगांव, जि. बुलढाणा ३. संजीवनी राजेंद्र वानखेडे रा. पोलिस लाईन, कोफेड मार्केट, हज हाउसजवळ, मुंबई ४००००१ ४. शिला नाजुकराव डोंगरे रा. स्तुति एक्सप्रेस, गौरवप्रथ रोड, माथुरा नगरीच्या समोर, पालनपोर, सुरत ३९५००९ गुजरात

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : १. आनंदरावजी पांडुरंग इंगळे २. चंद्रकला आनंदराव इंगळे

**पत्ता :-** दोघेही रा. नंदान मंगल कार्यालयाजवळ, राव नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत आनंदरावजी पांडुरंग इंगळे यांचे दि. ०६/०२/२००२ रोजी राव नगर, (भौरद ) ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे. तसेच मयत चंद्रकला आनंदराव इंगळे यांचे दि. ०३/०४/२०२२ रोजी डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८९१/२०२५ — प्रोसेस नं.१७४०२/२०२५

चौ.ता. २८/१०/२०२५ — दिनांक : १५/१०/२०२५

**अर्जदार :** १. शेख मेहबूब शेख मोहम्मद रा. इसोळी, ता. जि. बुलढाणा २. शेख ख्वाजा शेख मोहम्मद रा. खैर मोहम्मद प्लॉट, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला. ३. शेख निजाम शेख मोहम्मद रा. हबिब नगर, मोहम्मदिया मस्जिद जवळ, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला. ४. कुबराबी शेख अयुब रा. शरिफ नगर, अकोला. ता. जि. अकोला. ५. सुरैया बानो जहरूद्दीन रा. भगतवाडी, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला ६. शेख इस्माईल शेख मोहम्मद रा. लक्कडगंज, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : शेख मोहम्मद शेख इमाम

**पत्ता :-** रा. खैर मोहम्मद प्लॉट, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शेख मोहम्मद शेख इमाम यांचे दि. १३ / ११ / २०१३ रोजी राहत्या घरी खैर मोहम्मद प्लॉट, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/१० / २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/१० / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :-११९/२०२५ कलम-१९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणीक्रमांक :-** अखिल भारतीय मावली कुलशक्ती पीठ चॅरिटेबल ट्रस्ट अल्लापूर जामठी फाटा ता. मुर्तीजापूर जि. अकोला

**अर्जदार :** बबनराव महादेवराव डाबेराव रा. मु. संजापूर पो. हिरपूर ता. मुर्तीजापूर जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम , १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ ) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) २३२०३/ रुपये आहे.

आ) स्थावर मिळकत (वर्णन ) :- काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सही निशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त- १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक १७/१०/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

---

## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर**
**श्रीमती डि.एम.पाटील यांचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधिश क.स्तर. बाळापुर, बाळापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/२७२/२०२५ — प्रोसेस नं.१६११/२०२५

पुढील तारिख. २९/११/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती प्रभावती शिवहरी काळे वय अं. ७१ वर्ष धंदा घरकाम २. संतोष शिवहरी काळे वय अं. ४६ वर्ष धंदा शेती दोन्ही रा. तामाशी (बटवाडी) ता. बाळापुर जि. अकोला ३. गोदावरी अजय भांडे वय अं.३७ वर्ष धंदा घरकाम रा. सोमवारवेस अकोट ता. अकोट जि. अकोला ४. अनुराधा मोहन पेठकर वय अं. ३५ वर्ष धंदा घरकाम रा.भगवान महाविर मार्ग पेठकर गल्ली वार्ड नं. १३ नांदुरा ता.नांदुरा जि. बुलढाणा

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत शिवहरी पांडुरंग काळे हे दिनांक ०४.०७.२०२३ रोजी तामशी ता. बाळापुर जि. अकोला येथे मरण पावले. वरील नमुद अर्जदार यांना मयत शिवहरी पांडुरंग काळे यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २९.११.२०२५ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक १८.१०.२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक )
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

---

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७२५/२०२५ — प्रोसेस नं.१६८३९/२०२५

चौ.ता. २१/११/२०२५ — दिनांक : ०६/१०/२०२५

**अर्जदार :** १. वैशाली विजय काळे रा. प्लॉट क्र. ७, कैलास नगर, गौरक्षण रोड, अकोला, ता. जि. अकोला. २. कोमल महेश बेंद्रे रा. परिवार कॉलनी, केशव नगर, अकोला. ता. जि. अकोला. ३. शितल अमोल पेठे रा. व्दारा अमोल पेठे, फ्लॅट क. जे २०२, इंद्रप्रस्थ सोसायटी, जे विंग, अ.क्र. २८/१/३, अदाई जि. पनवेल ४. चेतन विजयराव काळे रा. सार्थक निवास, गौरक्षण, रोड, मखराम पवार यांच्या घरासमोर, कैलास नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : विजय हरिचंद्र काळे

**पत्ता :-** रा. सार्थक निवास, गौरक्षण रोड, मखराम पवार यांच्या घरासमोर, कैलास नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विजय हरिचंद्र काळे यांचे दि. ११/०८/२०२५ रोजी ओझोन हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होऊन आपली लेखी हकरत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३३०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# शेतकऱ्यांना फळपिक विमा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन



**वर्धा/वार्ताहर**

प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारित आंबिया बहार फळपिक विमा योजना लागू करण्यात आली आहे. योजनेंतर्गत नैसर्गिक आपत्ती व प्रतिकुल परिस्थितीमुळे फळपिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देण्यात येते. या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ही योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी ऐच्छिक आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी खातेदारांच्या व्यातिरिक्त कुळाने अगर भाडेपट्टीवर शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहे. ज्या शेतकऱ्यांनी सरकारी बँका, प्रादेशिक ग्रामिण बँका, व्यावसायिक बँका, खाजगी बँका इत्यादी संस्थांकडून अधिसूचित पिकांसाठी हंगामी कर्ज घेतले आहे, अशा शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी व्हायचे किंवा नाही याबाबत घोषणापत्र योजनेत सहभागी होण्याच्या मुदतीच्या ७ दिवस अगोदर देणे आवश्यक आहे. बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी यासाठी आपले सरकार सेवा केंद्राशी संपर्क साधावा.

शेतकऱ्यांना विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्के विमा हप्ता भरावयाचा असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना योजनेचा लाभ घेता यावा यासाठी जमीन भुधारणेच्या मर्यादेत एका शेतकऱ्यास अधिसूचित फळपिकासाठी ४ हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत विमा नोंदणीची मुभा देण्यात आली आहे. केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच विमा संरक्षणाचे कवच लागू असून अधिसूचित फळपिकांपैकी एका फळपिकासाठी एका वर्षात एकाच हंगामाकरीता विमा संरक्षणासाठी अर्ज करता येणार आहे.

जिल्ह्यात केळी या फळपिकासाठी सेलू तालुक्यातील झडशी, सेलू व हिंगणी, वर्धा तालुक्यातील पिपरी मेघे, संत्रा पिकासाठी आर्वी तालुक्यातील आर्वी, वाढोणा, वाठोडा, रोहणा व खरांगणा, आष्टी तालुक्यातील आष्टी, तळेगाव, साहूर व अंतोरा, कारंजा तालुक्यातील कारंजा, कन्नमवारग्राम, ठाणेगाव, सारवाडी व दाभा, मोसंबी फळपिकासाठी आष्टी तालुक्यातील आष्टी, तळेगाव, साहूर अंतोरा, कारंजा तालुक्यातील कारंजा, कन्नमवारग्राम, ठाणेगाव, सारवाडी व दाभा या महसूल मंडळ गावातील अधिसूचित फळपिकाचा विमा योजनेत समावेश करण्यात आला आहे.

केळी या फळपिकासाठी १ लाख ७० हजार रुपये विमा संरक्षित रक्कम असून यासाठी शेतकऱ्यांना ८ हजार ५०० विमा हप्ता भरावा लागणार आहे. संत्रा फळपिकासाठी १ लाख रुपये विमा संरक्षित रक्कम असून शेतकऱ्यांना १२ हजार रुपये विमा हप्ता भरावयाचा आहे. मोसंबी फळपिकासाठी १ लाख रुपये विमा संरक्षित रक्कम असून शेतकऱ्यांना ५ हजार रुपये विमा हप्ता भरावयाचा आहे. केळी व मोसंबी या फळपिकासाठी ३१ ऑक्टोबर व संत्रा पिकासाठी दि. ३० नोव्हेंबर पर्यंत अर्ज करण्याची अंतिम मुदत आहे.

विमाधारक शेतकऱ्यांनी गारपीट, वेगाचा वारा या हवामान घटकामुळे पिकांचे नुकसान झाल्यास घटना घडल्यापासून ७२ तासाच्या आत विमा कंपनी, संबंधित मंडळ कृषि अधिकारी यांना नुकसानीची माहिती कळविणे आवश्यक आहे. त्यानंतर विमा कंपनी जिल्हा महसूल, ग्रामिण व कृषि विभागाच्या मदतीने वैयक्तिक पातळीवर नुकसानीचे प्रमाण निश्चित करेल, असे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.

### शेतकऱ्यांनी गारपिटीपासून संरक्षणाकरीता भरावयाची रक्कम

संत्रा व मोसंबी फळपिकासाठी ३३ हजार रुपये विमा संरक्षित रक्कम असून शेतकऱ्यांना ८ हजार २५० रुपये भरावयाचे आहे. तर केळी फळपिकासाठी ५७ हजार रुपये विमा संरक्षित रक्कम असून शेतकऱ्यांना १४ हजार २५० रुपये भरावयाचे आहे.

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी बच्चू कडूंच्या आंदोलनाला खासदार अमर काळेंचा जाहीर पाठिंबा

### शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी सर्वपक्षीय एकजूट; सरकारला इशारा निर्णय झाला नाही तर संघर्ष तीव्र

**वर्धा/वार्ताहर**

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर सुरू असलेल्या आंदोलनाला आता राजकीय रंग मिळू लागला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे खासदार अमर काळे यांनी या आंदोलनाला उघडपणे पाठिंबा जाहीर करत सरकारवर दबाव वाढवला आहे. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकट होत असून तात्काळ कर्जमाफीशिवाय त्यांना दिलासा मिळणार नाही, असे ते म्हणाले.खासदार काळे म्हणाले, शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. त्याला कर्जाच्या जोखडातून मुक्त करण्याची जबाबदारी सरकारची आहे. बच्चू कडू यांचा लढा हा शेतकऱ्यांच्या हक्कासाठीचा आणि सत्ताधाऱ्यांनी त्याची दखल न घेतल्यास आम्हीही या लढ्यात अंग झोकून देऊ. राज्यभर सुरू असलेल्या या आंदोलनामुळे सरकारच्या कृषी धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये वाढती असंतोषाची भावना लक्षात घेता सरकारने आता त्वरीत निर्णय घेतला नाही तर आंदोलन आणखी तीव्र होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. शेतकऱ्यांच्या समर्थनार्थ विविध राजकीय नेते आणि संघटना आता या चळवळीत सहभागी होऊ लागल्याने बच्चू कडू यांचा लढा राज्यव्यापी स्वरूप धारण करत असून आगामी काळात या आंदोलनाचा प्रभाव सरकारवर अधिक जाणवणार आहे.

### शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात

**वर्धा** -भिडी परिसरात खरीप हंगामावर निसर्गाची अवकृपा झाली असून, दिवाळीपूर्वी आर्थिक मदत देण्याची घोषणा राज्य सरकारने केली. मात्र अद्यापही मदत तर दूरच अद्याप नूकसानीच्या याद्यांचेही नियोजन नसल्याने शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात गेला. आता मदत मिळणार तरी कधी ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

यावर्षीच्या हंगामात अतिवृष्टी व रोगाने सोयाबीन, कापूस व इतर पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी हवालदील झाले आहेत. या भागात पानबसन शेतजमीन मोठ्या प्रमाणात असून, सोयाबीन पीक यलो मोक व चारकोल रोगाने हिरावून नेले. तसेच कापूस पीक सततच्या पावसामुळे झाली नाही. शेतकऱ्यांना सततच्या अतिवृष्टीमुळे पीक वाचविण्याकरिता उपाययोजना करता आल्या नाहीत. त्यात थोडीफार उघाड मिळाल्याने कपासीची थोडीफार वाढ झाली. सर्वत्र शेतकरी चिंतेत सापडल्याने लावलागवडीचा खर्च कसा निघेल, असा प्रश्न उपस्थित होत आहे. तेव्हा अतिवृष्टीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी तत्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

## माकडावर केले सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार

### वनविभाग कर्मचाऱ्यांनी दिला माणुसकीचा संदेश

**साहूर/वार्ताहर**

मुक्या प्राण्यांना जरी बोलता येत नसलं तरी त्यांच्या भावना ॲक्टिव्हिटीज ह्या माणसासारख्याच असतात माणसाच्या आयुष्यात जसे नातेसंबंध जिव्हाळ्याचे असतात तसेच जिव्हाळ्याचे नातेसंबंध प्राण्याबद्दलही असावे कुटुंबातील सदस्याप्रमाणे मुक्या प्राण्यावरही काही लोकांचे जीवाभावाचे प्रेम संबंध असल्याचे आपण नेहमीच बघतो. मात्र मुक्या प्राण्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अंत्यसंस्काराची व्यवस्था न करता त्यांना आपण रस्त्याच्या कडेला उघड्यावरती तसेच फेकून देतो परिणामतः कुत्र्यांकडून त्यांची विटंबना केली जात असून त्यांचे लचके तोडल्या जाते. मात्र येथील क्षेत्र सहाय्यक रोहिणी पडोळे व त्यांच्या सहाय्यक कर्मचाऱ्यांनी मृत माकडावर प्रेम दया व जीवाभावाचे नाते दाखवत त्याच्यावर सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार करून त्या माकडाला समाधी देत माणुसकीचा संदेश दिला.



प्राप्त माहितीनुसार गावालगत असलेल्या श्री संत ज्ञानेश्वर जुनियर कॉलेजच्या प्रांगणातील जल कुंभावरून आजारी असलेले एक माकड खाली पडले व बेशुद्ध झाले. ही माहिती वनविभागातील कर्मचाऱ्यांना कळताच क्षेत्र सहाय्यक रोहिणी पडोळे वनरक्षक जीवन कोरके सारिका पीदूरकर रवींद्र साखरकर प्रतीक तेलंगे सेवानिवृत्त वन कर्मचारी गोपाल भालेराव सर्व घटनास्थळी पोहोचले माकडाची तपासणी केली असता ते बेशुद्ध अवस्थेत होते वन कर्मचाऱ्यांनी पशु चिकित्सकांना बोलावून त्या माकडावर उपचार केले. मात्र माकड आजारी असल्याने व ४० फूट उंच जलकुंभावरून खाली पडल्याने उपचार करूनही ते वाचू शकले नाही. अनेक नागरिक आपले स्वतःचे पाळीव प्राणी मेल्यानंतरही मृत प्राण्यांना रस्त्याच्या कडेला किंवा ओसाड जागेवर त्यांना गड्डा करून अंत्यविधी न करता तसेच टाकले जाते हे नक्कीच वेदनादायी व माणुसकीला न शोभणारे कृत्य असून वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तसे न करता तीन ते चार फूट खड्डा खोदून माकडावर माणसाप्रमाणे विधिवत सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार केले. तर यामुळे जिवलग प्राण्यांचे स्मरण कायम राहील आणि परिसरात एक हरित शांत वातावरणही तयार होते या उपक्रमाचा उद्देश माणूस आणि प्राणी यांच्यातील सह जीवनाचे नाते जपणे तसेच समाजात प्राणी मित्रतेचा संदेश पोहोवचणे हा आहे. यापूर्वीही वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी बऱ्याच वेळा जखमी प्राण्यावर उपचार करून त्यांना जीवदान दिले. असल्याचे याप्रसंगी क्षेत्र सहाय्यक रोहिणी पडोळे यांनी सांगितले. वनविभागाकडून माकडावर करण्यात आलेल्या सन्मानपूर्वक अंत्यसंस्काराबद्दल परिसरातील सर्व स्तरातून त्यांचे कौतुक केल्या जात असून समाजातील इतरांनीही मुक्या प्राण्यांबद्दल सन्मानपूर्वक अंत्यसंस्काराची ही संवेदनशील कल्पना स्वीकारावी अशा यावेळी काही प्राणी प्रेमी नागरिकाकडून प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आले.

## विद्यार्थ्यांनी विचार करूनच प्रत्येक गोष्ट स्वीकारावी- गजेंद्र सुरकार

**देवळी/वार्ताहर**

अंधश्रद्धा आणि अविवेक यांच्या भोवऱ्यात अडकण्याऐवजी प्रत्येक गोष्टीकडे चिकित्सक दृष्टीकोनातून पाहा. विज्ञानाला प्रमुख मान देऊन विचारपूर्वक निर्णय घ्या, असा संदेश महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी दिला.राजीव गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, देवळी येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती देवळी शाखेच्या वतीने विज्ञानवादी विचारांना चालना देणारा वैज्ञानिक दृष्टिकोन व चमत्कार सादरीकरण' हा विशेष कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य अनिल तडस होते. प्रमुख उपस्थितीत जिल्हा कार्यवाह रजनी सुरकार, कार्याध्यक्ष विक्की बिजवार, प्रधान सचिव विजय पचारे तसेच पत्रकार पारीसे आदी मान्यवर होते. मार्गदर्शन करताना गजेंद्र सुरकार म्हणाले की, मानव हा विचार करणारा प्राणी आहे. सुरुवातीच्या काळात देव, धर्म, कर्मकांड अस्तित्वात नव्हते. परंतु आर्य समाजाच्या काळानंतर बहुजन समाजाला कर्मकांडांच्या माध्यमातून अंधश्रद्धेत अडकविण्यात आले. आजही धर्म आणि देवभक्तीच्या आडून राजकीय स्वार्थ साधला जात आहे. या पार्श्वभूमीवर



विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी दृष्टिकोन स्विकारण्याची गरज असल्यावर त्यांनी भर दिला.ते पुढे म्हणाले, भूत, पिशाच्च, करणी, जादूटोणा या चुकीच्या श्रद्धा समाजातील शोषणाचे मूळ आहेत. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या बलिदानानंतर लागू झालेल्या जादूटोणा विरोधी कायद्यानुसार अशा कृत्यांना कठोर शिक्षेची तरतूद आहे. तरीही धर्माच्या नावाखाली आजही हे प्रकार चालू आहेत. समाजाने आपल्या संतांचा, तत्त्वज्ञांचा आदर्श घेऊन विचारशीलतेचा मार्ग स्वीकारला पाहिजे. या कार्यक्रमात विविध 'चमत्कार' प्रत्यक्ष दाखवून त्यामागील वैज्ञानिक कार्यकारणभाव विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आला. प्रास्ताविक पिंपळकर गुरुजी यांनी तर सूत्रसंचालन तायडे मॅडम यांनी केले. आभार पठाण गुरुजी यांनी मानले. शाळेतील शिक्षकवर्गाने कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोठे परिश्रम घेतले.

### हवामानातील गारवा वाढला

**वर्धा** - गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यातील तापमानात घट होत असून हवामानात गारव्याची चाहूल लागली आहे. सकाळ-संध्याकाळच्या वेळी थंडगार वाऱ्याने थंडीची चाहूल स्पष्टपणे जाणवू लागली आहे.

सकाळी धुके पडू लागल्याने रस्त्यांवर दृष्टीक्षेप कमी झाला आहे. दिवसभर उन्हाचा चटका कमी झाल्याने वातावरणात सुखद गारवा पसरला आहे. अचानक झालेल्या हवामानातील बदलामुळे लहान मुले, वृद्ध आणि आजारपणातून सावरत असलेल्यांनी विशेष काळजी घेण्याची गरज असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले आहे.

# वर्धा जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट; कपाशी, सोयाबीन पिकांसमोर गंभीर संकट



**मोझरी/वार्ताहर**

वर्धा जिल्ह्यात येणाऱ्या मोथाचक्री वादळाच्या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने रेड अलर्ट जाहीर केला असून, सतत होत असलेल्या पर्जन्यवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या यूथिलागलेल्या कपाशी व सोयाबीन पिकांसमोर गंभीर संकट उभे राहिले आहे. मे महिन्यापासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतकरी चिंतेत यावले आहेत आणि त्यांच्या आर्थिक स्थितीवरही विपरीत परिणाम होत आहे.या वर्षी ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीनचे मोठे नुकसान झाले असून त्यांचे मूल्य बाजारात अत्यंत कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्याना संतोषजनक भाव मिळत नाहीत. शासनाने अद्याप सोयाबीन खरेदी प्रक्रिया सुरू केली नाही, ज्यामुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. कपाशी पिकावरच त्यांची शेवटची आशा असून, पावसाच्या सततच्या पडण्यामुळे कपाशीची फळधारणा कमी झाली असून बोंड फुटण्यासही सुरुवात झाली आहे. त्यामुळे कपाशी काळा होण्याचा धोका निर्माण झाला आहे ज्यामुळे वेचणीसाठी मजूरही मिळत नाहीत.शेतकरी गजानन के. ठाकरे यांनी सांगितले, चार एकर शेतात दोन एकर सोयाबीन व दोन एकर कपाशी लावली होती. एक पीक हातचे गेल्यास दुसरे काढण्याचा विचार केला होता, पण सततच्या पावसाने दोन्ही पीक खराब झाल्याने कर्जफेड कशी करावी ही मोठी समस्या आहे. शालिकराव ताकसांडे म्हणाले, अडीच एकरात कपाशीची चांगली लागवड केली मात्र अतिवृष्टीमुळे फळधारणा कमी झाली व बोंड सडा झाला आहे. काळ्या कपशाची विक्रीचा प्रश्न या वेळी चिंतेचा विषय आहे. शेतकऱ्यांनी ऊस, सोयाबीन आणि कपाशीच्या लागवडीसाठी भरपूर खर्च केला, परंतु या पावसामुळे आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे. शेतकरी संघटनांनी शासनाने त्वरित मदतीसाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे.

## संक्षिप्त

### मुलाकडून वडिलांना मारहाण

**हिंगणघाट :** येथील जाम रोडवरील रिमडोह गावात कर्ज घेण्याच्या वादातून मुलाने वडिलांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी किसन नागो परचाके यांनी आपल्या मुलगा राजू किसन परचाके याला 'पाच लाख रुपयांचे कर्ज कशासाठी घेतोस? व्याज खूप लागेल' असे समजावल्यावरून वाद निर्माण झाला. त्यावरून आरोपी मुलगा राजू याने वडिलांशी शिवीगाळ करत 'मला कर्ज का घेऊ देत नाहीस' असे म्हणत भांडण सुरू केले. वाद तीव्र होताच आरोपी राजू याने वडिल किसनराव परचाके यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली तसेच विटेच्या तुकड्याने देखील प्रहार केला. फिर्यादीच्या तक्रारीवरून व वैद्यकीय अहवालाच्या आधारे पोलिसांनी आरोपी राजू परचाके याच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ११८ (अ), ३५१(२), ३५२ नुसार गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास ठाणेदार अनिल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करीत आहे.

### पोलिसांच्या कारवाईत दारूसाठा जप्त

**वर्धा :** शहराच्या इतवारा बाजारातील तलावासमोर दारूविक्री करणाऱ्या एकाला शहर पोलिसांनी सापडा रचून अटक केली. त्यांच्याकडून दारूसाठा व साहित्य जप्त करण्यात आले आहे. सदानंद संतोष कंजरभाट (३०) रा. इतवारा बाजार, वर्धा असे दारूविक्री करणाऱ्या आरोपीचे नाव आहेत. तो इतवारा बाजार परिसरात दारूविक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून धाड टाकली असता आरोपीला ताब्यात घेत दारूसाठा व साहित्य जप्त करण्यात आले. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पिपरी (मेघे) भागात श्वानांची दहशत

**वर्धा :** शहरालगतच्या पिपरी (मेघे) ग्रामपंचायतीच्या विविध भागांत श्वानांचा हैदोस वाढला असून, जागोजागी कडप बसून राहत असल्याने नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. गेल्या काही दिवसांपासून नागरिकांना या श्वानांमुळे अपघाताला सामोरे जावे लागत आहे. कारला चौक, कारला रोड, शिक्षक कॉलनी व इतर परिसरात श्वानांचा हैदोस वाढला आहे. वाहनचालक रस्त्याने जात असताना अचानक हे श्वान वाहनाचा पाठलाग करतात. त्यात वाहनचालक गडबडून अपघाताला सामोरे जातो. याकडे ग्रामपंचायत प्रशासनाने वेळीच लक्ष देऊन श्वानांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

### संशयितावर गुन्हा दाखल

**आष्टी-** पोलिस गस्तीवर असताना थार बसस्थानकावर अंधारात आपले अस्तित्त्व लपवून बसून एक व्यक्ती आढळली. वाहन थांबविताच ती पळून जात असताना पोलिसांनी पाठलाग करून पकडले. विचारपूस केली असता उडवाउडवीची उत्तरे देत होती. दरम्यान, चोरी, घरफोडी सारखा मोठा दखलपात्र गुन्हा घडून येण्याची दाट शक्यता असल्याने त्याला ताब्यात घेऊन गुन्हा नोंद करण्यात आला. मात्र, अंगझडतीत कोणत्याही आक्षेपार्ह वस्तू आढळून न आल्याने त्याला सूचनापत्र देऊन सोडण्यात आले.

### चोरट्यांनी शेतीसाहित्य पळविले

**समुद्रपूर :** चोरट्यांनी शिवणी शिवारातील शेतातून रोटाव्हेटर आणि किर्लोस्कर कंपनीचा डायनामा असा १ लाख ५ हजारांच्या शेती साहित्य पळविल्याची घटना समुद्रपूर पोलिसात दिलेल्या तक्रारीवरून उघडकीस आली. पवन वानखेडे यांनी शिवणी येथे मत्त्याने शेती केली असून शेतामध्ये किर्लोस्कर कंपनीचा डायनामा किंमत ५५ हजार आणि रोटावेटर किंमत ५० हजार ही अवजारे ठेवून होती. ही अवजारे चोरट्याने चोरून नेली. यात वानखेडे यांचे १ लाख ५ हजारांचे नुकसान झाले असून तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### कैकाडी महाराज यांचे निधन

**पुलगाव :** संत बालयोगी मनोज बाबा उकंडराव कैकाडी महाराज हे दुचाकीवरून प्रवास करीत असताना अचानक खाली पडले. त्यांना पुलगाव येथील रुग्णालयात उपचाराकरिता नेले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती मृत घोषित केले. या घटनेची वार्ता कळताच भाविकांनी रुग्णालयात गर्दी केली होती. संत बालयोगी मनोज बाबा उकंडराव कैकाडी (वय ४२) महाराज यांचा जन्म धामणगाव येथे झाला. महाराजांचे यवतमाळ, तळेगाव, शिवनी आदी ठिकाणी मठ आहे. महाराज आजनसरा येथून परत येत होते. दुचाकीवरून त्यांचा परतीचा प्रवास सुरू होता. पुलगावलगतच्या पिपरी (खराबे) चौफुली येथे दुचाकीवरून ते पडले. ही घटना घडली. महाराजांच्या अपघाताची माहिती हितचिंतकांना मिळताच त्यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. त्यांना तातडीने पुलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचाराकरिता आणण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती महाराजांना मृत घोषित केले. त्यांच्या पार्थिवावर तळेगाव (शिवनी), यवतमाळ येथे समाधी देऊन अंत्यसंस्कार करण्यात आले

### जयदेव भानसे यांना वाहिली श्रद्धांजली

**वर्धा :** येथील जयदेव भानसे (वय ७०) यांचे हृदयविकाराने निधन झाले. वर्धा कचेरीत गेल्या ४० वर्षांपासून दस्त नोंदणी लेखक म्हणून ते कार्यरत होते. महसूल तसेच प्रशासन विभागाबाबत त्यांना कायद्याचे सखोल ज्ञान होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी असा मोठा आप्तपरिवार आहे. सर्वांनी मौन बाळगून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी मुद्रांक जिल्हाधिकारी गजानन बाकडे यांच्यासह निबंधक दिगंबर तांकसांडे, प्रमोद भोमले, भीमराव गावंडे, अनंत भानसे, शेख गफ्फार, विजू डोफे, समीर भानसे, सिद्धांत फुलझेले, विजय दरणे, दीपक नेवारे, अरुण पाटील, गोलू पिल्लेवार, विनोद पिठ्ठलवार, सारंग अहिरराव, चंद्रकांत दुर्गे, बाबाराव कुबडे, महेंद्र पाटील, अरविंद पाटील, नरेश पाटणकर, आशीष वाघमारे आदी उपस्थित होते.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३३०**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# अमरावतीत बिबट्याची दहशत



## -वन विभागाचा अलर्ट मोड, ट्रॅप बसवून सर्च ऑपरेशन सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहराच्या उपनगरांपासून ते ग्रामीण हद्दीत अलीकडे बिबट दिसल्याच्या घटना वाढल्या आहेत. महादेवखोरी, तपोवन, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसर, सेंट थॉमस, पोहरा मार्ग आणि सीआरपीएफ कॅम्प या भागात नागरिकांनी बिबट फिरत असल्याची माहिती वन विभागाला दिली आहे. यानंतर वन विभाग सतर्क झाला असून, या परिसरात तीन ठिकाणी पिंजरे (ट्रॅप) बसवले गेले आहेत आणि सर्च ऑपरेशन सुरू आहे. वन विभागाने तात्काळ रेस्क्यू पथक तैनात केले असून, वडाळी परिक्षेत्रातील अनुभवी अधिकारी आणि जवान या मोहिमेत सहभागी आहेत. अंदाजे ३५ ते ४० अधिकारी-कर्मचारी या मोहीमेत कार्यरत आहेत. यामध्ये शार्प शूटर, ट्रॅप टीम आणि वन्यजीव तज्ज्ञांचा समावेश आहे. दररोज रात्री आणि सकाळी या परिसरात गस्त घालून बिबट दिसल्याच्या हालचालींचा बारकाईने अभ्यास केला जात आहे.

### अफवांवर विश्वास ठेवू नका :

सदर परिस्थिती लक्षात घेऊन वन विभागाने नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. रात्रीच्या वेळी किंवा अंधार व झुडप असलेल्या भागात जाणे टाळावे, असे सांगण्यात आले आहे. काही व्यक्ती सोशल मीडियावर जुनी किंवा दिशाभूल करणारी व्हिडिओ पोस्ट करत असल्याने घबराट निर्माण होत आहे. वन विभागाने अशा अफवांवर विश्वास न ठेवण्याची स्पष्ट सूचना दिली आहे.

### सीसीटीव्हीत कैद झाला बिबट-

तपोवन आणि सात बंगला परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये बिबट स्पष्ट दिसल्याचे समोर आले आहे. या दृश्यांनी नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही ठिकाणी बिबट पाळीव आणि भटक्या प्राण्यांवर झडप घालत असल्याचेही दिसून आले आहे. तथापि, मानवी जीवितहानी झाल्याची घटना अद्याप घडलेली नाही.

### शहराजवळ बिबटचा मुक्तसंचार :

वन्यजीव तज्ञांच्या मते, अन्न आणि पाण्याच्या शोधात बिबट शहरी भागात प्रवेश करत आहेत. शहरालगत असलेले जंगल, नाले आणि झुडपी परिसर हे त्यांच्या हालचालीसाठी अनुकूल ठरत आहेत. त्यामुळे मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्षाची शक्यता वाढली आहे.

वन विभागाकडून नागरिकांना घरांच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवावा, रात्री पाळीव प्राणी मोकळे सोडू नयेत आणि काही संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित वन विभाग किंवा पोलिसांना कळवावे, असा सल्ला देण्यात आला आहे. सध्या शहराच्या सीमेवरील व ग्रामीण भागात बिबटसाठी शोध मोहीम जोमाने सुरू असून, वन विभागाचा अलर्ट मोड कायम आहे. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी सर्व यंत्रणा कार्यरत आहेत.

# ट्रॅक्टर, टॉली आणि वाहन चोरी करणारी टोळी अटकेत!

## गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई; ३३.५० लाखांचा मुद्देमाल जप्त



**अमरावती :** अमरावती गुन्हे शाखेच्या पथकाने विविध जिल्ह्यांमध्ये शेतीतील ट्रॅक्टर, टॉली, शेतीअवजारे आणि वाहने चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत तब्बल ३३.५० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईने ग्रामीण भागातील वाहनचोर टोळ्यांवर धसका बसला आहे.

भातकुली पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या ट्रॅक्टर चोरीच्या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे होता. फिर्यादी सदानंद पाडुरंग बोचे (३९, रा. गजाननगर, भातकुली) यांच्या सोनालीका ट्रॅक्टरची चोरी १९ ऑक्टोबर रोजी झाली होती. तपासादरम्यान गुन्हे शाखेच्या पथकाने तब्बल ८० ते ९० ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले आणि आरोपींचा माग काढत संपूर्ण टोळीला गजाआड केले. अटक आरोपींमध्ये भूषण श्रीकांत ठाकरे (२४), कार्तिक संजय पोहकार (२३), मधू मिलिंद शिरसाट (५०), गजानन प्रल्हाद ताठे (२५) यांचा समावेश असून, वैभव उर्फ छकुला बाबुजी आठवले (२७, सर्व रा. अकोला जिल्हा) हा पसार आहे. तसेच एका विधिसंघर्षग्रस्त बालकाचाही सहभाग उघड झाला आहे. पोलीसांनी त्यांच्या ताब्यातून सोनालीका, महिंद्रा, जॉन डिअर, पॉवरट्रॅक या कंपन्यांचे ट्रॅक्टर, टॉली, शेतीअवजारे तसेच बजाज पल्सर आणि हिरो शाइन या दोन मोटारसायकली असा एकूण ३३.५० लाखांचा मुद्देमाल जप्त केला. या टोळीविरुद्ध अकोला जिल्ह्यातील बोरगाव मंजू, तेल्हारा, पिंजर, दहीहंडा पोलीस ठाण्यांमध्ये खून, रेती चोरी, ट्रॅक्टर व डिझेल चोरीसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. तसेच अमरावती, अकोला आणि बुलडाणा जिल्ह्यांतील अनेक पोलीस ठाण्यांमध्ये ट्रॅक्टर आणि दुचाकी चोरीचे गुन्हे नोंदले गेले आहेत. या टोळीने चोरी केलेली वाहने स्वस्त दरात विक्रीस काढल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. शुभम दिनंकर मानकर, सोहेल अली इद्रीस अली, इम्रान शेख उर्फ गब्बर, नौशाद नवाब अहेमद नवाब आणि संजय माधुकर कातखेडे या पाच जणांना ही वाहने विकली गेल्याचे समोर आले आहे. अजून किती वाहने विक्री झाली आहेत, याचा तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपआयुक्त रमेश धुमाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या पथकाने केली. या पथकात एपीआय मनिष वाकोडे, अजय मिश्रा, फिरोज खान, सतीश देशमुख, मंगेश लोखंडे, सागर ठाकरे, रणजित गांवडे, सैयद नाझिम, प्रभात पोकळे व संदिप खंडारे यांचा समावेश होता.

# दर्यापूरात तरुणाकडून पिस्तूल आणि चाकू जप्त

## -अमरावती ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई

**दर्यापूर/प्रतिनिधीः-** गुन्हा करण्याच्या तयारीत फिरणाऱ्या एका तरुणाला अमरावती ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाने दर्यापूर शहरात अटक करून त्याच्याकडून पिस्तूल, मॅगझिन आणि धारदार चाकू जप्त केला. या कारवाईमुळे संभाव्य गुन्हा रोखण्यात पोलिसांना यश आले आहे.

अटक केलेल्या आरोपीचे नाव अंकित किशोर घाटे (वय २९, रा. जुनी तहसील जवळ, दर्यापूर) असे आहे. पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ग्रामीण गुन्हे शाखेचे पथक दर्यापूर पोलिस स्टेशन हद्दीत नियमित गस्त घालत असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक तरुण अंजनगाव–सुर्जी रस्त्यावर शस्त्र बाळगून संशयास्पदरीत्या फिरत आहे.माहिती मिळताच पथकाने तत्काळ त्या ठिकाणी धाव घेतली. आरोपीला ताब्यात घेतल्यावर झडती दरम्यान त्याच्याकडून सुमारे १०,००० किमतीचे पिस्तूल, मॅगझिन आणि धारदार चाकू जप्त करण्यात आले. या प्रकरणी दर्यापूर पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधानातील संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय नितीन इंगोले, सय्यद अजमत, चेतन दुबे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली.

# भटवाडीत अल्पवयीनाने घेतला गळफास

**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या पराग नगर परिसरातील भटवाडी मध्ये राहणाऱ्या नील संतोष राऊत (१७) याने आपल्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. राजापेठ पोलिसांनी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार मंगळवारच्या दुपारी नीलचे आई-वडील काही कामा निमित्त बाहेर गेले होते. ते सायंकाळी ६ वाजता घरी परत आले. निलही सकाळी ट्युशनला गेला होता आणि दुपारी परत आला होता. घराची एक किल्ली त्याच्याजवळ होती. आई वडील जेव्हा परत आले ,तेव्हा त्यांनी नीलला आवाज दिली पण त्याने कोणताही प्रतिसाद नाही दिला. यामुळे नीलचे वडील संतोष राऊत हे शेजारच्या घराच्या छतावरून आपल्या छतावर गेले तेव्हा त्यांना नीलच्या खोलीचे अर्धे दार उघडे दिसलेत्यांनी आत मध्ये डोकावून पाहिले तर नील पंख्यावर लटकलेला दिसला. हे पाहून त्यांना धक्का बसला. त्यांनी दार उघडले आणि रडत रडत बाहेर निघाले. त्यांची पत्नी आणि शेजाऱ्यांना त्यांनी संपूर्ण माहिती दिली. त्यानंतर शेजाऱ्यांच्या मदतीने त्यांनी नील याला फासावरून खाली उतरून पलंगावर झोपवले आणि घटनेची माहिती राजापेठ पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टम साठी पाठवला.

# चोरी प्रकरणात एक जेरबंद; एक फरार

## -गुन्हे शाखेची कारवाई, ३८,४०० किमतीचा मुद्देमाल जप्त

**अमरावती :** शहरातील नागपुरी गेट परिसरात झालेल्या चोरी प्रकरणाचा गुन्हे शाखेने छडा लावत एका आरोपीला अटक केली असून, त्याच्याकडून तब्बल ३८,४०० किमतीचा चोरीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. मात्र, आरोपीचा साथीदार अद्याप फरार असून, पोलिसांनी त्याच्या शोधासाठी मोहीम सुरू केली आहे.



अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव शेख तौफिक शेख रफीक (वय २४, रा. पठाण चौक, अमरावती) असे आहे. गुन्हे शाखेला माहिती मिळाली होती की नागपुरी गेट परिसरातील घरफोडी आणि चोरीच्या प्रकरणांमध्ये शेख तौफिकचा हात आहे. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी तौफिकला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याने चौकशीत सांगितले की, त्याने आपल्या साथीदार सय्यद आबिद याच्यासोबत चोरी केली असून, चोरी केलेला काही माल शेख फहीम शेख रफीक (रा. कामेला ग्राउंड, अमरावती) याला विकला आहे. पोलिसांनी तत्काळ शेख फहीमचा शोध घेतला, परंतु तो फरार झाला असल्याचे समजते. या कारवाईत पोलिसांनी आरोपीकडून ३८,४०० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील तपासासाठी आरोपी शेख तौफिक याला नागपुरी गेट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. सदर कारवाई गुन्हे शाखेचे निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलिसांनी फरार आरोपीच्या शोधासाठी सर्वत्र जाळं पसरवलं आहे.

# भावाला निरोप पाठवून तरुणाचा झाडाला गळफास

**अमरावती/प्रतिनिधीः-** 'मी जीवनाला कंटाळलो आहे... आता हे जीवन संपवतोय.' एवढाच छोटासा संदेश मोबाईलवर आला आणि एका भावाच्या आयुष्यावर दुःखाचा काळोख पसरला. आपल्या भावाचा हा अखेरचा संदेश वाचून जीवघेणा थरकाप उडाला. परंतु तोपर्यंत उशीर झाला होता. ही हृदयद्रावक घटना नांदगावपेठ परिसरातील आहे. चंद्रकांत जगन्नाथ अर्दक (वय ३६, रा. स्वामी समर्थ मंदिराजवळ, नांदगावपेठ) असे आत्महत्या करणा-या तरुणाचे नाव असून, तो अंबा फर्टिलायझर कंपनीत काम करत होता.



२७ ऑक्टोबरच्या दुपारी १.३० वाजता चंद्रकांत यांनी आपल्या भावाला, शशिकांत अर्दक यांना एक शेवटचा संदेश पाठवला. 'मी जीवनाला कंटाळलो आहे... आणि माझे जीवन संपवत आहे.' तो संदेश मिळताच शशिकांत यांच्या पायाखालची जमीन सरकली. ताबडतोब त्यांनी आपल्या चुलत भावाला माहिती दिली आणि दोघांनीही वेड्यासारखा शोध सुरू केला. काही वेळाने ते अंबा फर्टिलायझर कंपनीच्या बंद हॉटेलमध्ये गेले. आत प्रवेश केला, तर लिंबाच्या झाडाखाली चंद्रकांतने गळफास घेतला होता. क्षणातच दोघांनी त्याला खाली उतरवले आणि तातडीने इर्विन रुग्णालयात नेले. परंतु डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. कामाच्या आणि जीवनाच्या ताणतणावात चंद्रकांतने हे पाऊल उचलले असावे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. नांदगावपेठ पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

## निविदा सूचना

**(निवडणूक महत्वाचे)**

मुख्याधिकारी, नगर परिषद चांदूर बाजार यांचे वतीने योग्य त्या वर्गातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता **बी-१** निविदा कार्यप्रणालीद्वारे सिलबंद निविदा आमंत्रित करण्यात येत आहे.

| अ. क्र | कामाचे नांव | अंदाजित किंमत | अनामत रक्कम | निविदा प्रपत्राची रक्कम | काम पूर्णत्वाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीचे अनुषंगाने मतदान केंद्र, स्ट्रॉंग रुम, मतमोजणी कार्यालय, निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयामध्ये सोयी सुविधा पुरविणे व विविध प्रकारची किरकोळ कामे करणे (करावयाचे कामासंबंधीची स्वतंत्र यादी न.प. कार्यालयातील बांधकाम विभागात पहावयास उपलब्ध आहे) | -- | ५००/- | १००/- | आदेश/सूचना मिळाल्यापासून लगेच |

**निविदा सादर करण्याबाबतचा दिनांक व वेळ**

| अ.क्र. | विवरण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | निविदा पुरविण्याचा कालावधी | दि.३०.१०.२०२५ पासून | दु.४.०० वाजता |
| २. | निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | दि.३०.१०.२०२५ ते ०३.११.२०२५ | दु.४.०० वा.पर्यंत |
| ३. | निविदा उघडणे (शक्य झाल्यास) | दि.०४.११.२०२५ | दु.४.०० वाजता |

**अटी व शर्ती -** १) निधीचे उपलब्धतेनुसार देयकाचे प्रदान करण्यात येईल. २) सदर कामाची निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी, नगर परिषद, चांदूर बाजार यांनी राखून ठेवलेले आहेत. ३) सदर कामाचे देयक प्रदान करतांना नियमाप्रमाणे रक्कम देयकातून कपात करण्यात येईल. ४) वरील प्रस्तावित कामामध्ये आवश्यकतेनुसार कमी किंवा जास्त करण्यात येईल. ५) कोरे निविदा प्रपत्र व अनामत रकमेचे प्रदान रोखीने करावे लागेल. ६) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१)(आय) व कलम ४४(१)(ब) चे प्रतिज्ञालेख सादर करणे बंधनकारक राहील. ७) तांत्रिक मनुष्यबळ व हत्यारे, औजारे असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**(गीता ठाकरे)**
**मुख्य अधिकारी,**
**नगर परिषद, चांदूर बाजार**

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
ज्ञान स्रोत केंद्र

SGBAU/10/H/L-1038/2025-26 Date 01/10/2025

**जाहीरात**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अधिनस्त ज्ञान स्त्रोत केंद्रात आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ग्रंथ (Books) खरेदी करीता ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहे. याबाबत जाहीरातीचा सविस्तर तपशिल www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज स्विकृती अंतिम दिनांक १३/११/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत राहील.

**कुलसचिव**
**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**

MAHAVITARAN

**E-Tender Notice**

Separate sealed Bids in prescribed forms are invited for execution of E-Tender for the work of 33 KV link line from 33/11 KV substation, Asegaon, Tq. Chandur Bazar, Dist. Amravati to 33/11 KV substation, Sawalapur, Tq.Achalpur, Dist. Amravati to create Ring Main system to provide reliable/standby power supply to consumers during interruption/breakdown period under Achalpur city-I sub-Division of Achalpur Division, Amravati circle under DPDC-NDSI Scheme of tender no. SE/O&M/AMT/TECH/2025-26/DPDC-NDSI/33 KV LINK LINE/T-23 The estimated cost of tender is Rs. 214.82 Lakhs (Excluding GST) Tender Fee - Rs. 5000+ 18% GST (Non-refundable). Date of availability of Bid Documents http://works.mahadiscom.in/eTender/etender: 29.10.2025 on MSEDCL E-tendering Website Last Date & Time for Submission of Bid: 04.10.2025 upto 23.55 Hrs. For further details of Invitation for Bids & Bid Documents, please visit MSEDCL website http://works.mahadiscom.in/eTender/etender. Superintending Engineer MSEDCL, O & M Circle Amravati Email ID. seamravati2011@gmail.com

PRO No. 201

Superintending Engineer
M.S.E.D.C. Ltd. O&M Circle Office, Amravati

## जाहीर सुचना

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे पक्षकार **आनंद पतीतपावन परवे,** रा.घर क्र.डी-२०४, जीपीएल ईडन हाईटस दरबारीपुर रोड,सेक्टर ७०, गुडगांव (हरियाना) यांनी **स्वप्नील संजय सावळकर**, रा.टाकळी बु.,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे मालकीची व ताब्यातील खालील वर्णन केलेली मालमत्ता (शेत जमीन) विकत घेण्याचा करार केलेला आहे, त्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे -

**मालमत्तेचे वर्णन -**

नोंदणी पोट तुकडी नांदगाव खंडेश्वर कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद अमरावतीचे हददीतील मौजे- टाकळी बु., ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथील शेत सर्वे नं.११४/४, क्षेत्रफळ १ हे ४६ आर, आकार रु.१.२४ शेत जमीन झाडाझुडपासह, त्याची चतुःसिमा -

पुर्वेस - डी.पवार यांचे शेत, पश्चिमेस - श्रीराम पवार यांचे शेत
उत्तरेस - रोड दक्षिणेस - रघुनाथ मिलके यांचे शेत.

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली मालमत्ता (शेत जमीन) विकत घेण्याचा करार माझे पक्षकार यांनी केलेला आहे व लवकरच सदर मालमत्तेची खरेदी करून घेणार आहे.

सबब वरील वर्णन केलेल्या मालमत्तेवर कुणाचे कोणत्याही प्रकारचे कर्ज, बोझा, हितसंबंध,गहाण, वारसा,हक्क अथवा सरकारी निमसरकारी, सावकारी कर्ज अथवा अन्य कोणतेही हक्क, न्यायालयीन प्रकरण असतील तर ही जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदपत्रांसह हरकत घ्यावी. तसे न केल्यास माझे पक्षकार कराराप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करुन घेईल व नंतर उजर चालणार नाही. सबब कळावे.

**अमरावती**
**दिनांक ३०/१०/२०२५**

**सही /-**
**(ॲड.प्रतिक्षा जी. हिवरे)**
**तळेगाव ठाकुर, ता.जि.अमरावती**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगरदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३५७/२०२५
**श्रीमती कुसूम अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.२७.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Kusum Ambadas Gote, Age 74 Yrs. Occu.: Household
2. Ishwardas Ambadas Gote, Age 53 Yrs. Occu.: Agriculture
3. Nilesh Ambadas Gote, Age 50 Yrs. Occu.: Agriculture
4. Shelesh Ambadas Gote, Age 42 Yrs. Occu.: Labour
Appli.No.1 to 4 R/o Rohankheda, Po.Deora, Tq.Dist.Amravati.
5. Sau.Vasudha Vijayrao Futane, Age 55 Yrs. Occu.: Household
R/o Aashti, Tq.Bhatkuli, Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **श्री.अंबादास सूर्यभानजी गोटे** हे दिनांक 11.09.2021 रोजी **पर्वतापूर, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **कुसूम अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कुसूम अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १५.१०.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगरदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२२५/२०२५
**मंदाताई -वि- निरंक**
पुढील ता.१५.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Mandatai Vitthal Sherewar, Age 71 Yrs. Occu.: Household
R/o Bari Pura, Juni Vasti, Badnera, Tq. Dist. Amravati.
2. Amol Vitthalrao Sherewar, Age 38 Yrs. Occu.: Labour
R/o 402, D-Wing, Sai Darshan Society, Valival Naka, Badlapur West, Badlapur, Dist. Thane.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **विठ्ठलराव नारायणप्पा शेरेवार** हे दिनांक 31.07.2003 रोजी **नागपूर, ता.जि.नागपूर** येथे मयत झाले. अर्जदार **मंदाताई विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मंदाताई विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**जाहीर नोटीस**
**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०२ यांचे न्यायालय**

मोटार अपघात दावा क्र.३१२/२०२२ ने.ता.१७/११/२०२५

**पिटीशनर** - रोशन धनराज राऊत
--- विरुध्द ---
**रिस्पॉन्डन्ट** - राझिक शाहा बशीर शाहा व ईतर

Banam : 1. Raziq Shah Bashir Shah
R/o Rahmat Nagar, Amravati.
2. Abdul Wasim Abdul Karim
R/o Rajputpura, Walgaon, Tq.Dist.Amravati

**APPLICATION U\SEC.166 OF MOTOR VEHICLE ACT 1988 FOR GRANT OF COMPENSATION**

ज्याअर्थी वरील पिटीशनर रोशन धनराज राऊत यांनी वि.जिल्हा व सत्र न्यायालय-०२, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी गैरअर्जदार नं.१ व २ यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक १७.११.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-०२, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक २९.१०.२०२५ रोजी माझ्या सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक (न्यायिक विभाग)**
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२४१७/२०२५
**रुपम -वि- निरंक**
पुढील ता.०१.१२.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. रुपम श्यामराव पिंपळकर, वय ५९ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.एल-१८५, १८ वा माळा अपुर्वा अमनतारा हाऊसिंग कॉम्प्लेक्स भिवंडी, रजोळी विलेश नाशिक रोड, रंजोली दांडेकरवाडी ठाणे महाराष्ट्र
२. संगीता मिलिंद पाटमासे, वय ५६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.राधाकृष्ण अपार्टमेंट, ख्रिस्त कॉलनी, अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रेखाताई श्यामराव पिंपळकर** यांचे दिनांक **२६.०५.२००८** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार रुपम श्यामराव पिंपळकर व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रुपम श्यामराव पिंपळकर व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१७.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२२२७/२०२५
**शमा -वि- निरंक**
पुढील ता.१२.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. शमा मुख्तार अली,
वय ४८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.राहुल नगर, बिच्छु टेकडी, कॅम्प अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत बाबाखा मिश्रीखा पठाण** यांचे दिनांक **०१.०७.२००८** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार शमा मुख्तार अली** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शमा मुख्तार अली** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०१.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ५३**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# चांदूर रेल्वे शहरात पाणीपुरवठा समस्येवर काँग्रेसचा हल्लाबोल!

## ७ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलन

**चांदूर रेल्व/वार्ताहर**

गेल्या वर्षभरापासून चांदूर रेल्वे शहरातील नागरिकांना पाण्यासाठी प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.शहरातील अनेक भागांमध्ये चार-पाच दिवसांनी एकदाच नळ येतो, तोही अत्यंत कमी दाबाने.महिला, वृद्ध आणि लहान मुलांना पाण्याच्या एका बादलीसाठीही रांगेत उभे राहावे लागत आहे. काही भागात नागरिकांना विहिरी आणि खाजगी टँकरवर अवलंबून राहावे लागत असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.

या गंभीर परिस्थितीबाबत अनेकदा नगरपरिषद प्रशासनाचे लक्ष वेधूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.प्रशासनाची निष्क्रियता, मनमानी आणि जनतेप्रती असंवेदनशील वागणूक यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.या पार्श्वभूमीवर आज शहर काँग्रेस कमिटीच्या नेतृत्वा खाली नगरपरिषद कार्यालयावर जोरदार हल्लाबोल आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शहरातील नागरिक, महिला, युवक, आघाडीचे कार्यकर्ते आणि काँग्रेस पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.जनतेच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी जोरदार घोषणाबाजी करत काँग्रेस कार्यकर्त्यांनी नगरपरिषद गाठली आणि पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांना निवेदन सादर



करण्यात आले.या आंदोलनानंतर पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांनी ७ दिवसांच्या आत समस्या सोडविण्याचे लेखी आश्वासन दिले आहे.नागरिकांच्या मूलभूत गरजांसाठी काँग्रेसने घेतलेला हा ठाम पवित्रा प्रशासनासाठी इशारादायक ठरला असून जनतेचा आवाज बुलंद करणारे हे आंदोलन ठरले आहे. यामध्ये परीक्षित जगताप प्रदेश महासचिव युवक काँग्रेस, शिट्टुदादा सूर्यवंशी माजी नगराध्यक्ष, प्रभाकरराव वाघ माजी नगराध्यक्ष, अमोल होले तालुकाध्यक्ष,श्रीनिवास सूर्यवंशी शहराध्यक्ष, हर्षल वाघ, रुपेश पुडके, देवानंद खुणे, प्रफुल कोकाटे, कल्पनाताई लांजेवार, सीमाताई कलावटे,पूजाताई वाघ, राजश्रीताई माने, शेख रिजवाना, अजय भाऊ होटे,सारंग देशमुख, सागर बोंडे, राजेश बनसोड, अनिल वगैरे, सनी सावंत, महेश कलावटे, पंकज मेश्राम, सतीश देशमुख, संदीप शेंडे, भीमराव खराटे, राजूभाऊ लांजावार, अनिश भाऊ सौदागर, सुमित सरदार, प्रतीक भैसे, सतपाल वरठे सक्षम वानखडे, शरद घासले, रमेश गिरवळकर, अनिल फरकाडे, संजय कोल्हे, विलास मोटघरे, नरेंद्र मेश्राम, गोपाल अविनाश, राहुल राऊत, भीमराव पवार, करण मेश्राम, इत्यादी कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते.

**तथापि, काँग्रेस कमिटीने स्पष्ट इशारा दिला आहे की**

'जर सात दिवसांत पाणी पुरवठा सुरळीत झाला नाही, तर महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव परीक्षित जगताप यांच्या नेतृत्वाखाली उग्र आंदोलन छेडले जाईल, आणि त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील.'

## रिध्दपूर येथे ३१ ऑक्टोबर रोजी कथा लेखन व कथाकथन कार्यशाळा

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्र व विदर्भ साहित्य संघ, नागपूर, शाखा रिध्दपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ ऑक्टोबर रोजी रिध्दपूर येथील सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी मराठी भाषा तथा तत्वज्ञान अध्ययन केंद्र येथे कथा लेखन व कथाकथन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. राजेश लेहकपुरे यांच्या हस्ते होणार असून उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार आहेत. विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर, मार्गदर्शक म्हणून प्रा. चक्रधर कोठी यांची याप्रसंगी प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. उद्घाटनानंतर दुसरे सत्र कथाकथनचे होणार असून अध्यक्षस्थान डॉ. अण्णा वैद्य भूषविणार आहेत. नागपूर येथील प्रा. उज्ज्वला लोणकर (यादगिरे), अमरावती येथील डॉ. मेघा यादगिरे, डॉ. श्रध्दा काकडे, डॉ. मिनाक्षी भांदकर, डॉ. अर्चना सिरस्कार, अनुष्का जुनघरे, डॉ. निरज काकडे, विनोद तिरमारे यांचा कथाकथनात सहभाग राहणार आहे.सर्वांनी उपस्थित राहून या एकदिवसीय कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विदर्भ साहित्य संघ, शाखा रिध्दपूरचे सचिव प्रवीण कविर, महानुभाव अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. महंत सोनपेठकर यांनी केले आहे.

## उत्पादनात घट आणि भावातही फटका

### शेतकरी अडकला दुहेरी संकटात



**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

यावर्षी अतिवृष्टीच्या कहराने शेतकऱ्याच्या कापूस सोयाबीन या प्रमुख पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले उत्पादनात अंदाजे ६० ते ७० टक्के घट झाली कुठे एकरी ४ क्विंटल तर कुठे एकरी एक ते दीड क्विंटल सोयाबीनचे उत्पादन शेतकऱ्याच्या पदरात पडले सरासरी बाजारात सोयाबीनला ३५ ०० ते ४००० पर्यंत भाव मिळत असल्याने पीक विकून सुद्धा शेतकरी तोट्यातच आहे.

एकीकडे निसर्गाच्या प्रकोपाने उत्पादनात घट आणि बाजारात हमीभावापेक्षा कमी भाव मिळत असल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला मागील दोन महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचा खरीप हंगाम उध्वस्त झाला आणि तालुक्यावर ओल्या दुष्काळा चे सावट निर्माण झाले निसर्गाच्या तडाख्यातून बचावलेले पीक विकले असता लागलेला खर्च सुद्धा निघत नाही.

पेरणीपासून बाजारात येण्यापर्यंत सोयाबीनला एकरी २० हजार रुपये खर्च येतो एकरी तीन ते चार क्विंटल उत्पादन झाले तर १४ ते १५ हजार रुपये बाजारभावाने शेतकऱ्यांचे हाती येतात हीच परिस्थिती कापूस पिकाची आहे शेतीची विदारक परिस्थिती सत्य असून सुद्धा शासन मात्र फक्त मदतीच्या आशेचा खोटा डोज देऊन शेतकऱ्या विषयी फक्त सहानुभूतीचा देखावा करीत असल्याचे दिसून येते शासनाने नाफेडची सोयाबीन खरेदी सुरू करावी अशी मागणी होत असून सुद्धा शासन त्याबाबत गंभीर नाही बाजार भाव आणि नाफेडच्या दरात सरासरी १३०० रुपये प्रतिक्विंटल चा फरक आहे, परंतु गरजू शेतकऱ्यांना बाजारात कमी भाव मिळत असून सुद्धा सोयाबीन विकल्याशिवाय पर्याय नाही तेव्हा या गरजू शेतकऱ्याला नाफेडच्या खरेदीचा फायदा काय ? असा प्रश्न निर्माण होत असून तरी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने भावांतर योजनेचा लाभ देण्यात यावा अशी मागणी जोर धरत आहे.

## चांदूर बाजारच्या अनुज चौधरीचा सुवर्ण विजय

### एशियन युथ गेम्समध्ये भारताचा तिरंगा उंचावला
### आ.प्रवीण तायडे यांच्या तर्फे सत्कार

**अचलपूर/वार्ताहर**

चांदूर बाजार येथील उदयोन्मुख खेळाडू चि. अनुज कमल चौधरी याने आपल्या जिद्द, परिश्रम आणि अथक मेहनतीच्या जोरावर भारतासाठी सुवर्ण कामगिरी बजावली आहे. बहरेन (इराण) येथे नुकत्याच झालेल्या एशियन युथ गेम्स कबड्डी स्पर्धेत अनुजने भारतीय संघात खेळत सुवर्णपदक जिंकले असून, देशाचा तिरंगा फडकावत भारताचा गौरव वाढवला आहे.



याबद्दल अचलपूर मतदार संघाचे आ. प्रवीण तायडे यांच्या हस्ते अनुज चौधरी यांचा सत्कार सोहळा झाला यावेळी आ.प्रवीण तायडे यांनी अनुज चौधरी यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा ही दिल्या. अनुज चौधरी यांच्या या ऐतिहासिक यशामागे इंडिया सेक्रेटरी आणि विदर्भकबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष जितेंद्रसिंह ठाकूर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रयत्नांमुळेच अनुजची भारतीय संघात निवड झाली. अनुजच्या या यशात अमॅच्युअर कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी, स्व. केशवदादा टोम्पे फिजिकल अकॅडमी, श्री हनुमान क्रीडा मंडळ, जगदंब कबड्डी क्लब आणि सर्व कबड्डीप्रेमी मित्रपरिवार यांचे महत्त्वाचे सहकार्य लाभले आहे.या सुवर्ण कामगिरीबद्दल आ.प्रवीण तायडे यांनी अनुजचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. यावेळी भाजपा चे जिल्हा उपाध्यक्ष मुरली माकोडे प्रामुख्याने उपस्थितीत होते.

## जि.प.सर्कलमध्ये उमेदवारीसाठी रस्सीखेच

### भाजप व कॉंग्रेस मध्ये अनेकांनी दावेदारी

**कुऱ्हा/वार्ताहर**

जिल्ह्यातील आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचा बिगुल लवकरच वाजण्याचे संकेत असून अनेकांनी दावेदारी सादर केल्याने पक्षश्रेष्ठींपुढे मोठा पेच निर्माण झाला आहे.आपल्यालाच उमेदवारी मिळणार या विश्वासावर जिल्हा परिषदेच्या कुऱ्हा सर्कल आप आपल्या नेत्यांकडे सर्वच पक्षांचे कार्यकर्ते उमेदवारीसाठी चढाओढ सुरू झाली आहे.

कॉंग्रेसच्या उमेदवारीसाठी इच्छुक उमेदवारांचे अर्ज स्विकारण्याची तारीख संपली असून यामध्ये माजी जिल्हा परिषद महिला बालकल्याण समिती सभापती पुजा संदिप आमले, माजी पंचायत समिती सभापती कविता प्रदिपसिंह पचलोरे, सुषमा प्रदिप दमाये,प्रणिता लुकेश केने, माजी पंचायत समिती सदस्य उज्वला अनुप पांडव यांनी पक्षश्रेष्ठींकडे उमेदवारीसाठी अर्ज दाखल केले.मात्र भाजपाकडून अद्यापही इच्छुक उमेदवारांचे अर्जाची मागणीला सुरूवात झालेली नाही.कुऱ्हा जिल्हा परिषद सर्कल व पंचायत समिती गाणा करिता सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित असल्यामुळे स्थानिक नेते आपल्या सौभाग्यवतीना उमेदवारी मिळण्याकरिता प्रयत्नात आहेत. महिला सर्वसाधारण महिला आरक्षण लागू झाल्यानंतर राजकीय वातावरणात मोठी उलथापालथ सुरू झाली आहे. या कुऱ्हा सर्कलचा राजकीय इतिहास नेहमीच रंगतदार राहिला असून आता नव्या जोमाने परिक्षा होणार आहे. कुऱ्हा जिल्हा परिषद सर्कल हे आजपर्यंत कोणत्याही राजकीय पक्षाच्या अधिपत्याखाली राहिलेले नाही वेळोवेळी येथील सर्कलचे विजयी उमेदवार बदलत्या स्वरूपात पाहायला मिळाले. सध्याच्या घडीला या सर्कल मध्ये महिलांनीच खरी चुरस पाहायला मिळत आहे. या कुऱ्हा जिल्हा परिषद सर्कल सर्वात मोठे असून यामध्ये ३२ गावांचा समावेश असून २८ हजार ४७६ मतदार आहेत.

## अमरावती महानगरपालिकेचा अभिनव उपक्रम

### बांधकाम कामगारांसाठी प्रमाणपत्र सेवा आता पूर्णपणे ऑनलाईन

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिकेने डिजिटल युगाशी सुसंगत पाऊल टाकत बांधकाम कामगारांसाठी मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यापुढे बांधकाम कामगारांना त्यांच्या पात्रतेनुसार मिळणारे 'बांधकाम कामगार प्रमाणपत्र' हे आता पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध होणार आहे.

याआधी ही सेवा ऑफलाइन पद्धतीने, म्हणजे प्रत्यक्ष झोन कार्यालयात जाऊन अर्ज सादर करून आणि उपअभियंता मार्फत प्रमाणपत्र प्राप्त करून देण्यात येत होती. त्यामुळे कामगार बांधवांना वेळ, प्रवास खर्च आणि त्रास सहन करावा लागत होता. मात्र आता या प्रक्रियेला आधुनिक तंत्रज्ञानाचा स्पर्श देत अमरावती महानगरपालिकेने ती डिजिटल पद्धतीने सुरू केली आहे.महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर www.amravaticorporation.in बांधकाम कामगारांसाठी ही नवीन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. संबंधित कामगारांनी या संकेतस्थळावर जाऊन आपली माहिती भरून ऑनलाईन अर्ज करायचा आहे. अर्जाची पडताळणी झाल्यानंतर प्रमाणपत्र देखील ऑनलाईन पद्धतीनेच डाउनलोड करता येईल. सर्व अर्जदारांनी ऑनलाईन प्रणालीचाच वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पूर्वी कार्यालयीन प्रक्रियेसाठी लागणारा वेळ आणि कागदपत्रांची दगदग आता टळणार आहे. कामगारांना त्यांच्या घरी किंवा इंटरनेट सुविधेच्या ठिकाणी बसूनच अर्ज करता येणार असून प्रमाणपत्र तत्काळ मिळू शकेल. डिजिटल प्रशासनाच्या दिशेने अमरावती महानगरपालिकेचे हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले की, अमरावती महानगरपालिकेने बांधकाम कामगारांच्या सोयीसाठी प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया आता पूर्णपणे ऑनलाईन केली आहे. यामुळे कामगारांना झोन कार्यालयात वारंवार चकरा मारण्याची गरज उरणार नाही. पारदर्शकता, वेग आणि सोयीसाठी ही सेवा सुरू करण्यात आली आहे.सर्व बांधकाम कामगारांनी www.amravaticorporation.in या महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपले अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत. अर्ज तपासणी झाल्यानंतर प्रमाणपत्र सुद्धा ऑनलाईन स्वरूपात मिळेल. या उपक्रमामुळे शहरातील बांधकाम कामगारांच्या सेवेत डिजिटल परिवर्तन घडणार असून, नागरिकांना सोयीस्कर, पारदर्शक आणि सुलभ सेवा उपलब्ध होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## 'प्लास्टिकमुक्त अमरावती'कडे वाटचाल

### अमरावती मनपा व यंग मार्वल सर्विसेस एलएलपी यांचा जनजागृती उपक्रम

**अमरावती/का.प्र.**

पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अमरावती महानगरपालिका व यंग मार्वल सर्विसेस एलएलपी यांच्या संयुक्त विद्यमाने कवर नगर व दस्तूरनगर परिसरात प्लास्टिक बंदीबाबत भव्य जनजागृती मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमात महानगरपालिकेचे अधिकारी, यंग मार्वल एलएलपीचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच स्थानिक व्यापारी व नागरिकांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.



या मोहिमेचा मुख्य उद्देश नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये प्लास्टिकच्या वापराबाबत जागरूकता निर्माण करणे आणि त्यातून पर्यावरण संरक्षणाबाबत जबाबदारीची भावना विकसित करणे हा होता. जनजागृती दरम्यान व्यापारी व ग्राहकांना प्लास्टिकमुळे होणारे दुष्परिणाम, प्रदूषणाचा वाढता धोका आणि शहरातील कचऱ्याची समस्या याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.जनजागृती दरम्यान नागरिकांना प्लास्टिक पिशव्यांच्या ऐवजी कापडी, कागदी व पुनर्वापर करता येणाऱ्या पिशव्यांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. या मोहिमेत प्लास्टिक बंदीच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. यंग मार्वल सर्विसेस एलएलपीच्या प्रतिनिधीं नी सांगितले की, 'शहरातील प्रत्येक नागरिकाने प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारली तर पर्यावरणाचे मोठे नुकसान टाळता येईल. आपल्या छोट्या कृतींमुळे मोठा बदल घडवून आणता येतो. महानगर पालिकेच्यावतीने नागरिकांना कचरा वर्गीकरण, पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती याबाबत माहिती देण्यात आली. तसेच,प्लास्टिक वापरणाऱ्या आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई होणार असल्याचेही सांगण्यात आले.

या उपक्रमामुळे व्यापारी आणि ग्राहकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. अनेक दुकानदारांनी पुढील काळात पूर्णपणे प्लास्टिकचा वापर बंद करण्याचे आश्वासन दिले. स्थानिक नागरिकांनीही या उपक्रमा चे स्वागत करत, 'प्लास्टिकमुक्त अमरावती' या स्वप्नपूर्तीसाठी सक्रिय सहभाग देण्याचे आश्वासन दिले.या उपक्रमाच्या यशस्वी आयोजना मुळे शहरात पर्यावरणाबाबत सकारात्मक बदलाची दिशा निर्माण झाली आहे. महानगर पालिकेच्या अधिकारीवर्गाने सांगितले की, पुढील काळात शहरातील इतर भागातही अशाच प्रकारच्या जनजागृती मोहिमा राबविण्यात येणार आहेत. अमरावती महानगरपालिका आणि यंग मार्वल सर्विसेस एलएलपी यांच्या या संयुक्त प्रयत्नामुळे 'प्लास्टिक मुक्त, स्वच्छ आणि हरित अमरावती'च्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले आहे.

## संक्षिप्त

### वार्ड क्रमांक २मध्ये घाणीचे साम्राज्य

**अंजनगाव बारी -** येथील स्थानिक ग्रा.प. प्रशासन घाणाचे साम्राज्य पसरले आहे. वार्ड २ मधील रोशन कुकडे यांच्या घरालगत असलेली नाली व रपटा तूडुंब भरल्या दुषित सांडपाणी रस्त्यावरून वाहत आहे. दोन वर्षांपूर्वी डांबरा सारखा दिसणारा रस्ता जलमय, चिखलमय झाला असून गावातून वाहणाऱ्या पाण्याने गटारगंगेचे स्वरूप धारण केले असुन घरासमोर तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. सार्वजनिक आरोग्यास प्रश्न निर्माण झाला असुन स्थानिक प्रशासनाला नागरिकांनी लेखी निवेदन देऊनही यावर कुठलीही कार्यवाही होत नसुन प्रशासन कुंभकर्णी झोपेचे सोगं घेऊन आहे.



प्रभागात असलेल्या अंगणवाडी केंद्रात सभोवताली शेणाचे ढिगारे, गवत काळीने व्यापलेले आहे. त्यामुळे चिमुकल्या मुलांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या सर्व संपूर्ण बाबीकडे आरोग्य विभाग अंजनगाव बारीचे दुर्लक्ष होत आहे. या सर्व बाबींचा विचार करिता यावर त्वरीत उपायोजना करून हा प्रश्न सोडविण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी स्थानिक प्रशासनाकडे केली आहे.

### संजय वाघुळे आकाशवाणी श्रोता सन्मान पुरस्काराने सन्मानित

**वलगाव -** जवळपास ३५ वर्षापासून सिलोन तथा राष्ट्रीय व महाराष्ट्रातील आकाशवाणी केंद्राशी जुळून आपल्या अभिप्रायाने आणि लेखनाने आपला उत्स्फूर्त,सक्रिय सहभाग नोंदवून रेडिओच्या माध्यमातून सामाजिक संवाद तथा श्रोता प्रेमामुळे, कार्यक्रमाला नवसंजीवनी दिली या योगदानाबद्दल अहिल्यानगर रेडिओ श्रोता समिती व महाराष्ट्र राज्यस्तरीय रेडिओ श्रोता सम्मेलन आयोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर येथे आयोजित महाराष्ट्र राज्यस्तरीय रेडिओ श्रोता संमेलन २०२५ या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते अखिल भारतीय रेडिओ श्रोता महासंघाचे सचिव संजय मधुकर वाघुळे यांना आकाशवाणी विशेष श्रोता सन्मान पुरस्काराने गौरीविण्यात आले.



या संमेलनात आदिनाथ अन्नदाते,अशोक पाटील,बिरजू परदेशी,अभिजीत गव्हाणकर, जगन्नाथ बसेये,बाळकृष्ण बिडवई,मंजुश्री परदेशी यांच्या हस्ते संजय वाघुळे यांना आकाशवाणी विशेष श्रोता सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी महाराष्ट्रातील विविध आकाशवाणी केंद्राहुन आलेले अधिकारी, उद्घोषक विकास पल्हाडे, समीर शिरवाळकर, सुधीर फुलके तथा महाराष्ट्र व महाराष्ट्र बाहेरील इतर राज्यातून मोठ्या संख्येने आलेले श्रोता मंडळी उपस्थित होते. हा सन्मान मिळाल्याबद्दल सर्व श्रोत्यांनी आनंद व्यक्त केला. तसेच शहा कय्युम शहा,प्रवीण हागोणे, आशिष चामटकर, चंद्रशेखर खुटेमाटे, किशोर वडतकर, रमेश गुर्जर आदींनी संजय वाघुळे यांचे अभिनंदन केले.

### हेमचंद्र बोंडे यांचे निधन

**टाकरखेडा संभू -** साऊर येथील रहिवासी भैय्यासाहेब उर्फ हेमचंद्र बोंडे वय ७८ यांचे २८ ऑक्टोंबर २०२५ ला आजाराने निधन झाले. ते अमरावती जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सुभाष बोंडे यांचे मोठे बंधू होते. तसेच शेतकरी संघटनेचे नेते जगदीश (नाना) बोंडे यांचे मोठे बंधू आणि काँग्रेसचे कार्यकर्ते शशिकांत बोंडे यांचे वडील होते. त्यांच्या निधनाने बोंडे परिवारासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.तसेच त्यांनी दिशा आय बँक ला नेत्रदान केले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले दोन सुना व नातवंडे असा आप्त परिवार आहे. अंत्यविधी साऊर येथे पार पडली.



### प्रतिभा पीटके यांचा वाढदिवस साजरा


**अमरावती -** शंकर नगर परिसरातील रहिवासी दर्यापूर येथील प्रबोधन महाविद्यालयातून सेवानिवृत्त शिक्षिका प्रतिभा अनिल पिटके यांचा ७७ वा वाढदिवस डॉ. गोविंद कासट मित्र मंडळ तर्फे राजापेठ येथील स्व. दौलतभाई देसाई मतिमंद विद्यालयातील बालगोपाळांसह सोबत साजरा करण्यात आला. मित्र मंडळातील डॉ. चारुदत्त चौधरी यांचा वाढदिवस कार्यक्रमातील एक भाग पीटके यांचा सत्कार झाला.डॉ. चारुदत्त चौधरी यांनी कौटुंबिक ओळख माजी आहे.

डॉ. गोविंद कासट प्रबोधन विद्यालयात दर्यापूर येथे म्हणून अनेकदा आले आहेत असे सांगून शाळेचे व विद्यार्थी वर्गाचे त्यांनी आपल्या भाषणातून कौतुक केले व शाळेला देणगी दिली.लक्ष्मण तडस यश व विवेक सहस्त्रबुद्धे डॉ. चारुदत्त शिवा आणि व शुभंकर चौधरी मुख्याध्यापक जीवन गोरे एस बी राठोड, तेजस्विनी काकडे,वैष्णवी खताडे, सुषमा हर्षवर्धन जिचकार, माधवी पांडे योगिता सदार कल्याणी सोळंके अमित काळे इत्यादी मंडळी हजर होती.



### शेगाव नाका चौकात भीषण अपघात

# कारची दुचाकीला जोरदार धडक; 1 ठार,1 गंभीर



**अमरावती /प्रतिनिधी :** शहरातील शेगाव नाका चौकात मंगळवारी (२८ ऑक्टोबर) मध्यरात्री सुमारास झालेल्या भीषण अपघातात एका तरु णाचा मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. ही दुर्घटना रात्री सुमारे एकच्या सुमारास घडली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुमित नेभाणी आणि साहिल गुलशनकुमार मनसुखानी (रा. कृष्णानगर, गल्ली क्र. १, अमरावती) हे दोघे एमएच-२७/बीएल-००१७ या क्रमांकाच्या दुचाकीवरू न शेगाव नाका चौकातून जात होते. त्याचवेळी एमएच-२७/एआर-७६८९ क्रमांकाच्या कारने अतिवेगाने आणि अनियंत्रितपणे दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेचा जोर इतका प्रचंड होता की दोघेही युवक दुचाकीवरून दूर फेकले गेले आणि कारदेखील उलटली. या अपघातात साहिल मनसुखानी गंभीर जखमी झाला. त्याला (पान २ वर)

## सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश भूषण गवई यांचे आगमन



**अमरावती/प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश भूषण गवई यांचे आज अमरावती येथील बेलोरा विमानतळ येथे आगमन झाले. यावेळी त्यांचे प्रशासनाच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी खासदार बळवंत वानखेडे, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, उपविभागीय अधिकारी श्रद्धा उद्धावंत आदी उपस्थित होते.

## जय अभ्यंकर यांचे निधन



**अमरावती/प्रतिनिधी-** आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते समाजभूषण माधुकरराव अभ्यंकर यांचे ज्येष्ठ चिरंजीव जय अभ्यंकर यांचे बुधवार (ता. २९) रोजी दुपारी एक वाजताच्या दरम्यान तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा भूमिपुत्र कॉलनी येथील निवासस्थानावरू न सायंकाळी सहा वाजता निघाली. त्यांच्यावर हिंदू स्मशानभूमी अमरावती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## हैदराबादहून पुन्हा नवनीत राणांना धमकी!

अमरावती : माजी खासदार नवनीत राणा यांना पुन्हा एकदा जीवघेणी धमकी मिळाल्याने अमरावतीत खळबळ उडाली आहे. हैदराबादहून आलेल्या स्पीड-पोस्टमधील पत्रात थेट जीवे मारण्याची धमकी देण्यात आली असून, त्यात वापरलेली भाषा अश्लील व भडक आहे.२८ ऑक्टोबर रोजी नवनीत राणा यांच्या कार्यालयात हे पत्र आल्यानंतर त्याचे निरीक्षण केल्यावर ही गंभीर बाब उघडकीस आली. मंगेश मनोहरराव कोकाटे (३९) यांनी याबाबत राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून, हैदराबादच्या जावेद नावाच्या व्यक्तीविरु द्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, लिफाफ्यावर मेल अलीनगर, मेहंदीपट्टणम, हैदराबाद असा पत्ता नमूद होता. घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखेचे पोलीस (पान २ वर)

















